# हिंद स्वराज्य

(मराठी)

मोहनदास करमचंद गांधी



# हिंद-स्वराज्य

गांधीजी

[redacted]

नवजीवन प्रकाशन मंदिर
अहमदाबाद

[redacted]

© नवजीवन ट्रस्ट, २०१६

पहिली आवृत्ति, प्रति ५,०००, सितम्बर २०१६
चौथा पुनर्मुद्रण, प्रति १,०००, जानेवारी २०२२
कुल प्रतियाँ: १५,४००

ISBN 978-81-7229-713-8

मुद्रक व प्रकाशक
विवेक जितेन्द्र देसाई
नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद-३८० ०१४
फोन: ०७९ - २७५४०६३५, २७५४२६३४
E-mail: sales@navajivantrust.org
Website: www.navajivantrust.org

# ‘हिंद-स्वराज्य’: संपूर्ण जीवन-विचार

**गांधीजी**

(१)

मला राहवले नाही तेव्हाच मी लिहिले. खूप वाचले, खूप विचार केला. इंग्लंडमध्ये ट्रान्सव्हाल शिष्टमंडळासोबत चार महिने राहिलो असताना तेथे जमेल तितक्या भारतीय लोकांशी विचार-विनिमय केला. शक्य झाले तितक्या इंग्रजांनाही भेटलो. या विचारानंतर मी जे निष्कर्ष काढले ते वाचकांपुढे ठेवणे हे मला माझे कर्तव्य वाटले---

जे विचार मी येथे प्रकट केले आहेत, ते माझे आहेत आणि माझे नाहीतही. ते माझे आहेत, कारण त्याप्रमाणे वागण्याचा माझा प्रयत्न आहे. ते माझ्या जीवनाचे अविभाज्य भाग झाले आहेत. ते केवळ माझेच नाहीत, कारण तसा विचार फक्त मीच केला आहे असे नाही. कित्येक पुस्तके वाचल्यानंतर माझी मते बनली आहेत. मला मनात खोलवर जे जाणवत होते, त्याला त्या पुस्तकांचा आधार मिळाला---

माझा उद्देश केवळ देशाची सेवा करण्याचा, सत्य शोधण्याचा आणि त्यानुसार आचरण करण्याचा आहे. म्हणून ते विचार चुकीचे ठरले तरी त्यांना चिकटून राहण्याचा माझा आग्रह नाही. पण ते बरोबर ठरले तर इतरांनीही त्यानुसार चालावे अशी देशहिताच्या दृष्टीने माझी भावना राहील---

(पहिल्या गुजराती आवृतीच्या प्रस्तावनेतून, २२.११.१९०९)

(२)

माझ्या या छोट्याशा पुस्तिकेकडे अनेक लोकांचे लक्ष वेधले जात आहे हे मी माझे सद्‌भाग्य समजतो. मूळ पुस्तक गुजरातीत आहे. त्याचा जीवनक्रम विलक्षणच आहे. दक्षिण आफ्रिकेतील ‘इंडियन ओपीनियन’ या साप्ताहिकात ते प्रथम प्रसिद्ध झाले. १९०८ (१९०९-सं.) मध्ये इंग्लंडहून

दक्षिण आफ्रिकेत परतताना जहाजावर मी ते लिहिले. भारतातील हिंसावादी संप्रदायाला व त्याच विचाराच्या दक्षिण आफ्रिकेतील वर्गाला उत्तर म्हणून हे लिहिले आहे. लंडनमध्ये प्रत्येक प्रसिद्ध दहशतवादी भारतीयाशी माझा संपर्क आला. त्यांच्या शौर्याची छाप माझ्या मनावर पडली, पण त्यांच्या तळमळीला भलतेच वळण लागले आहे असे मला वाटले. भारताच्या दुःखावर हिंसा हा उपाय नव्हे; भारताची संस्कृति पाहता स्वसंरक्षणासाठी त्याला काही वेगळ्या उच्च प्रतिच्या शस्त्राची गरज आहे असे मला वाटले. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाला त्या वेळी जेमतेम दोन वर्षे झाली होती, परंतु त्याचा इतका विकास झाला होता की त्याबद्दल काही प्रमाणात आत्मविश्वास- पूर्वक लिहिण्याची मला हिंमत झाली. माझी ही लेखमाला वाचकांच्या पसंतीस उतरल्यामुळे ती पुस्तक-रूपात प्रकाशित करण्यात आली. भारतात काही लोकांचे लक्ष तिकडे वेधले गेले. मुंबई सरकारने त्या पुस्तकावर बंदी घातली. पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध करून मी त्या बंदीला उत्तर दिले. माझ्या इंग्रज मित्रांना या पुस्तकांतील विचारांची ओळख करून देणे हे मला माझे कर्तव्य वाटले.

माझ्या मते हे पुस्तक लहान मुलांच्याही हाती दिले जाऊ शकते. हे पुस्तक द्वेषाऐवजी प्रेम-धर्माची शिकवण देते. हिंसेच्या ऐवजी आत्मबलिदानाची प्रेरणा देते. पाशवी बळाचा सामना करण्यासाठी आत्मबळाला उभे करते. याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. आणि ज्या कोणाला ते वाचावेसे वाटेल त्यांनी ते अवश्य वाचावे अशी माझी शिफारस आहे. यात लिहिलेल्यातून काही वगळावे असे मला वाटत नाही. अपवाद फक्त एकच शब्द (पार्लमेंटसंबंधी वापरलेला 'वेश्या' शब्द), जो मी एका भगिनीच्या भावनांना मान देऊन काढून टाकू इच्छितो.

या पुस्तकात आधुनिक सभ्यतेचा अतिशय तीव्र धिक्कार आहे. १९०८ (१९०९) मध्ये हे पुस्तक लिहिले गेले. त्यानंतर त्यातील विचारांच्या सत्यतेबद्दल माझा विश्वास अधिक दृढ झाला आहे. आधुनिक सभ्यतेचा त्याग करण्यात भारताचा लाभच आहे अशी माझी भावना आहे.

परंतु वाचकांना माझी एक सावधगिरीची सूचना आहे. या पुस्तकात वर्णिलेले स्वराज्य हे आज माझे उद्दिष्ट आहे असे त्यांनी मानू नये. देश यासाठी अजून तयार झालेला नाही हे मी जाणतो. असे म्हणणे कदाचित उद्धटपणाचे वाटेल, पण माझी तशी खात्री आहे. यात रेखाटलेल्या स्वराज्यासाठी माझा व्यक्तिश: प्रयत्न आहे, परंतु आजचे माझे सामूहिक कार्य भारतातील लोकांच्या इच्छेनुसार सांसदीय स्वराज्याची स्थापना करण्यासाठीच आहे. रेल्वे किंवा इस्पितळांचा नाश करावा असा माझा उद्देश नाही. अर्थात् ती आपोआप नष्ट झाली तर मला त्यात आनंदच वाटेल. रेल्वे किंवा इस्पितळे ही काही उच्च आणि निर्मळ संस्कृतिची द्योतक नव्हेत. त्यांना फार तर एक अनिवार्य अशी अनिष्ट गोष्ट म्हणता येईल. राष्ट्राची नैतिक उंची त्यांच्यामुळे एक इंचभरही वाढत नाही. न्यायालये कायमची नष्ट करण्याचाही माझा इरादा नाही, जरी ती नष्ट होणे उत्तम असे मी मानतो. सर्व यंत्रे आणि कारखाने नष्ट करण्याचाही माझा उद्देश नाही. त्यासाठी वरच्या दर्जाचा साधेपणा आणि त्याग यांची गरज आहे. तशी आज लोकांची तयारी नाही.

यातील कार्यक्रमाचा जर कोणता भाग आज अंमलात आणला जात असेल तर तो म्हणजे अहिंसा. परंतु तोही या पुस्तकाच्या भावनेने अंमलात येत नाही हे मला खेदाने कबूल करावे लागते. तसे झाले तर एक दिवसात भारताला स्वराज्य मिळेल. हा प्रेमाचा सिद्धांत जर भारताने आपल्या धर्माचा एक सक्रिय भाग म्हणून स्वीकारला आणि आपल्या राजकारणात दाखल केला तर स्वराज्य जणू स्वर्गातून अवतरेल. परंतु ही गोष्ट अजून फार दूर आहे याची मला दु:खद जाणीव आहे.

सध्याच्या आंदोलनाला बदनाम करण्यासाठी या पुस्तकातील उतारे उद्धृत केले जात असल्याचे मला आढळले म्हणून मी हे लिहिले. माझे एक खोल कारस्थान आहे, सध्याच्या खळबळीचा फायदा घेऊन माझ्या वेडगळ कल्पना मी देशावर लादू पाहत आहे, देशाचा बळी देऊन मी माझे धार्मिक प्रयोग करीत आहे, असे आक्षेप घेणारे लेखही माझ्या पाहण्यात

आले आहेत. त्यांना उत्तर म्हणून मी एवढेच म्हणेन की सत्याग्रह ही पोचट वस्तु नाही. त्यात हातचे राखून ठेवलेले किंवा गुप्त असे काही नसते. 'हिंद-स्वराज्या' त मांडलेल्या जीवन-विचाराचा एक भाग आज अंमलात आणला जात आहे यात शंका नाही. तो विचार पूर्णपणे अंमलात आणण्यात काहीच धोका नाही. परंतु ओज देशापुढे असलेल्या प्रश्नांशी मुळीच संबंध नसलेले उतारे या पुस्तकातून काढून लोकांना घाबरवणे योग्य नाही.

(यंग इंडिया, जानेवारी १९२१)

(३)

हे पुस्तक पुन्हा लिहायचे झाले तर मी थोडीफार भाषा बदलेन. परंतु गेल्या तीस वर्षांच्या वादळी जीवनानंतरही या पुस्तकात व्यक्त केलेली मते बदलावी असे मला वाटत नाही. काही कार्यकर्त्यांशी झालेल्या संवादाची ही प्रामाणिक नोंद आहे हे वाचकांनी लक्षात घ्यावे. या कार्यकर्त्यांपैकी एक जण कट्टर दहशतवादी होता. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय चळवळीला लागू पाहणारे ग्रहण या पुस्तकामुळे सुटले, याचीही नोंद घेतली पाहिजे. याच्या दुसऱ्या पारड्यात मी एका प्रिय दिवंगत

मित्राचे उद्‌गार वाचकापुढे तुलनेसाठी ठेवतो. ते म्हणजे: 'ही एका मूर्खाची कृति आहे.'

(सेवाग्राम, १४ जुलै १९३८. 'आर्यन पाथ' मासिकाच्या सप्टेंबर १९३८ मधील 'हिंद-स्वराज्य' विशेषांकासाठी)

(४)

ही कमालीची सोपी (मूर्खपणाची वाटावी इतकी सोपी) पुस्तिका समजण्याची किल्ली हे लक्षात ठेवण्यात आहे की, तथाकथित अज्ञानमय अंधकारयुगात परत जाण्याचा हा प्रयत्न नाही. हा प्रयत्न आहे ऐच्छिक साधेपणा, दारिद्र्य आणि संथ गती यांतील सौंदर्य पाहण्याचा. माझा

आदर्श मी त्यात रेखाटला आहे. मी स्वतःच तो आदर्श गाठू शकणार नाही, आणि म्हणून देशाने तो गाठावा अशी माझी. अपेक्षाही नाही. परंतु नावीन्य, आकाशातून उडणे, गरजा वाढविणे इत्यादि ज्या गोष्टी आधुनिक युगाला हव्या आहेत, त्यांचे मला तिळमात्र आकर्षण नाही. त्या गोष्टीमुळे आपला अंतरात्मा मृतवत् होतो. माणूस जितका उंच उडण्याचा प्रयत्न करतो, तितका तो ईश्वरापासून दूर जातो.

(१९३९ मध्ये लिहिलेल्या एका पत्रातून)

# अनुक्रमणिका

'हिंद-स्वराज्य': संपूर्ण जीवन-विचार . . . . . . . . .
१. काँग्रेस आणि तिचे पुढारी . . . . . . . . . . . . .३
२. बंगालची फाळणी . . . . . . . . . . . . . . .९
३. अस्वस्थता आणि असंतोष . . . . . . . . . . . .१४
४. स्वराज्य म्हणजे काय? . . . . . . . . . . . . .१७
५. इंग्लंडची स्थिती. . . . . . . . . . . . . . .१८
६. सभ्यतेचे दर्शन . . . . . . . . . . . . . . .२१
७. हिंदुस्तान कशामुळे गमावले?. . . . . . . . . . .२५
८. हिंदुस्तानची दशा-१ . . . . . . . . . . . . .२९
९. हिंदुस्तानची दशा-२-रेल्वे . . . . . . . . . . .३२
१०. हिंदुस्तानची दशा-३-हिंदु-मुसलमान . . . . . . . .३५
११. हिंदुस्तानची दशा-४-वकील . . . . . . . . . . .३८
१२. हिंदुस्तानची दशा-५-डॉक्टर . . . . . . . . . .४४
१३. खरी सभ्यता कोणती? . . . . . . . . . . . . .४८
१४. हिंदुस्तानची सुटका कशी होईल? . . . . . . . . .५०
१५. इटाली आणि हिंदुस्तान . . . . . . . . . . . .५४
१६. शस्त्रबळ . . . . . . . . . . . . . . . . .५७
१७. सत्याग्रह-आत्मबळ. . . . . . . . . . . . . .६०
१८. शिक्षण . . . . . . . . . . . . . . . . . .६७
१९. यंत्रे . . . . . . . . . . . . . . . . . .७७
२०. सुटका . . . . . . . . . . . . . . . . . .८४
परिशिष्ट . . . . . . . . . . . . . . . . . .८८
. . . . . . . . . . . . . . . . . . . . .९६

# १. काँग्रेस आणि तिचे पुढारी

**वाचक:** हल्ली हिंदुस्तानात स्वराज्याचे वारे वाहत आहे. सर्व हिंदी लोकांना स्वातंत्र्याची तळमळ लागलेली दिसून येते, दक्षिण आफ्रिकेत देखील अशाच प्रकारची भावना उद्दीपित झाली आहे. हिंदी लोकांना आपले हक्क प्राप्त करून घेण्याची फार उत्कंठा लागली आहे असे दिसते. या बाबतीत तुमचे विचार स्पष्ट कराल काय?

**संपादक:** बरा प्रश्न विचारलात. पण त्याचे उत्तर देणे सोपे नाही. लोकांची भावना जाणून घ्यायची आणि ती प्रकट करायची हे वृत्तपत्रांचे एक काम आहे; दुसरे काम, लोकांत इष्ट भावना उत्पन्न करायच्या; आणि तिसरे काम म्हणजे लोकांत दोष असतील तर ते वाटेल तितक्या आपत्ति सोसूनही निर्भयपणे दाखवून द्यायचे. तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्यात ही तिन्ही कामे होऊन जातात. काही प्रमाणात लोकांची भावना प्रकट करावी लागेल, ती नसेल तर निर्माण करण्याचा प्रयत्न करावा लागेल. आणि दोषांवर टीकाही करावी लागेल. तथापि, तुम्ही ज्या अर्थी प्रश्न केला आहे त्या अर्थी उत्तर देणे माझे कर्तव्य आहे.

**वाचक:** स्वराज्याची तीव्र इच्छा आपणांत उत्पन्न झालेली आहे असे तुम्हाला दिसते का?

**संपादक:** ती इच्छा तर नॅशनल काँग्रेस स्थापन झाली तेव्हापासूनच दिसून येते. 'नॅशनल' या शब्दाच्या अर्थावरूनच तो विचार स्पष्ट होतो.

**वाचक:** तुमचे हे म्हणणे बरोबर वाटत नाही. काँग्रेसची तर आज भारतातील तरुण पर्वाच करीत नाहीत. ते तिला इंग्रजांचे राज्य टिकविणारे साधन समजतात.

**संपादक:** तरुणांचे हे मत बरोबर नाही. हिंदुस्तानचे पितामह दादाभाई यांनी जर भूमिका तयार करून ठेवली नसती तर तरुण मंडळी आज ज्या गोष्टी बोलत आहेत त्या त्यांना बोलता आल्या नसत्या. श्री. ह्यूम यांनी जे लेख लिहिले, आपल्यावर जे कोरडे ओढले आणि ज्या उत्कटतेने

आपल्याला जागे केले ते सर्व कसे विसरता येईल? सर विल्यम वेडरबर्न यांनी आपले तन-मन-धन काँग्रेसचे उद्दिष्ट पार पाडण्यासाठी वेचले. त्यांनी इंग्रजी राज्याविषयी लिहिलेले लेख आजदेखील वाचण्यासारखे आहेत. प्रो. गोखले यांनी जनतेला तयार करण्याकरिता गरीबी पत्करून आपल्या आयुष्याची वीस वर्षे दिली आहेत. आजदेखील ते गरीबीत राहत आहेत. काँग्रेसच्या द्वारे स्वराज्याचे बीजारोपण करणाऱ्यात मरहूम न्यायमूर्ती बद्रुद्दिन हेही होते. याचप्रमाणे बंगाल, मद्रास, पंजाब वगैरे ठिकाणीही काँग्रेसचे आणि हिंदुस्तानचे हित चिंतणारे कित्येक भारतीय व इंग्रज होऊन गेले आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

**वाचक**: थांबा, थांबा, तुम्ही फारच पुढे गेलात. माझा प्रश्न वेगळा आणि तुम्ही उत्तर भलतेच देत आहा. मी तुम्हाला स्वराज्याविषयी विचारले तर तुम्ही परराज्या-विषयी बोलत आहा. मला इंग्रजांचे नावसुद्धा नको. आणि तुम्ही तर त्याच्या नावाचा पाढाच बोलू लागलात. अशा स्थितित तुमचे-आमचे जमेलसे दिसत नाही. तुम्हीं फक्त स्वराज्याविषयीच बोलाल तर मला बरे वाटेल. इतर शहाणपणाच्या गोष्टींनी माझे समाधान कायचे नाही.

**संपादक**: तुम्ही फार उतावीळ झाला आहात. मला असे उतावीळ होऊन चालायचे नाही. तुम्हीं जरा दमाने घ्या, म्हणजे तुम्हाला जे पाहिजे तेच मिळेल, 'बी पेरले की फळ लागत नाहीं' ही म्हण लक्षांत ठेवा. तुम्ही मला मध्येच हटकलेत आणि हिंदुस्तानच्या उपकारक त्याविषयी तुम्हाला ऐकावेसे वाटत नाही, यावरून दिसून येते की स्वराज्य अजून तुमच्यापुरते तरी फार दूर आहे. हिंदुस्तानात जर तुमच्यासारखे पुष्कळ लोक असतील तर आपले पाऊल पुढे पडण्याऐवजी आपण मागे राहू ही गोष्ट जरा विचार करण्यासारखी आहे.

**वाचक**: असे गोलमोल बोलून तुम्ही माझा प्रश्न उडवून देऊ इच्छिता असे वाटते. तुम्ही त्यांना हिंदुस्तानचे उपकारकर्ते म्हणता त्यांना मी तसे समजत नाही. मग मी कोणाच्या उपकारांबदल ऐकावे तुम्ही त्यांना हिंदुस्तानचे पितामह म्हणता त्यांनी असा काय उपकार केला? त्यांचे तर

म्हणणे आहे की इंग्रज राज्यकर्ते आम्हाला न्याय देतील; आपण त्यांच्याशी मिळून मिसळून राहिले पाहिजे.

**संपादक**: त्या थोर पुरुषाविषयी अशा बेअदबीने बोललो ही शरमेची गोष्ट आहे हे मला तुम्हाला नम्रपणे सांगितले पाहिजे. त्यांच्या कामगिरीकडे नजर टाका. त्यांनी आपले सारे आयुष्य हिंदुस्तानला अर्पण केले आहे. त्यांनी धडा घालून दिला आणि आपण शिकलो. हिंदुस्तानचे रक्त इंग्रजानी शोषले ही गोष्ट शिकविणारे माननीय दादाभाईच आहेत. आज त्यांचा इंग्रजावर विश्वास आहे म्हणत काय झाले तरुणपणाच्या आवेशात आपण एक पाऊल पुढे टाकले असले तरी त्यामुळे दादाभाई काय कमी पूज्य ठरतात मग काय आपण जास्त शहाणे झालो ज्या शिडीवरून आपण बर चढलो, त्या शिडीला लाथ न मारो. यातच शहाणपणा आहे. आपण बालपणातून तरुणपणात येतो तेन्हा बालपणाचा काही तिरस्कार करीत नाही, उलट ते दिवस मोठ्या प्रेमाने आठवतो. अनेक वर्षें अभ्यास करून एखाद्याने मला काही शिकविले आणि त्यामुळे मी जरा जास्त जाणायला लागलो, तर तेवढ्याने काही मी मोठ्या शिक्षकापेक्षा जास्त ज्ञानी मानला जाणार नाही. मला त्या गुरूला मान द्यावाच लागेल. तसेच पितामह दादाभाईविषयी समजणे योग्य होईल. सबंध देश त्याच्या मागे आहे हे तर आपल्याला कबूलच करावे लागेल.

**वाचक**: हे तुम्ही बरोबर सांगितलेत. दादाभाईना आपण मान दिला पाहिजे ही गोष्ट पटण्यासारखी आहे. त्यांच्यासारख्याच इतर पुरुषांच्या कामगिरीशिवाय आज आपल्यांत जे चैतन्य दिसून येते ते दिसले नसते, हे म्हणणे बरोबर दिसते. पण तसे झाले यांच्याविषयी कसे म्हणता येईल? ते तर इंग्रजांचे मोठे भाईबंदच बनले महणून आपल्याला पुष्कळच शिकायचे आहे, त्यांची राजनीति अगोदर जाणून घेतल्यावरच स्वराज्य विषयी बोलता येईल, असे ते सांगतात. त्यांच्या भाषणांचा तर मला कंटाळा आला आहे.

**संपादक**: तुम्हाला कंटाळा आला आहे यावरून तुमचा स्वभाव उतावळा आहे एवढेच दिसून येते. परंतु जी तरुण मंडळी आपल्या आईबापांच्या

शांत स्वभावाला कंटाळतात आणि आपल्याबरोबर ते घ्यावत नाहीत म्हणून चिडतात, ते आपल्या वडिलांचा अनादर करतात, असे आपण मानतो; तसेच प्रो. गोखले यांच्या बाबतीत समजावे. प्रो. गोखले आपल्याबरोबर वागत नाहीत म्हणून काय झाले? ज्या लोकांना स्वराज्य भोगायचे आहे त्यांना आपल्या वडिलांचा तिरस्कार करून चालणार नाही. वडिलांना मान देण्याचे आपले वळण जर का नाहीसे झाले तर आपण कुचकामी ठरू. परिपक्व माणसेच स्वराज्य भोगू शकतात, उच्छृंखल नव्हेत. आणखी असे पहा की प्रो. गोखले यांनी ज्या वेळीं हिंदुस्तानच्या शिक्षणकार्याला स्वतःला वाहून घेतले त्या वेळी तसे करणारे किती लोक होते? मला तरी निश्चितपणे असे वाटते की प्रो. गोखले जे काही करतात ते शुद्ध बुद्धिने आणि हिंदुस्तानचे हित समजूनच करतात. हिंदुस्तानसाठी आपला प्राण द्यावा लागला तरी ते तो देतील, इतकी त्यांची देशभक्ती प्रखर आहे. ते जे काही बोलतात ते कोणाची खुशामत करावी म्हणून नव्हे, तर ते त्यांना खरे वाटते म्हणून. म्हणून त्यांच्याविषयी आपल्या मनात पूज्यभाव असला पाहिजे.

**वाचक**: तर मग ते जे काही सांगतात त्याप्रमाणे वागावे काय?

**संपादक**: तसे मी म्हणत नाही. शुद्ध बुद्धिने आपले मत वेगळे झाले तर प्रोफेसरसाहेब आपण होऊनच तुम्हाला तुमच्या मताप्रमाणे वागा असे सांगतील. आपले मुख्य काम हे आहे की, आपण त्यांच्या कामाची निंदा करू नये. ते आपल्यापेक्षा महान आहेत. हे लक्षात घेऊन त्यांच्या मानाने हिंदुस्तानासाठी आपण काहीच केलें नाही अशी खात्री बाळगावी. काही वर्तमानपत्रे त्यांच्याविषयी अनादराने लिहितात. त्यांचा आपण निषेध केला पाहिजे आणि प्रो. गोखलेसारख्यांना स्वराज्याचे आधारस्तंभ समजले पाहिजे. त्यांचे विचार चुकीचे आणि आपले तेवढे खरे, किंवा आपल्या विचाराप्रमाणे जो वागत नाही तो देशाचा शत्रू असे समजून चालणे ही मनोवृत्ति वाईट आहे.

**वाचक**: तुमचे काय म्हणणे आहे ते आता मला थोडेसे समजू लागले आहे. तरी त्याविषयी मला विचार करावा लागेल. परंतु श्री. ह्यूम, सर

विल्यम वेडरबर्न इत्यादींच्याविषयी तुम्ही जे सांगितलेत ती म्हणजे तर कमालच झाली.

**संपादक:** जो न्याय हिंदी लोकांना तोच न्याय इंग्रजांनाही लागू समजावा. सगळेच इंग्रज वाईट असे मी तर म्हणणार नाही. हिंदुस्तानला स्वराज्य मिळावे अशी इच्छा बाळगणारे पुष्कळ इंग्रज आहेत. त्या लोकांत स्वार्थ जास्त आहे ही गोष्ट खरी, परंतु त्यावरून प्रत्येक इंग्रज वाईट असतो असे सिद्ध होत नाही. जे दुसऱ्यांकडून हक्काची- न्यायाची अपेक्षा ठेवतात त्यांना सर्वांशी न्यायाने वागावे लागेल. सर विल्यम हिंदुस्तानचे अहित चिंतणारे नाहीत एवढी गोष्ट आपल्याला पुरेशी आहे. जसजसे आपण पुढे जाऊ तसतसे दिसून येईल की, जर आपण न्यायाची वृत्ति ठेवली तर हिंदुस्तान लवकर स्वतंत्र होईल. तसेच तुम्हाला हेसुद्धा दिसून येईल की, जर आपण एकूण एक इंग्रजाचा द्वेष करू लागलो तर त्यामुळे स्वराज्य दुरावेल. परंतु त्यांच्याशी वागतानाही जर आपण न्यायवृत्ति ठेवली तर स्वराज्यप्राप्तीच्या कामी आपल्याला त्यांची मदत मिळेल.

**वाचक:** तुमचे बोलणे आज तरी मला निरर्थक वाटते. इंग्रजांची मदत मिळणे आणि स्वराज्य मिळणे या दोन अगदी परस्पर-विरोधी गोष्टी तुम्ही सांगितल्यात. स्वराज्याचे आणि इंग्रजांचे काय नाते? तरी पण या प्रश्नाचे उत्तर तुमच्याकडून आताच मला नको आहे. त्यात वेळ फुकट कशाला घालवा? स्वराज्य कसे मिळेल हे जेव्हा तुम्ही सांगाल तेव्हा तुमचे त्यासंबंधीचे विचार मला कदाचित् समजले तर समजतील. संध्या तरी इंग्रजांच्या मदतीचा मुद्दा काढून मला तुम्ही संशयात टाकले आहे आणि तुमच्या विचाराच्या बाबतीत माझे मन पूर्वग्रहदूषित झाले आहे. तेव्हा हा विषय आता न लांबविणे बरे.

**संपादक:** इंग्रजांविषयीचा हा विचार मी लांबवू इच्छित नाही. तुमच्या मनांत संशय उत्पन्न झाल्याची काही चिंता नाही. गळी न उतरण्यासारखे मला जे सांगायचे आहे ते अगोदरच सांगून टाकलेले बरे. तुमचा संशय सबूरीने दूर करणे हे माझे कर्तव्य आहे.

**वाचक:** तुमचे हे म्हणणे मला आवडले. त्यामुळे मला जे बरोबर वाटते ते बोलण्याची हिंमत आली. अजून माझी एक शंका राहिली आहे. काँग्रेसच्या स्थापनेने स्वराज्याचा पाया घातला गेला, तो कसा?

**संपादक:** हे पहा, काँग्रेसनेच प्रथम वेगवेगळया भागांतील भारतीय लोकांना एकत्र करून त्यांच्या मनांत आपण सर्व 'एक राष्ट्र आहोत' अशी उत्कट भावना उत्पन्न केली.

काँग्रेसवर सरकारची करडी नजर असायची. महसुलासंबंधीचा हक्क लोकांना असला पाहिजे अशी काँग्रेसने नेहमी मागणी केली आहे. कॅनडाच्या धर्तीवर आपल्याला स्वराज्य मिळावे अशी काँग्रेसची नेहमीच इच्छा राहत आली आहे. तसे मिळेल किंवा न मिळेल, ते हवे की नको, त्याहून दुसरे अधिक चांगले आहे काय, हा प्रश्न वेगळा. मला एवढेच दाखवायचे आहे की, काँग्रेसनेच हिंदुस्तानाला स्वराज्याची गोडी लावली. इतरांनी त्याचे श्रेय घेऊ पाहणे योग्य नव्हे. आणि तसे आपण मानले तर कृतघ्न ठरूं. इतकेच नव्हे तर त्यामुळे आपला जो उद्देश आहे तो पार पाडण्याच्या मार्गात अडचणी उत्पन्न होतील. काँग्रेसशी संबंध तोडल्याने आणि तिला स्वराज्याच्या विरोधी गणल्याने आपल्याला तिचा उपयोग करून घेता येणार नाही.

## २. बंगालची फाळणी

**वाचक:** तुम्ही म्हणता त्याप्रमाणे विचार करता काँग्रेसमुळे स्वराज्याचा पाया घातला गेला हे बरोबर वाटते. तरी ती काही खरी जागृति म्हणता येणार नाही हे तुम्हालाही कबूल करावे लागेल. खरी जागृति केव्हा आणि कशी झाली?

**संपादक:** बीज कधी दिसत नाही; ते आपले काम मातीच्या खाली करते आणि ते नष्ट होऊन जाते तेव्हाच झाड जमिनीवर येते. काँग्रेसविषयी तसेच

समजा. जिला तुम्ही खरी जागृति म्हणता ती बंगालच्या फाळणीमुळे झाली. त्याकरिता लॉर्ड कर्झनचे आभार मानले पाहिजेत. बंगालच्या फाळणीच्या वेळी बंगाली लोकांनी कर्झनसाहेबांच्या फार विनवण्या केल्या, पण ते आपल्या सत्तेच्या दर्पात बेपर्वा राहिले. भारतीय लोक काय, फक्त बडबड करतील, बाकी त्यांच्या हातून काही व्हायचे नाही, असे ते समजून चालले. त्यांनी अपमानास्पद भाषा वापरली आणि जबरदस्तीने बंगालचे तुकडे केले. या दिवसापासून इंग्रजी राज्याचे तुकडे झाले असे म्हणता येईल. बंगालच्या फाळणीने जो धक्का इंग्रजी सत्तेला मिळाला तो दुसऱ्या कोणत्याही गोष्टीने मिळालेला नाही. त्याचा अर्थ असा नव्हे की दुसरे जे अन्याय झाले ते या फाळणीपेक्षा कमी महत्त्वाचे होते. मिठावरचा कर हा काही लहान अन्याय नव्हे. अशा आणखी बऱ्याच गोष्टी आपल्याला दिसतील. पण बंगालच्या फाळणीला विरोध करायला लोकांची तयारी झाली होती. लोकांची भावना त्या वेळी तीव्र होती. त्या वेळी बंगालचे पुष्कळ पुढारी आपले सर्वस्व गमवायला तयार होते. आपल्या सामर्थ्याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे एकदम भडका उडाला. तो आता विझण्याजोगा नाही, विझविण्याची जरूरीही नाही. फाळणी मोडेल, बंगाल पुन्हा एक होईल, पण इंग्रजांच्या जहाजाला जी भेग पडली आहे ती आता राहणारच. ती दिवसेंदिवस रुंदावत जाईल. जागा झालेला हिंदुस्तान परत झोपी जाईल हे अशक्य आहे. फाळणी रद्द करण्याची मागणी ही स्वराज्याचीच मागणी आहे. बंगालचे पुढारी ही गोष्ट बरोबर जाणून आहेत. इंग्रज सत्ताधारीही ते जाणून आहेत. म्हणूनच फाळणी रद्द झाली नाही. जसजसे दिवस जात आहेत तसतशी लोकांची तयारी होत आहे. राष्ट्राची घडण काही एका दिवसात होत नसते, त्यासाठी अनेक वर्षे लागतात.

**वाचक**: फाळणीचे परिणाम तुम्हाला काय दिसले?

**संपादक**: आजवर आपण असे समजून चाललो की बादशहाकडे अर्ज करावे आणि अर्ज करून दाद नाही मिळाली तर सहन करीत रहावे; तरीही अर्जसुद्धा करीतच रहावेत. फाळणी झाल्यानंतर लोकांना दिसून

आले की अर्जाच्या मागे बळ पाहिजे, लोकांत क्लेश सोसण्याची शक्ती पाहिजे. हा नवा आवेश हा फाळणीचा मुख्य परिणाम म्हणता येईल. हा आवेश वृत्तपत्रांच्या लेखांत दिसू लागला. लेख कडक होऊ लागले. जी गोष्ट लोक भीत-भीत किंवा गुप्तपणे करीत ती उघड होऊ लागली – लिहिली जाऊ लागली. स्वदेशीची चळवळ सुरू झाली. इंग्रजांना बघून लहान-मोठे पळत सुटत, ते आता भिईनातसे झाले; मारालासुद्धा डरेनातसे झाले; तुरुंगात जायची त्यांना दिक्कत वाटेनाशी झाली. आणि हिंदुस्तानचे काही सुपुत्र तर आज देशाबाहेर हद्दपार झाले आहेत. अर्ज-विनंत्यांपेक्षा हे काहीतरी निराळे घडत आहे. अशा रीतिने लोकांत खळबळ सुरू आहे. बंगालचे वारे उत्तरेकडे पंजाबपर्यंत आणि मद्रास इलाख्यात कन्याकुमारीपर्यंत पोचले आहेत.

**वाचक**: याशिवाय आणखी काही प्रभावी परिणाम तुमच्या लक्षांत येतो का?

**संपादक**: बंगालच्या फाळणीने इंग्रजांच्या जहाजाला जसा तडा गेला आहे तसे आपल्यात सुद्धा तडा गेला आहे, फूट पडली आहे. मोठया घडामोडीचे परिणाम असे मोठेच व्हायचे. आपल्या पुढाऱ्यांत दोन तट पडले आहेत; एक मॉडरेट आणि दुसरा एक्स्ट्रीमिस्ट. त्यांना आपण 'मवाळ' आणि 'जहाल' असे म्हणू शकतो. कोणी मॉडरेटला-भित्रा पक्ष आणि एक्स्ट्रीमिस्टला धाडसी पक्ष असेही म्हणतात. प्रत्येकजण आपापल्या विचाराप्रमाणे त्या दोन शब्दांचा अर्थ करतात. हे पक्ष जे पडले आहेत त्यांच्यात कडवटपणाही उत्पन्न झाला आहे, ही गोष्ट मात्र खरी. त्यांना एकमेकांबद्दल अविश्वास वाटतो आणि ते परस्परांना टोमणे मारीत असतात. सुरतेच्या काँग्रेसच्या वेळी जवळ जवळ मारामारीच झाली. असे दोन पक्ष पडणे हे लक्षण देशाच्या दृष्टीने ठीक नाही असे मला तरी वाटते; पण मी असेही मानतो की, असे पक्ष फार काळपर्यंत टिकणार नाहीत. किती काळपर्यंत ही फूट राहील हे पुढाऱ्यांवर अवलंबून आहे.

# ३. अस्वस्थता आणि असंतोष

**वाचक**: तर मग वंगभंग हे तुम्ही जागृतिचे कारण मानता. त्याने पसरलेली अस्वस्थता ही योग्य म्हणायची की अयोग्य?

**संपादक**: माणूस झोपेतून उठला की आळोखेपिळोखे देतो. इकडे-तिकडे फेऱ्या मारतो आणि थोडा वेळ तो अस्वस्थ असतो. त्याला पुरते भान यायला वेळ लागतो. तसेच वंगभंगाने जागृति झाली खरी, पण सुस्ती गेलेली नाही. अजून आळस देण्याच्या अवस्थेत आपण आहोत. अजून अवस्था अशांतिची आहे. जशी झोप आणि जागेपणा यांच्यामधली अवस्था आवश्यकच म्हणायची, आणि म्हणून ती योग्य आहे असे म्हणायचे, तशी बंगालमध्ये आणि म्हणून हिंदुस्तानात जी अस्वस्थता आहे तीसुद्धा योग्य म्हणता येईल. अस्वस्थता आहे हे आपल्याला माहित आहे, त्यामुळे त्या अवस्थेतून आपण बाहेर पडू शकू. झोपेतून उठल्यानंतर एकसारखे आपण काही आळसच देत राहत नाही, तर आपल्या प्रकृतिप्रमाणे थोडाफार वेळ घेऊन मग पुरते जागे होतो. तसेच आजच्या अवस्थेतून आपण अवश्य बाहेर पडू. अस्वस्थता ही काही कोणाला आवडणारी गोष्ट नाही.

**वाचक**: अस्वस्थतेचे दुसरे रूप कोणते म्हणता येईल?

**संपादक**: अस्वस्थता हा खरे पाहता असंतोषच आहे. तिला आज आपण 'अन्‌रेस्ट' (unrest) म्हणतो. काँग्रेसच्या काळीं त्याला डिस्कन्टेन्ट' (discontent) म्हणत. मि. ह्यूम नेहमी म्हणत की हिंदुस्तानात असंतोष पसरविण्याची जरूरी आहे. असंतोष ही फार उपयुक्त गोष्ट आहे. जोपर्यंत मनुष्य आपल्या वर्तमान स्थितीत संतुष्ट राहतो तोपर्यंत त्याला त्यातून बाहेर पडण्याविषयी समजाविणे ही कठीण गोष्ट आहे. म्हणून कोणत्याही सुधारणेच्यापूर्वी असंतोष असलाच पाहिजे. वर्तमान वस्तुविषयी असंतोष उत्पन्न होतो तेव्हाच ती टाकून द्यायचे मनात येते. तसा असंतोष थोर भारतीय पुरुषांची आणि इंग्रजांची पुस्तके वाचून आपल्या मनात उत्पन्न झाला आहे. त्या असंतोषाने अस्वस्थता आली, आणि त्यातून कित्येक

मेले, कित्येक भणंगभिकारी झाले, कित्येक हद्दपार झाले, कित्येक तुरुंगात पडले. ही सर्व चिह्ने चांगली म्हणता येतील. पण त्यांचा परिणाम वाईट होण्याचीही शक्यता आहे.

## ४. स्वराज्य म्हणजे काय?

**वाचक:** काँग्रेसने हिंदुस्तानला एक राष्ट्र करण्याकरिता काय केले, वंगभंगाने जागृति कशी झाली, अस्वस्थता आणि असंतोष कसा पसरला, हे समजले. आता स्वराज्याविषयी तुमचे विचार काय आहेत हे मी समजून घेऊ इच्छितो. तुमच्या-माझ्या समजुतीत कदाचित् फरक असावा अशी मला शंका आहे.

**संपादक:** फरक असण्याचा संभव आहे. स्वराज्याकरिता आपण सर्वजण अधीर झालेलो आहो, पण ते काय आहे या बाबतीत आपण निश्चित मतावर पोचलेलो नाही. इंग्रजांना हाकून लावायचे हा विचार बहुतेकांच्या तोंडून ऐकायला येतो, पण ते कशाकरिता याचा काही बरोबर विचार झाला आहे असे वाटत नाही. तुम्हालाच मी एक प्रश्न विचारतो. कदाचित् जेवढे आपण मागतो तेवढे सगळे इंग्रजांनी दिले तरीही इंग्रजांना हाकून लावण्याची जरूर तुम्हाला वाटेल का?

**वाचक:** मी आपला त्यांच्याकडे एकच गोष्ट मागेन की, कृपा करून तुम्ही आमच्या देशातून निघून जा. ही मागणी त्यांनी कबूल केली आणि मग ते हिंदुस्तानातून गेले, तरी ते राहिले असा अर्थाचा अनर्थ कोणी करून दाखविला तर मला हरकत नाही. मग असे समजू की 'गेले' या शब्दाचा अर्थ कोणी 'राहिले' असाही करतात.

**संपादक:** बरे तर, आपल्या मागणीप्रमाणे इंग्रज गेले असे आपण समजून चालू या. त्यानंतर तुम्ही काय कराल?

**वाचक:** या प्रश्नाचे उत्तर आत्ताच देता येणार नाही. ज्या रीतिने ते

जातील त्यावर मागाहूनची स्थिति अवलंबून राहील. तुम्ही म्हणता तसे ते गेले तर मला वाटते की त्यांनी घालून दिलेली राज्यव्यवस्था आपण तशीच ठेवू आणि राज्यकारभार चालवू. ते सरळच निघून गेले तर आपल्याजवळ लष्कर वगैरे तयारच असेल, तेव्हा आपल्याला राज्यकारभार चालवायला अडचण येणार नाही.

**संपादक**: तुम्ही खुशाल तसे समजा, मला मात्र तसे वाटत नाही. तरी मी आत्ताच त्या बाबतीत जास्त चर्चा करू इच्छित नाही. मला तुमच्या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. ते मी तुम्हालाच काही प्रश्न विचारून चांगल्या रीतिने देऊ शकेन. तेवढ्यासाठी काही प्रश्न विचारतो. आपण इंग्रजांना कशासाठी हाकून देऊ इच्छितो?

**वाचक**: कारण त्यांच्या राज्यकारभारामुळे देश कंगाल बनत चालला आहे. ते दरसाल देशातून पैसे घेऊन जात आहेत. ते गोऱ्या लोकांनाच मोठया अधिकाराच्या जागा देतात, आम्हाला मात्र गुलामीत ठेवतात आणि आमच्याशी उर्मटपणाने वागतात. आमची मुळीसुद्धा पर्वा करीत नाहीत.

**संपादक**: ते पैसे बाहेर घेऊन गेले नाहीत, नम्र बनले आणि आपल्याला मोठया अधिकाराच्या जागा दिल्या, तरी त्यांच्या राहण्याने तोटा होईल असे तुम्हाला वाटते?

**वाचक**: हा प्रश्नच निरर्थक आहे. वाघाने आपले रूप बदलले तर त्याच्याशी मैत्री करण्यात नुकसान आहे का, अशाच प्रकारचा तुमचा प्रश्न आहे. हा प्रश्न विचारणे म्हणजे निष्कारण वेळेचा अपव्यय करणे आहे. वाघ जर आपला स्वभाव बदलील तर इंग्रज आपले वळण सोडतील. जे घडण्याजोगे नाही ते घडेल असे समजणे ही काय माणसाची रीत झाली?

**संपादक**: कॅनडाला जे राज्याधिकार मिळाले आहेत, बोअर लोकांना जे मिळाले आहेत, तसेच आपल्याला मिळाले तर?

**वाचक**: हासुद्धा निरर्थक प्रश्न आहे. आपल्याजवळ त्यांच्यासारखा दारूगोळा असेल तेव्हाच तसे होईल. पण जेव्हा त्या लोकांच्याइतकी सत्ता आपल्याला इंग्रज देतील तेव्हा आपण आपलाच झेंडा फडकवूं. जसे

जपान तसे हिंदुस्तान. आपण आपले स्वत:चे आरमार, स्वत:ची फौज, स्वत:चे वैभव उभारू. तेव्हाच भारताचा साऱ्या जगात बोलबाला होईल.

**संपादक**: चित्र तर तुम्ही चांगले रेखाटलेत. याचा अर्थ असा झाला की आपल्याला इंग्रजी राज्य पाहिजे, पण इंग्रज नकोत. तुम्हाला वाघाचा स्वभाव पाहिजे, पण वाघ नको. म्हणजे तुम्ही हिंदुस्तानला इंग्रजी बनवू इच्छित आहा. आणि जेव्हा हिंदुस्थान इंग्रजी होईल तेव्हा त्याला हिंदुस्तान म्हटले जाणार नाही, तर इंग्लिस्तान म्हटले जाईल. स्वराज्याची माझी कल्पना अशी नाही.

**वाचक**: मी माझ्या विचारानुसार स्वराज्याची कल्पना मांडली. आपण जे शिक्षण घेतो ते जर उपयोगाचे असेल; स्पेन्सर, मिल्स, वगैरे महान लेखकांची पुस्तके आपण वाचतो ती काही उपयोगाची असतील, इंग्रजांचे पार्लमेंट जर पार्लमेंटांची माता असेल तर मला नि:शंकपणे असे वाटते की, आपण त्या लोकांची नक्कल केली पाहिजे; ती येथपर्यंत की जसे ते आपल्या देशात दुसऱ्यांना शिरू देत नाहीत तसे आपणही कोणाला शिरू देता कामा नये. बाकी त्यांनी आपल्या देशात ज्या काही गोष्टी केल्या आहेत तशा अजून इतर ठिकाणी काही पहायला मिळत नाहीत. म्हणून आपण त्या तर दाखल करणेच योग्य होईल. पण आता तुमचा विचार काय तो सांगा.

**संपादक**: अजून अवकाश आहे. माझे विचार आपोआप या चर्चेत समजून येतील. स्वराज्याचा अर्थ समजून घेणे तुम्हाला जितके सोपे वाटते तितकेच मला कठिण वाटते. म्हणून ज्याला तुम्ही स्वराज्य म्हणून समजता ते खरे पाहता स्वराज्य कसे नाही हे तुम्हाला समजावून देण्याचाच तूर्त मी प्रयत्न करणार आहे.

# ५. इंग्लंडची स्थिती

**वाचक:** तर मग तुमच्या बोलण्यावरून मी असे अनुमान करतो की इंग्लंडची राज्यपद्धती बरोबर नाही आणि आपल्याला ती इष्टही नाही.

**संपादक:** तुमचे अनुमान बरोबर आहे. इंग्लंडात आज जी स्थिति आहे ती खरोखर दयाजनक आहे, आणि माझे तर ईश्वरापाशी मागणे आहे की तशी स्थिति हिंदुस्तानची कधी न होवो. तुम्ही ज्याला पार्लमेंटची माता म्हणता ते इंग्लंडचे पार्लमेंट वांझोटे आहे आणि वेश्या आहे. हे दोन्ही शब्द कडक असले तरी त्याला बरोबर लागू पडणारे आहेत. मी त्याला वांझोटे म्हटले, कारण की आजपर्यंत पार्लमेंटाने आपण होऊन एकसुद्धा चांगले काम केलेले नाही. त्याच्यावर बाहेरून दडपण आणणारे कोणी नसेल तर ते काहीच करणार नाही अशी त्याची स्वाभाविक स्थिति आहे. आणि ते वेश्या अशासाठी म्हणायचे की जे प्रधानमंडळ त्याला हातात ठेवील त्याच्यापाशी ते राहते. आज त्याचा धनी ॲस्क्विथ, तर उद्या बाल्फोर, तर परवा तिसरा कोणी.

**वाचक:** हे तुम्ही उपरोधाने बोलतात. वांझोटे हा शब्द कसा लागू होतो ते तुम्ही दाखविले नाही. पार्लमेंट हे लोकांनी बनविलेले असते, अर्थात् ते लोकांच्या दाबाखालीच काम करणार हे उघड आहे. तोच त्याचा गुण आणि त्यावरचा अंकुश आहे.

**संपादक:** हा एक मोठा भ्रम आहे. पार्लमेंट जर वांझोटें नसेल तर काय झाले पाहिजे? लोक त्यात उत्तमात उत्तम सभासद निवडून पाठवितात; सभासद पगार न घेता, म्हणजेच लोककल्याणाकरिता, तेथे जातात असे झाले पाहिजे. लोक स्वत: शिक्षित म्हटले जातात तेव्हा ते चूक करणार नाहीत असे आपण समजले पाहिजे. अशा पार्लमेंटकडे अर्ज पाठविण्याचे काय कारण? त्यावर दडपण आणण्याचे काय कारण? त्या पार्लमेंटचे काम इतके सरळ असले पाहिजे की दिवसेंदिवस त्याचे तेज अधिकाधिक पडावे आणि लोकांवर त्याचा परिणाम होत जावा. त्याच्याऐवजी

प्रकारे मांडतात. एका पक्षाची वृत्तपत्रे जी गोष्ट मोठी करून दाखवतील तीच दुसऱ्या पक्षाची वृत्तपत्रे क्षुल्लक म्हणून सांगतील. एक पत्रकार ज्या इंग्रज पुढाऱ्याला प्रामाणिक म्हणेल त्याला दुसरा अप्रामाणिक म्हणेल. अशी वृत्तपत्रे ज्या देशांत आहेत त्या देशातील माणसांची काय दुर्दशा असेल?

**वाचक**: ती तुम्हीच सांगा.

**संपादक**: ते लोक घटकेघटकेला विचार बदलतात. तशी तर त्या लोकांत एक म्हणच आहे की दर सात वर्षांनी रंग पालटतो. घड्याळाच्या लंबकाप्रमाणे ते लोक हेलकावे खात असतात, स्थिर होऊच शकत नाहीत. कोणी माणूस जरा जोरदार बोलणारा आणि आडव्यातिडव्या गोष्टी करणारा असला किंवा त्यांना मेजवान्या वगैरे देणारा असला की त्यांचे ढोलके बडवायला त्यांनी सुरुवात केलीच. अशा माणसांचे पार्लमेंट तसेच असणार. त्यांच्यात एक गोष्ट मात्र आहे. ती ही की, ते आपला देश हातचा कधी जाऊ देणार नाहीत; आणि जर कोणी त्याच्याकडे वाकडा डोळा करून बघेल तर ते त्याचे डोळेच फोडून टाकतील. पण ह्यामुळे हे लोक सर्वगुणसंपन्न झाले असे नाही किंवा त्या लोकांची नक्कल केली पाहिजे असेही म्हणता येणार नाही. जर हिंदुस्तान इंग्रज लोकांची नक्कल करू लागेल, तर त्याचा सर्वनाश होईल अशी माझी पूर्ण खात्री आहे.

**वाचक**: इंग्रज लोकांची अशी अवस्था झाली याची कारणे तुम्हाला काय वाटतात?

**संपादक**: त्यात इंग्रजांचा खास दोष नाही. तो त्यांचा नव्हे, युरोपच्या आजच्या सभ्यतेचाच दोष आहे. ती सभ्यता नुकसानकारक आहे, आणि त्यामुळे युरोपच्या लोकांचा सर्वनाश होत आहे.

# ६. सभ्यतेचे दर्शन

**वाचक:** आता तुम्हाला सभ्यतेसंबंधीही सांगावे लागेल. तुमच्या मते ही सभ्यता नुकसानकारक आहे.

**संपादक:** माझ्या मतेच नव्हे, तर इंग्रज लेखकांच्या मतेसुद्धा ती तशी आहे; त्यासंबंधी पुष्कळ पुस्तके लिहिली गेली आहेत. त्यांच्यात सभ्यतेला विरोध करणारी मंडळेही स्थापली जात आहेत. एका इंग्रज माणसाने 'सभ्यता: तिची कारणे आणि इलाज' ह्या नावाचे पुस्तक लिहिले आहे; त्यात त्याने हा एक प्रकारचा रोग आहे असे दाखवून दिले आहे.

**वाचक:** हे सर्व आपल्याला कळत कसे नाही?

**संपादक:** त्याचे कारण उघड आहे. कोणीही स्वत:च्या विरुद्ध बोलतो असे क्वचितच घडते. आजच्या सभ्यतेच्या मोहात सापडलेले लोक तिच्याविरुद्ध लिहिणार नाहीत, उलट तिला पुष्टि मिळेल अशा गोष्टी आणि युक्तिवाद ते शोधून काढतील. हे ते जाणूनबुजून करतात असेही नाही. आपण जे लिहितो ते त्यांना खरेच वाटत असते. झोपेत असलेला माणूस त्याला जे स्वप्न पडले ते खरेच मानीत असतो. जेव्हा त्याची झोप उडते तेव्हाच त्याला आपली चूक उमगून येते. अशी दशा सभ्यतेच्या मोहात अडकलेल्या माणसांची आहे. आपण जे काही वाचतो ते सभ्यतेच्या पुरस्कर्त्यांचेच लिखाण असते. त्यांच्यात पुष्कळ बुद्धिमान आणि सज्जन अशीही माणसे आहेत. त्यांच्या लिखाणाने आपण दिपून जातो. अशी एकामागून एक माणसे जाळ्यात अडकत जातात.

**वाचक:** हे तुम्ही बरोबर बोललात. तुम्ही याबाबत जे वाचले आहे आणि विचार केला आहे त्याची आता कल्पना द्या.

**संपादक:** अगोदर आपण 'सभ्यता' हे नाव कोणत्या स्थितिला देण्यात येते याचा विचार करू. या सभ्यतेची खरी ओळख अशी की लोक बाह्य वस्तूंच्या शोधात आणि शरीरसुखात सार्थकता आणि पुरुषार्थ मानतात. त्याची काही उदाहरणे पाहू. शंभर वर्षांपूर्वी जशा घरांत युरोपचे लोक

राहत असत त्यापेक्षा आज अधिक चांगल्या घरांत राहतात. ही सुधारणेची खूण म्हणता येईल. शरीरसुख हा त्यातील विचार आहे. त्यापूर्वी माणसे कातड्याची वस्त्रे घालीत आणि भाले वापरीत. आता ते लांब विजारी घालतात आणि शरीर सजविण्याच्या दृष्टीने तऱ्हेतऱ्हेचे कपडे बनवितात. तसेच भाल्याऐवजी एकामागून एक अनेक जखमा करता येतील अशी लहानशी यांत्रिक बंदूक वापरतात, ही सुधारणेची खूण आहे. एखाद्या देशाची माणसे जोडे वगैरे वापरीत नाहीत. ती जेव्हा युरोपचे कपडे घालायला शिकतात तेव्हा जंगली अवस्थेतून सुधारलेल्या अवस्थेत ती आली असे समजले जाते. पूर्वी युरोपात माणसे सामान्य नांगराने आपल्यापुरती जमीन अंगमेहनतीने कसत असत; त्याऐवजी आता वाफेवर चालणाऱ्या यंत्रांच्या नांगराने एक मनुष्य पुष्कळ जमीन कसू शकतो आणि पुष्कळ पैसा साठवू शकतो; ही सुधारणेची खूण समजली जाते. पूर्वी माणसे क्वचित् एखादे पुस्तक लिहीत व ते अमूल्य मानले जाई. आज ज्याच्या मनात जसे येईल तसे तो लिहितो छापतो आणि लोकांच्या मनात भ्रम उत्पन्न करतो. ही सुधारणेची खूण आहे. पूर्वी माणसे बैलगाड्यांनी दिवसाला बारा कोसांची मजल करीत. आज रेल्वेने चारशे मैलांची मजल मारू शकतात; हा तर सुधारणेचा कळस झाला असे समजतात. सभ्यता जसजशी वाढत जात आहे तसे, माणसे विमानाने प्रवास करतील आणि काही थोड्या तासांत जगातल्या वाटेल त्या भागात पोचतील असे मानण्यात येत आहे. माणसांना हातपाय वापरण्याची गरजच पडणार नाही. एक बटन दाबले की अंगात घालायचा पोषाख येऊन पडेल, दुसरे बटन दाबले की वृत्तपत्रे येतील, तिसरे बटन दाबले की त्याची गाडी तयार राहील. नित्य नवी पक्वान्ने मिळतील. हातांचा किंवा पायांचा उपयोगच करावा लागणार नाही; सगळी कामे यंत्रांकडून करवून घेण्यात येतील. पूर्वी माणसे जेव्हा लढू इच्छित तेव्हा एकमेकांचे शरीरबळ अजमावून बघत. आता काय, तोफेच्या एका गोळ्याने हजारो लोकांचे प्राण घेता येतात. ही सुधारणेची खूण आहे. पूर्वी लोक मोकळ्या हवेत आपल्याला बरे वाटेल तेवढे स्वतंत्रपणे

काम करीत. आता हजारो मजूर आपल्या पोटासाठी एकत्र येऊन मोठया कारखान्यात किंवा खाणीत काम करतात. त्यांची दशा जनावरापेक्षासुद्धा वाईट झालेली आहे. शिशाच्या वगैरे कारखान्यात त्यांना प्राण धोक्यात घालून काम करावे लागते. त्याचा फायदा मात्र धनिकांना मिळतो. पूर्वी माणसांना मारून ठोकून गुलाम करीत; आज माणसांना पैशाची आणि चैनीची लालूच दाखवून गुलाम बनवितात. पूर्वी लोकांत नव्हते ते रोग आज उत्पन्न झाले आहेत आणि त्याचबरोबर ते कसे नाहीसे करायचे याच्या शोधामागे डॉक्टर लोक लागले आहेत. ह्यामुळे इस्पितळे वाढली आहेत; ही सुधारणेची खूण गणली जाते. पूर्वी पत्रे लिहीत त्या वेळी खास मनुष्य पाठविला जायचा आणि त्याला फार खर्च येई. आज मला कोणाला शिव्या देणारे पत्र लिहायचे असले की एका दिडकीत मी शिव्या देऊ शकतो; कोणाला धन्यवाद द्यायचे असले तरी तेसुद्धा तितक्याच किंमतीत देऊ शकतो. ही सुधारणेची खूण आहे. पूर्वी माणसे दोन किंवा तीन वेळा जेवीत आणि हातांनी भाजलेली भाकरी आणि थोडी भाजी असली की काम भागे. आता दोन-दोन तासांनी खायला पाहिजे, आणि ह्यामुळे खाण्यातून लोक मोकळेच होत नाहीत. आता किती सांगू? हे सर्व तुम्हाला कोणत्याही पुस्तकात पाहता येईल. सभ्यतेची ही सर्व खरी चिह्ने आहेत. आणि जर कोणी एखादा याहून वेगळे काही समजावू लागला तर तो खुळा आहे असे खुशाल समजा. सभ्यता मी सांगितली तीच समजली जाते. तिच्यात नीति-धर्म वगैरे काही नाही. सभ्यतेचे पुरस्कर्ते स्पष्ट सांगतात की त्यांचे काम लोकांना धर्म शिकविण्याचे नाही. धर्म म्हणजे ढोंग असेही कित्येक मानतात. कित्येकजण धर्माचा आव आणतात, नीतिच्या गोष्टी सांगतात, पण मी तुम्हाला माझ्या वीस वर्षांच्या अनुभवानंतर सांगतो की नीतीच्या नावावर अनीति शिकविली जात आहे. नीति वरवरच्या गोष्टीत असू शकत नाही हे लहान मुलालासुद्धा समजण्याजोगे आहे. शरीराचे सुख कसे मिळेल हेच ही सभ्यता शोधीत असते; तेच देण्याची ती धडपड करते. पण ते सुखसुद्धा मिळू शकत नाही.

ही सभ्यता म्हणजे अधर्म आहे आणि तो युरोपात इतक्या थरापर्यंत पसरला आहे की, तेथील माणसे अर्धवट वेडी झालेली आढळतात. त्यांच्यात खरी वीर्यशक्ती नसते; आपला जोम नशा-पाण्याने ते टिकवून धरतात. एकांतात त्यांना सुख लाभत नाही. स्त्री ही घरची राणी असली पाहिजे, पण स्त्रियांना गल्लाबोळांत भटकावे लागते किंवा मजुरीला जावे लागते. इंग्लंडातच चाळीस लाख गरीब स्त्रिया पोटाकरिता ढोरमजुरी करतात आणि हल्ली त्यामुळेच सफ्रेजेटची चळवळ (स्त्रियांना मताधिकार दिला पाहिजे यासंबंधीची) सुरू झाली आहे.

ही सभ्यता अशी आहे की, आपण धीर धरला तर हिच्या झपाट्यात सापडलेली माणसे स्वतःच पेटविलेल्या आगीत आपोआप जळून भस्म होतील. पैगंबर महंमदांच्या शिकवणुकीत म्हटल्याप्रमाणे याला सैतानी राज्य म्हणता येईल. हिंदुधर्म याला घोर कलियुग म्हणतो. या सभ्यतेचे यथार्थ चित्र मला रेखाटता येणार नाही. माझ्या शक्तिबाहेरचे ते काम आहे. पण या सभ्यतेने इंग्रज समाजाला कीड लागली आहे हे तुम्ही पक्के समजा. ही नाशकारी आणि नाशवंत आहे. तिच्यापासून दूर राहणे हेच योग्य आहे. तिच्यामुळेच इंग्लंडचे पार्लमेंटे आणि इतर पार्लमेंटे कुचकामी झाली आहेत. हे पार्लमेंट म्हणजे लोकांच्या गुलामगिरीचे चिह्न बनले आहे यात बिलकुल शंका नको. तुम्ही स्वतः वाचाल आणि विचार कराल तर तुम्हालासुद्धा तसेच वाटेल. इंग्रजांना त्यात दोष देण्याचे कारण नाही. त्यांची कींवच केली पाहिजे. ते बहादूर लोक आहेत, म्हणून ते या जाळ्यातून बाहेर पडतील असे मला वाटते. ते धाडसी आहेत आणि कष्टाळू आहेत. त्यांचे विचार मुळात अनीतियुक्त नाहीत, म्हणून त्यांच्यासंबंधी माझ्या मनात उत्तम भावनाच आहे. हाडाचे ते वाईट नाहीत. सभ्यता हा त्यांच्या बाबतीत असाध्य रोग नाही. पण आज मात्र ते त्या रोगाने पछाडलेले आहेत हे विसरून चालणार नाही.

## ७. हिंदुस्तान कशामुळे गमावले?

**वाचक**: तुम्ही सभ्यतेबद्दल पुष्कळ सांगितलेत, त्यावर विचार केला पाहिजे असे मला वाटायला लागले आहे. युरोपच्या लोकांकडून आपण काय घ्यावे आणि काय घेऊ नये असे संकट आता माझ्यापुढे आहे. पण यातून एक प्रश्न लगेच जो माझ्या डोक्यात येतो तो असा की, ही सुधारणा जर कुधारणा आहे, रोग आहे, तर अशा सभ्यतेत वाढलेल्या इंग्रजांना हिंदुस्तान कसा जिंकता आला आणि ते तो आपल्या हाती कसा ठेवू शकतात?

**संपादक**: तुमच्या या प्रश्नाचे उत्तर देणे आता काहीसे सोपे झाले आहे आणि आता पुढे थोड्या वेळात आपण स्वराज्याचा विचारसुद्धा करू शकू. तुमच्या त्यासंबंधीच्या प्रश्नाचे उत्तर मी अजून दिले नाही हे काही मी विसरलेलो नाही. पण तुमच्या शेवटच्या प्रश्नाकडे आपण अगोदर वळू या. हिंदुस्तान हे इंग्रजांनी घेतले असे नाही, आपण ते त्यांना दिले. हिंदुस्तानात ते स्वतःच्या बळावर टिकलेले नाहीत, तर आपण त्यांना ठेवून घेतले आहे. ते कसे ते पाहू या. तुम्हाला एक आठवण करून देतो की आपल्या देशात इंग्रज हे खरे म्हणजे व्यापाराकरिता आले. तुमची ती 'कंपनीबहादुर' आठवा. तिला बहादुर कोणी बनविले? त्या बिचाऱ्यांचा राज्य करण्याचा हेतूही नव्हता. कंपनीच्या माणसांना कोणी मदत केली? त्यांची चांदी बघून कोण मोहून जाई? त्यांचा माल कोण विकून देई? आपणच हे सर्व करीत असूं याला इतिहास साक्षी आहे. झटकन् श्रीमंत व्हावे या हेतूने आपण त्यांचे मनःपूर्वक स्वागत करीत असू; त्यांना मदत करीत असू. मला भांग पिण्याचे व्यसन असले आणि विकणाऱ्याने मला ती विकली तर त्यात विकणाऱ्याला मी दोष द्यावा की मला स्वतःला? विकणाऱ्याला दोष देण्याने माझे व्यसन थोडेच जाईल? एका दुकान- दाराला हाकून दिले तरी दुसरा मला ती विकणारच, नाही का? हिंदुस्तानच्या खऱ्या सेवकाला खोलवर शोध करून याच्या मुळापर्यंत जावे लागेल.

खूप खाल्ल्याने अपचन झाले, तर पाण्याला नावे ठेवून काही मी अपचन दूर करू शकणार नाही. खरा वैद्य तोच की जो आजाराचे मूळ शोधतो. तुम्हाला हिंदुस्तानच्या रोगाचा वैद्य व्हायचे असेल तर तुम्हाला रोगाचे मूळ शोधल्यावाचून गत्यंतर नाही.

**वाचक**: तुमचे म्हणणे खरे आहे. आता मला पटवून देण्याकरिता तुम्हाला युक्तिवाद करण्याची गरज नाही. तुमचे विचार समजून घ्यायला मी अधीर झालो आहे. आता आपण अत्यंत रसमय भागाकडे वळलो आहोत. तेव्हा तुमचेच विचार मला सांगा. मला जेथे शंका येईल तेथे मी तुम्हाला मधेच थांबवीन.

**संपादक**: बरे तर; पण आपण जसे पुढे जाऊ तसे पुन्हा आपल्यात मतभेद होणारच अशी मला धास्ती आहे. तरी तुम्ही थांबवाल तेव्हाच मी युक्तिवादात उतरेन.

आपण पाहिले की, इंग्रज व्यापाऱ्यांना आपणच उत्तेजन दिले तेव्हा त्यांना हातपाय पसरता आले. असेच आपले राजे लोक जेव्हा आपापसांत भांडले तेव्हा त्यांनी कंपनीबहादुरची मदत मागितली. कंपनीबहादुर व्यापारात आणि लढाईत दोन्हीतही वाकबगार होती. त्यात तिला नीति-अनीतिची अडचण नव्हती. व्यापार वाढवावयाचा आणि पैसा कमवावयाचा हा त्यांचा धंदा होता. त्यात जेव्हा आपण त्यांना मदत दिली तेव्हा त्यांनी ती घेतली आणि आपल्या वखारी वाढविल्या. वखारींचे रक्षण करण्याकरिता त्यांनी फौज ठेवली. त्या फौजेचा आपण उपयोग केला, आणि आता त्यांच्यावर खापर फोडण्यात अर्थ काय? त्या वेळी हिंदु-मुसलमानांच्यात वैर होते. त्यामुळे कंपनीचे फावले. कंपनीला हिंदुस्तानचे राज्य मिळावे यासाठी आपणच संधी निर्माण करून दिल्या. म्हणून आपणच हिंदुस्तान इंग्रजांना दिले हे म्हणणे, हिंदुस्तान गेले या म्हणण्यापेक्षा अधिक सत्य आहे.

**वाचक**: आता इंग्रज हिंदुस्तानला ताब्यांत कसे ठेवू शकतात ते सांगा.

**संपादक**: जसे आपण हिंदुस्तान त्यांच्या ताब्यात दिले त्याच रीतिने त्यांच्याकडे आपण ते राहू देत आहोत. आम्ही हिंदुस्तान तलवारीने घेतले

असे त्यांच्यातले काहीजण सांगतात, आणि तलवारीने ते राखले आहे असे म्हणतात. या दोन्ही गोष्टी चुकीच्या आहेत. हिंदुस्तानला हातात ठेवण्याच्या कामी तलवार काहीच उपयोगाची नाही. आपणच त्यांना राहू देत आहोत.

नेपोलियन इंग्रजांना 'दुकानदारांचे राष्ट्र' म्हणत असे, ते अगदी बरोबर आहे. ते ज्या देशांना ताब्यांत ठेवतात त्यांना व्यापाराच्या हेतूने ठेवतात हे लक्षांत ठेवले पाहिजे. त्यांची फौज आणि आरमार फक्त व्यापाराचे रक्षण करण्याकरिता असतात. ट्रान्सव्हालमध्ये व्यापार नव्हता म्हणून ग्लॅडस्टनसाहेबांच्या एकदम मनात आले की, ट्रान्सव्हाल इंग्रजांनी ताब्यांत ठेवणे बरोबर नाही. पण जेव्हा तेथे व्यापाराच्या संभावना दिसल्या तेव्हा त्यांच्याशी लढाई करण्यात आली आणि मि. चेंबर्लेन यांनी ट्रान्सव्हालवर इंग्रजांची सत्ता आहे असा शोध लावला. मरहूम प्रेसिडेंट क्रूगर यांना एकाने विचारले: 'चंद्रावर सोने आहे की नाही?' त्यांनी उत्तर दिले, 'तेथे सोने असण्याचा संभव नाही, कारण जर असते तर इंग्रज लोकांनी चंद्र आपल्या साम्राज्याला जोडला असता!' पैसा हाच त्यांचा परमेश्वर आहे एवढे लक्षात घेतले की सर्व गोष्टी स्पष्ट होतात.

तेव्हा इंग्रजांना आपण हिंदुस्तानात राहू दिले आहे, ते केवळ आपल्या क्षुद्र स्वार्थाकरिता. आपल्याला त्यांचा व्यापार चांगला वाटतो. कावेबाजपणाने ते आपल्याला खूष ठेवतात आणि स्वतःला हवे ते काम आपल्याकडून करून घेतात. त्यात त्यांना दोष देत बसणे म्हणजे त्यांची सना टिकवून धरण्यासारखेच आहे. त्यात पुन्हा आपण आपापसांत भांडणे करून त्यांची सत्ता अधिक वळकट करतो.

मी सांगितले ते जर तुम्हाला बरोबर वाटत असेल तर, इंग्रज हे व्यापाराच्या हेतूने आले, त्याच हेतूने राहिले, आणि त्यांना ठेवून घ्यायला आपणच कारण आहों, हे सिद्ध झाले असे आपण समजू. त्यांची शस्त्रे अगदी निरुपयोगी आहेत.

या प्रसंगी मी तुम्हाला एक आठवण करून देतो की जपानमध्ये आज इंग्रजांचा झेंडा फडकत आहे असे समजा. जपानशी इंग्रजांनी करार केला

आहे तो स्वत:च्या व्यापाराकरिता; आणि इंग्रज लोक तेथे आपला व्यापार पुष्कळच वाढवतील हे तुम्ही पहाल. इंग्रज लोक आपल्या मालाकरिता जगाला बाजारपेठ करूं पाहत आहेत. ते त्यांना शक्य होणार नाही हे ठीक, पण त्यात त्यांचा काही दोष म्हणता येणार नाही. यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात ते कधी कसूर करणार नाहीत.

## ८. हिंदुस्तानची दशा-१

**वाचक**: हिंदुस्तान इंग्रजांच्या ताब्यात कां आहे हे आता लक्षांत आले. आता हिंदुस्तानच्या स्थितिविषयी तुमचे विचार समजून घेऊ इच्छितो.

**संपादक**: हिंदुस्तानची आज अत्यंत वाईट अवस्था आहे. ती तुम्हाला सांगताना माझ्या डोळ्यांत पाणी येते आणि घसा सुकून जातो. ती अवस्था मला तुम्हाला पुरती समजावून देता येईल की नाही याविषयीसुद्धा मला शंका आहे. हिंदुस्तान इंग्रजांच्या टाचेखाली नव्हे, तर आधुनिक सभ्यतेच्या टाचेखाली चिरडले आहे; तिच्या पकडीत ते सापडले आहे. त्यातून सुटण्याची अजूनही शक्यता आहे; पण जो जो काळ जातो तो तो अडचणी वाढत आहेत. मला धर्म प्रिय आहे, त्यामुळे हिंदुस्तान धर्मभ्रष्ट होत चाललेले आहे याचे मला पहिले दु:ख आहे. 'धर्म' म्हणजे हिंदू, मुसलमान, पारशी, असा अर्थ मी घेत नाही. परंतु या सर्व धर्मांमधला जो धर्म, तो नाहीसा होत चालला आहे; आपण ईश्वराला विन्मुख होत चाललो आहोंत.

**वाचक**: ते कसे?

**संपादक**: हिंदुस्तानवर असा एक आरोप आहे की, आपण आळशी आहोत, आणि गोरे लोक कष्टाळू आणि उत्साही आहेत. हे आपण गृहीत धरून चाललो आहो आणि म्हणून आपण आपली स्थिति बदलू इच्छित आहोत. हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती या सर्व धर्मांची अशी शिकवण आहे की ऐहिक गोष्टीविषयी आपण उदासीन असावे आणि धार्मिक

गोष्टीविषयी उत्साह धरावा. आपण आपल्या ऐहिक लोभाला मर्यादा घालावी आणि धर्माविषयीचा लोभ मोकळा सोडावा, त्याचाच आपण उत्साह धरावा.

**वाचक**: हे तुम्ही दांभिक होण्याचेच शिक्षण देत असलेले दिसता. अशा गोष्टी सांगून भोंदू लोकांनी पुष्कळ फसविले आहे आणि अजून फसवीत आहेत.

**संपादक**: धर्मावर तुम्ही चुकीचा आरोप करीत आहां. दांभिकपणा काय, सर्वच धर्मांच्या लोकांत असतो. उजेड आहे तेथे सावली ही असणारच. सावली प्रत्येक वस्तूला असतेच. धर्माच्या क्षेत्रातले ठगे लोक हे लौकिक व्यवहारांतल्या ठग्यांपेक्षा बरे असे तुम्हाला दिसून येईल. सभ्यतेतील जो दांभिकपणा मी तुम्हाला दाखवून दिला तसा मला धर्माच्या क्षेत्रात आढळला नाही.

**वाचक**: असे कसे म्हणता येईल? धर्माच्या निमित्ताने हिंदु-मुसलमान लढले, धर्माच्या निमित्ताने ख्रिस्ती लोकांत महायुद्धे झाली, धर्माच्या निमित्ताने हजारो निरपराधी माणसे मारली गेली, त्यांना जिवंत जाळण्यात आले, त्यांच्यावर मोठी अरिष्टे आणली गेली. हे सभ्यतेपेक्षा केव्हाही वाईटच म्हणावे लागेल.

**संपादक**: तर मग माझे म्हणणे असे आहे की, सभ्यतेच्या दुःखापेक्षा हे सगळे अधिक सह्य आहे. तुम्ही सांगितलीत ती क्रूर कृत्ये धर्माच्या नावाने केली गेली असली तरी तो धर्माचा भाग नव्हे हे सर्वांना समजते. त्यामुळे असली अधार्मिकता करणारी माणसे मेली की आटोपले. भोळे आणि अज्ञानी लोक आहेत तोवर तसे चालेल. पण सभ्यतेच्या होळीत माणसे जळून मरण्याला काही मर्यादाच नाही. तिच्या भाजून टाकणाऱ्या ज्वाळा सुखाच्या मानून लोक तिच्यात स्वाहा होतात हे तिचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे ना अरत्र ना परत्र, काहीच राहत नाही. त्यांना खऱ्या वस्तूचा अगदी विसर पडतो. सभ्यता ही उंदरासारखी फुंकर घालून कुरतडते. तिचा परिणाम शेवटी कळून येईल तेव्हा पूर्वीच्या लोकांचे वेडगळ आचार आणि समजुती त्या मानाने बऱ्या वाटतील. त्या समजुती तशाच ठेवाव्यात

असे मी म्हणत नाही; नव्हे, त्यांच्याशी आपण झगडूच; पण तो लढा काही धर्माला विसरून करता येणार नाही, उलट धर्माचे स्वरूप समजून घेऊन व त्याचे रक्षण करूनच करता येईल.

**वाचक**: मग तुम्ही असेही म्हणाल की इंग्रजांनी या देशात शांतता राखून जे सुख प्रजेला दिले आहे ते कुचकामाचे आहे.

**संपादक**: तुम्हाला शांतता दिसत असेल. मला तर काही शांततेचे सुख दिसत नाही.

**वाचक**: तर मग ठग, पेंढारी, भिल्ल वगैरे लोक जो धुमाकूळ घालीत होते तो तुमच्या मताने काहीच नव्हे काय?

**संपादक**: तुम्ही जरा विचार करून पहाल तर तुम्हाला समजून येईल की त्यांचा धुमाकूळ आणि त्रास तसा यःकश्चित् होता. त्यांचा त्रास जर खराच तितका प्रबळ असता तर इंग्रज येण्यापूर्वी इतर लोकांचा निःपातच झाला असता. तसे काही नव्हते. शिवाय, आजची शांतता केवळ नावाची शांतता आहे. असल्या शांततेने आपण नामर्द, नपुंसक आणि भेकड बनलो आहोत. भिल्ल-पेंढाऱ्यांचा स्वभाव इंग्रजांनी बदलून टाकला आहे असे तुम्ही नका समजू. तसला उपद्रव आपणाला सहन करता येईल, पण परक्या माणसांनी त्या उपद्रवातून आपणाला सोडवावे ही मात्र अगदी नामुष्कीची गोष्ट आहे. आपण नामर्द बनण्यापेक्षा भिल्लांच्या तीरांना बळी पडणे हे मला जास्त पसंत आहे. इंग्रजांचे रक्षण नव्हते त्या वेळच्या हिंदुस्तानचा जोर काही वेगळाच होता. मेकॉलेने हिंदी लोकांना नामर्द म्हटले ते त्याच्या अत्यंत अज्ञानाचे द्योतक आहे. हिंदी लोक कधी नामर्द नव्हतेच. ज्या देशात पहाडी लोक राहतात, जेथे वाघ-लांडगे राहतात, त्या देशात राहणारी माणसे जर खरोखर भित्री असतील तर त्यांचा नाशच होईल, हे लक्षात ठेवा. तुम्ही कधी शेतात गेला आहात काय? तेथे आपले शेतकरी निर्भय रीतिने आजसुद्धा झोपतात, तेथे इंग्रज किंवा तुम्ही झोपायला कचराल, हे मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो. बळ हे निर्भयतेत आहे. शरीरावर पुष्कळ चरबी असण्यात काही बळ नाही. तुम्ही थोडा

विचार कराल तर हें तुम्हाला समजून येईल.

दुसरे म्हणजे, तुम्हाला स्वराज्य इच्छिणाऱ्यांना मी एक इशारा देऊ इच्छितो की भिल्ल, पेंढारी आणि ठग हे आपले भाईबंद आहेत. त्यांची अंत:करणे जिंकून घेणे हे तुमचे-माझे काम आहे. तुमच्याच भावाची तुम्हाला जोपर्यंत धास्ती राहील तोपर्यंत ध्येयाप्रत आपल्याला पोचता येणार नाही.

## ९. हिंदुस्तानची दशा-२-रेल्वे

**वाचक**: हिंदुस्तानच्या शांततेबद्दल मला जे समाधान वाटत होते ते तुम्ही हिरावून घेतले. आता माझ्यापाशी तुम्ही काही शिल्लक ठेवले आहे असे वाटत नाही.

**संपादक**: आतापर्यंत मी तुम्हाला फक्त धर्माच्या अवस्थेबद्दलची कल्पना दिली. पण हिंदुस्तान कां कंगाल आहे, याविषयी माझे विचार तुम्हाला सांगेन त्या वेळीं तुम्हाला कदाचित् माझ्याविषयीच तिरस्कार वाटू लागेल. कारण आजपर्यंत जे काही तुम्ही-आम्ही लाभकारक मानले ते मला तर नुकसानीचेच वाटते.

**वाचक**: ते काय?

**संपादक**: हिंदुस्तानला रेल्वेने, वकीलांनी आणि डॉक्टरांनी कंगाल बनविले आहे. जर आपण वेळेवरच जागे झालो नाही तर चहूबाजूंनी घेरले जाऊन नाश पावू.

**वाचक**: तुमचे-आमचे कधी तरी जमेल की नाही याविषयी मला शंका वाटायला लागली आहे. जे आतापर्यंत चांगले म्हणून दिसले आणि मानले गेले त्या सर्वांवर तुम्ही हल्ला सुरू केलात! मग शिल्लक काय राहिलें?

**संपादक**: तुम्ही जरा धीर धरला पाहिजे. सुधारणा ही कुधारणा कशी हे समजायला कठीण आहे. डॉक्टर्स तुम्हाला सांगतील की क्षयरोगी मरणाच्या दिवसापर्यंत जगण्याची आशा बाळगून असतो. क्षयरोग वरून

दिसण्याजोगा अपाय करीत नाही. उलट रोग्याच्या चेहऱ्यावर तो लालीही दाखवितो – अर्थात् खोटी. त्यामुळे रोग्याला खोटा विश्वास वाटतो आणि शेवटी त्याचा मृत्यु ओढवतो. तसेच सभ्यतेचे समजावे. तो न दिसणारा रोग आहे. त्याच्यापासून सावध असले पाहिजे.

**वाचक**: ठीक आहे. आता तुमचे रेल्वे-पुराण सांगा.

**संपादक**: रेल्वे नसेल तर इंग्रजांचा ताबा हिंदुस्तानवर आज आहे तितका तर नक्कीच राहणार नाही हे तुम्हाला उमगेल. रेल्वेमुळे प्लेगचा देखील फैलाव झाला आहे. रेल्वे नसेल तर फार थोडी माणसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातील आणि त्यामुळे सांसर्गिक रोग देशभर पसरण्याचा संभव राहणार नाही. पूर्वी आपण असे 'सेग्रिगेशन' म्हणजे सुतक स्वाभाविकपणे पाळीत होतो. रेल्वेमुळे दुष्काळ वाढले आहेत, कारण रेल्वेच्या सोयीमुळे लोक आपले धान्य विकून टाकतात. जिकडे महागाई असेल तिकडे धान्य खेचले जाते, लोक बेदरकार बनतात आणि त्यामुळे दुष्काळाचे दुःख वाढते. रेल्वेमुळे दुष्टता वाढते. वाईट माणसे आपला वाईटपणा झपाट्याने फैलावू शकतात. हिंदुस्तानात जी पवित्र स्थाने होती ती आता अपवित्र झाली आहेत. पूर्वी लोक फार अडचणी सोसून तिकडे जात. ते खरा भाव धरून ईश्वराची भक्ती करायला जात. आता भामट्यांची टोळी फक्त भामटेगिरी करण्याकरिता तिकडे जाते.

**वाचक**: हे तुम्ही एकतर्फी बोललात. जसे वाईट लोक जातात तसे चांगलेही जाऊ शकतात. ते कां नाही रेल्वेचा पुरता फायदा घेत?

**संपादक**: जे चांगले आहे ते गोगलगायीच्या पावलांनी चालते. त्याचे रेल्वेशी जमायचेच नाही. चांगले करणाऱ्याला स्वार्थ नसतो. तो घाई करीत नाही. त्याला माहित असते की, माणसावर चांगल्याचा ठसा उमटायला दीर्घ काळ लागतो. वाईटच उड्या मारीत धावू शकते. घर बांधणे कठीण, पाडणे सोपे आहे. म्हणून रेल्वे ही नेहमी दुष्टतेचाच प्रसार करणार हे निश्चित समजावे. दुष्काळाचा फैलाव रेल्वेमुळे होतो की नाही, याविषयी एखादा शास्त्रज्ञ माझ्या मनात घटकाभर संशय उत्पन्न करू शकेल, पण

रेल्वेने दुष्टता वाढते हे माझ्या मनावर अगदी कोरलेले आहे. ते जाणे शक्य नाही.

**वाचक:** पण रेल्वेपासून इतका मोठा लाभ आहे की, तो तिच्यापासून होणारे नुकसान विसरायला लावतो. रेल्वे आहे म्हणूनच आज हिंदुस्तानात एकराष्ट्रीयत्वाची भावना आढळून येते. म्हणून मला तरी वाटते की, रेल्वे येण्याने नुकसान झालेले नाही.

**संपादक:** ही तुमची चूक आहे. तुम्ही एकराष्ट्र नाही आणि ते व्हायला शेकडो वर्षे जातील हे इंग्रजांनी तुम्हाला शिकविले आहे. या गोष्टीला मुळीच आधार नाही. इंग्रज जेव्हा हिंदुस्तानात नव्हते त्या वेळी आपण एकराष्ट्र होतो, आपले विचार एक होते, आपली राहणी एक होती. म्हणून तर त्यांनी एक-राज्य स्थापन केले. भेद नंतर त्यांनीच आमच्यात निर्माण केले.

**वाचक:** ही गोष्ट अधिक स्पष्ट व्हावी लागेल.

**संपादक:** मी जे काही सांगत आहे ते विचार न करता नाही सांगत. एकराष्ट्र याचा अर्थ असा नाही की, आपल्यामध्ये भेद नव्हते; पण आपली मुख्य माणसे पदयात्रा करीत किंवा बैलगाडीतून हिंदुस्तानभर फिरत, ती एकमेकांची भाषा शिकत आणि त्यांच्यामध्ये दुजाभाव नव्हता. ज्या दूरदर्शी पुरुषांनी सेतुबंध रामेश्वर, जगन्नाथ आणि हरद्वार या यात्रा ठरविल्या त्यांचा काय विचार असेल असे तुम्हाला वाटते? ते मूर्ख नव्हते हे तुम्ही कबूल कराल. ईश्वरभजन काय, घरबसल्या होते हे त्यांना ठाऊक होते. त्यांनीच आपल्याला शिकविले की, ज्याचे मन निर्मल, त्याच्या दारीच गंगा आहे. पण त्यांनी असा विचार केला की, हिंदुस्तानला निसर्गाने एक देश बनविले आहे म्हणून ते एकराष्ट्र राहिले पाहिजे. म्हणून त्यांनी वेगवेगळी क्षेत्रे ठरवून लोकांना एकतेची कल्पना अशा रीतीने दिली की, तशी दुनियेत कोठेही नाही. दोन इंग्रज माणसे एक नाहीत इतके एक आपण हिंदी होतो आणि आहोत. मात्र तुम्ही-आम्ही, जे स्वतःला सुधारलेले मानतो, त्यांच्या मनातच हिंदुस्तानात वेगवेगळी राष्ट्रे आहेत असा भ्रम उत्पन्न झाला आहे. रेल्वेमुळे आपण स्वतःला वेगवेगळे समजायला लागलो, आणि रेल्वेमुळेच

एक- राष्ट्र हा विचार आपण पुनः करायला शिकलो असे तुम्ही समजत असाल तर माझी हरकत नाही. अफूपासून नुकसान होते ही माहिती अफूमुळेच झाली, म्हणून अफू ही चांगली असे अफूबाजालाही म्हणता येईल. या सगळ्याचा तुम्ही नीट विचार करा. अजून तुमच्या मनात शंका येतील. पण त्या सर्वांचा निर्णय तुम्हीच करू शकाल.

**वाचक**: तुम्ही सांगितलेत त्याचा मी विचार करीन. पण एक प्रश्न माझ्या मनात आताच येत आहे. मुसलमान हिंदुस्तानात येण्यापूर्वीच्या हिंदुस्तानाबद्दल तुम्ही सांगितले. पण आता तर मुसलमानांची, पारशांची, ख्रिस्त्यांची वगैरे संख्या मोठी आहे. त्यांचे एकराष्ट्र कसे होऊ शकेल? हिंदु-मुसलमानांचे तर हाडवैर आहे म्हणतात. आपल्या म्हणीही तशाच आहेत. मुसलमान प्रार्थनेसाठी पश्चिमेकडे तोंड करतात, तर हिंदू पूर्वेकडे. मुसलमान हिंदूना मूर्तिपूजक म्हणून त्यांचा तिरस्कार करतात. हिंदू मूर्तिपूजक आहेत, मुसलमान मूर्तिभंजक आहेत. हिंदू गायीची पूजा करतात, मुसलमान तिला मारतात. हिंदू अहिंसक, मुसलमान हिंसक. असा पदोपदी विरोध आहे. तो कसा जाणार आणि हिंदुस्तान कसा एक होणार?

## १०. हिंदुस्तानची दशा-३-हिंदु-मुसलमान

**संपादक**: तुमचा शेवटचा प्रश्न फार गंभीर वाटतो. पण विचार करता तो सोपा वाटेल. हे प्रश्न निर्माण झाले त्याचे कारणही रेल्वे, वकील आणि डॉक्टर हेच आहेत. वकील आणि डॉक्टर यांचा विचार अजून आपल्याला पुढे करावयाचा आहे. रेल्वेचा विचार आपण केला. त्यात एवढीच भर घालतो की, मानवप्राण्याला अशा रीतिने निर्माण केलेला आहे की त्याने आपल्या हातापायांनी जमेल तेवढेच जाणे-येणे वगैरे करावे. रेल्वे वगैरे साधनांनी धावपळ करण्याचे आपण बंद केले तर फार गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न होणारच नाहीत. आपण आपल्या हातांनी दुःख ओढवून घेत असतो.

माणसाची मर्यादा देवाने त्याच्या शरीराला विशिष्ट आकार देऊनच बांधून दिली आहे, पण माणसाने त्या आकाराची मर्यादा ओलांडण्याचे उपाय शोधून काढले. माणसाला बुद्धि एवढ्याकरिताच दिली की, तिच्या साह्याने त्याने ईश्वराला ओळखावे; पण माणसाने बुद्धिचा उपयोग ईश्वराला विसरण्याकडे केला. माझ्याकडून माझ्या नैसर्गिक मर्यादेप्रमाणे माझ्या आजूबाजूला राहत असणाऱ्या माणसांची सेवा होऊ शकते; पण मी झट्कन गर्वाच्या मदात मला माझ्या शरीराच्या साधनाने साऱ्या दुनियेची सेवा करायची आहे असा शोध लावला. तसे करायला गेले की, अनेक धर्माच्या आणि अनेक प्रकारांच्या लोकांशी संबंध येणार. तो बोजा मनुष्यप्राणी उचलू शकत नाही आणि म्हणून माणसे कष्टी होतात. या विचारानुसार रेल्वे हे खरोखर भयंकर साधन आहे हे तुमच्या लक्षांत येईल. रेल्वेचा उपयोग केल्याने मनुष्य ईश्वरापासून दूर गेला आहे.

**वाचक:** पण मी तर माझ्या प्रश्नाचे उत्तर ऐकून घ्यायला उतावीळ झालो आहे. मुसलमान आल्यामुळे आपले एकराष्ट्रत्व राहिले की गेले?

**संपादक:** हिंदुस्तानात नाना धर्मांची माणसे राहू शकतात. त्यामुळे काही त्याचे एकराष्ट्रत्व नष्ट होणार नाही. नवी माणसे दाखल झाली तरी ती राष्ट्रीय ऐक्य नष्ट करतातच असे नाही. ती लोकांत मिसळून जातात. असे झाले म्हणजेच अमुक देश एकराष्ट्र आहे असे म्हणता येईल. अशा देशात इतर माणसांचा समावेश करून घेण्याचा गुण असला पाहिजे. तसे हिंदुस्तानात होते आणि आहे. तसे तर जितकी माणसे तितके धर्म, असे म्हणता येईल. एकराष्ट्र होऊन राहणारी माणसे एकमेकांच्या धर्मात ढवळाढवळ मुळीच करीत नाहीत. तशी ते करतील तर ती एकराष्ट्र व्हायला लायक नाहीत असे समजावे. सारे हिंदुस्तान हिंदू लोकांनीच भरलेले असावे असे जर हिंदू मानू लागले तर ते त्यांचे स्वप्न आहे. मुसलमान जर म्हणू लागले की त्यात फक्त मुसलमानांनीच रहावे तर तेही स्वप्नच समजावे. तरीही हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिस्ती, जे कोणी या देशाला आपला देश समजून राहिले आहेत, ते एका देशाचे आहेत; ते देशबांधव आहेत आणि एकमेकांच्या स्वार्थाकरिता का होईना त्यांना

एक होऊन रहावे लागेल. जगातल्या कोणत्याही भागात एकराष्ट्राचा अर्थ एकधर्म असा केलेला नाही, हिंदुस्तानातही असा अर्थ नव्हता.

**वाचक**: पण हिंदु-मुसलमानांत हाडवैर आहे त्याचे काय?

**संपादक**: 'हाडवैर' हा दोघांच्या शत्रूने शोधून काढलेला शब्द आहे. हिंदु-मुसलमान जेव्हा एकमेकांशी लढत तेव्हा तसे बोलतही, पण त्यांचे लढणे तसे पुष्कळ काळापासून बंद आहे. मग हाडवैर कसले? दुसरी एक गोष्ट लक्षात ठेवा की इंग्रज आल्यानंतरच आपण लढण्याचे बंद केले आहे असे काही नाही. हिंदू हे मुसलमान राजांच्या राज्यात आणि मुसलमान हिंदू राजांच्या राज्यात नांदत आले आहेत. दोघांनाही मागाहून समजून आले की, लढाई करण्याने काही कोणाचा फायदा नाही. लढाईमुळे कोणी आपला धर्म सोडणार नाही आणि कोणी आपला हट्टही सोडणार नाही. म्हणून मग दोघांनी एक होऊन राहण्याचा निश्चय केला. भांडणे ही पुन्हा इंग्रजांनी सुरू केली.

'मियां-महादेवाचे कधी जमणार नाहीं' ही म्हणसुद्धा अशीच समजावी. कित्येक म्हणी प्रचलित होतात आणि नुकसान करतात. अशा म्हणींच्या प्रभावाने आपण एवढेही लक्षांत घेत नाही की, पुष्कळशा हिंदूंचे आणि मुसलमानांचे वाडवडील एकच होते; आपल्यांत रक्त एकच आहे. धर्म बदलला म्हणजे काय आपण वैरी झालो? दोघांचा देव काय वेगळा आहे? धर्म म्हणजे एकाच जागी पोचण्याचे वेगळे वेगळे रस्ते. आपण दोघांनी वेगळे रस्ते धरले म्हणून काय झाले? त्यात भांडण्यासारखे काय आहे?

अशा म्हणी शैव-वैष्णवांतसुद्धा चालतात. म्हणून काही ते एकराष्ट्र नव्हेत असे कोणी म्हणणार नाही. वैदिकधर्मी आणि जैन यांच्यात पुष्कळ भेद मानला जातो, तरी त्यामुळे ते काही एकराष्ट्र नाहीत असे नाही. आपण गुलाम बनलो आहोत म्हणूनच आपले तंटे आपण तिसऱ्याकडे घेऊन जातो.

मुसलमान जसे मूर्ति फोडणारे आहेत तसा हिंदू लोकांतही एक पंथ आढळतो. जसजसे खरे ज्ञान वाढत जाईल तसतसे आपल्याला समजून येईल की आपल्याला पसंत नसलेला धर्म जरी दुसरा मनुष्य पाळत असला

तरी आपण त्याच्याविषयी वैरभाव ठेवता कामा नये; आपण त्याच्यावर जबरदस्ती करता कामा नये.

**वाचक**: आता गोरक्षणाविषयी तुमचे विचार सांगा.

**संपादक**: मी स्वत: गायीचा पूजक आहे, म्हणजे मी तिला मान देतो. गाय ही हिंदुस्तानचे रक्षण करणारी आहे, कारण तिच्या संततिवरच, हिंदुस्तान हा शेतीचा देश असल्यामुळे, त्याचा आधार आहे. शेकडो रीतिनी गाय हा उपयोगी पडणारा प्राणी आहे. तो उपयोगी प्राणी आहे ही गोष्ट मुसलमान बांधवही कबूल करतील.

पण मी जसा गायीचा पूजक आहे, तसा माणसाचाही पूजक आहे. तशी गाय उपयोगी तसा माणूसहि उपयोगी आहे. मग तो मुसलमान असो कीं हिंदू असो. तेव्हा गाईला वाचविण्यासाठी मी काय मुसलमानाशी लढावे? त्याला मी मारावे? तसे जर मी करायला लागलो तर मी मुसलमानांचा, तसाच गायीचाही वैरी बनेन. म्हणून मी म्हणेन की गायीचे रक्षण करण्याचा उपाय एकच आहे, तो हा की मी माझ्या मुसलमान भावाला हात जोडून 'देशाकरिता गायीला वाचव' असे त्याला समजावून द्यावे. त्याला जर ते पटले नाही तर मी गायीला मरू द्यावे. कारण की, ती मग माझ्या शक्तिबाहेरची गोष्ट आहे. मला जर गायीची अतिशय दया येत असेल तर मी माझा प्राण द्यावा, पण मुसलमानाचा प्राण काही घेऊ नये. हेच धर्माचे सूत्र आहे, असे मी तरी मानतो.

'होय'चे आणि 'नाही'चे सदोदित वैर आहे. मी जर वाद करायला लागलो तर मुसलमानही वाद करायला लागेल. मी जर वाकड्यात शिरलो तर तोही वाकड्यात शिरेल. पण मी वीतभर नमलो तर तो हातभर नमेल, आणि न नमला तरी मी नमलो हे काही गैर झाले असे म्हणता येणार नाही. जेव्हा आपण आग्रही बनलो तेव्हा गोवध वाढला. माझ्या मताने गोरक्षाप्रचारिणी सभा ही गोवधप्रचारिणी सभा मानली पाहिजे. अशा सभा असणे ही आपणाला नामुष्कीची गोष्ट आहे. गायीचे रक्षण कसे करावे याचा जेव्हा आम्हाला विसर पडला तेव्हाच तशा सभांची गरज वाटली असावी.

माझा भाऊ गायीला मारायला धावला तर मी त्याला काय करावे?

मी त्याला मारावे की त्याच्या पाया पडावे? पाया पडावे असे जर तुमचे म्हणणे असले तर मुसलमान बंधूंच्याही आपण पाया पडावे.

गायीला क्लेश देऊन जो गायीचा वध हिंदू करीत आहेत, त्यापासून तिला कोण सोडवितो? गायीच्या संततिला जी पराणी (टोचणी) हिंदू मारतो त्या हिंदूला कोण समजावून सांगतो? पण म्हणून त्याने काही एकराष्ट्र होण्याला बाधा आलेली नाही.

शेवटीं हिंदू अहिंसक आणि मुसलमान हिंसक हे खरे असेल तर अहिंसकाचा धर्म काय आहे? अहिंसकाने माणसाची हिंसा करावी असे काही कोठे लिहिलेले नाही. अहिंसकाचा रस्ता तर साधा सरळ आहे. त्याने एकाचा बचाव करण्याकरिता दुसऱ्याची हिंसा मुळीच करता कामा नये. पाया पडणे, समजावून सांगणे एवढेच त्याला करता येईल. त्यातच त्याचा पुरुषार्थ आहे.

पण हिंदू तेवढे सगळे अहिंसक आहेत काय? मूलत: विचार केला तर कोणीच अहिंसक नाही, कारण आपल्या हातून जीवजंतूंची हत्या घडतच असते. परंतु त्यातून सुटण्याची आपल्याला इच्छा आहे, म्हणून तर आपण अहिंसक म्हणावयाचे. साधारणपणे विचार केला तर दिसून येते की, पुष्कळ हिंदू हे मांसाहारी आहेत, म्हणून ते अहिंसक म्हणता येणार नाहीत. ओढूनताणून वेगळा अर्थ करायचा असेल तर मला काही म्हणायचे नाही. अशी स्थिति असताना एक हिंसक आणि दुसरे अहिंसक, म्हणून एकमेकांचे पटायचे नाही, हे म्हणणे अगदी चुकीचे आहे.

असे विचार स्वार्थी धर्मशिक्षक, शास्त्री-मुल्ला लोक यांनी पसरविले आहेत; उणेपुरे इंग्रजांनी भरून काढले. इंग्रजांना इतिहास लिहिण्याची सवय; प्रत्येक जमातीचे रीतिरिवाज समजावून घेण्याचा त्यांचा आव; ईश्वराने माणसाचे मन चिमुकले घडविले असले तरी हे लोक ईश्वरी कर्तृत्व आपल्याकडे असल्याचा दावा करून कसले ना कसले प्रयोग करीत असतात. आपला नगारा आपणच पिटून आमच्या मनावर आपल्या सिद्धांतांचा पक्केपणा ठसवीत असतात. भोळसटपणाने आपण त्यावर विश्वास ठेवतो.

ज्यांना वाकडेच पहावयाचे आहे असे नाही, त्यांना कुराणात अशी शेकडो वचने दिसून येतील की जी हिंदूंना मान्य होण्यासारखी आहेत. आणि भगवद्गीतेत अशी वचने आहेत की ज्यांच्या विरुद्ध मुसलमानांना काहीच बोलता येणार नाही. कुराणात मला न समजण्यासारखा किंवा मला न आवडण्यासारखा काही भाग असला म्हणून त्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांचा मी तिरस्कार करावा की काय? टाळी दोन हातांनी वाजते. मला जर तंटा करायचाच नसला तर मुसलमान काय करील? आणि मुसलमानाला करायचा नसला तर मी काय करू शकणार आहे? हवेत हातवारे करणाऱ्यांचा हातच निखळतो. प्रत्येकजण जर आपल्या धर्माचे स्वरूप समजून घेऊन त्याला चिकटून राहील आणि शास्त्री-मुल्लांना लुडबुड करू देणार नाही, तर तंट्यांचे नाव उरणार नाही.

**वाचक**: इंग्रज लोक दोन्ही जमातींना एक होऊ देतील का?

**संपादक**: हा प्रश्न डरपोक माणसाचा आहे. हा प्रश्न आपल्या मनाची दुर्बलता दर्शवितो. दोन भावांना मेळ करायचा असेल तर त्यात कोण मोडता घालू शकणार आहे? जर त्यांच्यामध्ये तिसऱ्या माणसाला भांडण काढता आले तर त्या दोघा भावांना आपण कच्च्या दिलाचे समजू. तसेच जर आपण हिंदु-मुसलमान कच्च्या दिलाचे असू तर त्यात इंग्रजांना दोष देण्याचे कारण नाही. कच्चा घडा एका नाही तर दुसऱ्या खड्याने फुटणारच आहे, तर त्याला वाचविण्याचा मार्ग घड्याला खड्यापासून दूर ठेवणे हा नसून त्याला पक्का बनविणे हा आहे. त्यामुळे खड्याचे भयच राहणार नाही. तसे आपण पक्क्या दिलाचे बनले पाहिजे. दुसरे, दोघांतून एक जर पक्क्या दिलाचा असला तर तिसऱ्याचे फावणार नाही. हे काम हिंदूंना सहज साधण्याजोगे आहे. त्यांची संख्या मोठी आहे; आपण अधिक शिकलेले आहों असे ते समजतात; म्हणून त्यांना आपले हृदय पक्के ठेवता येईल.

दोन्ही जमातींत परस्परांविषयी अविश्वास आहे. म्हणून मुसलमान हे लॉर्ड मोर्लेकडून काही विशिष्ट हक्क मागतात. त्याला हिंदूंनी कां म्हणून विरोध करावा? हिंदूंनी विरोध केला नाही तर इंग्रज चपापतील.

मुसलमानांचा हिंदूंवर विश्वास बसू लागेल आणि बंधुभाव वाढायला लागेल. आपले भांडण इंग्रजांकडे घेऊन जाण्याची आपल्याला लाज वाटायला पाहिजे. ते त्यांच्याकडे घेऊन न जाण्यात हिंदूंचे काही नुकसान होणार नाही. विचार केला तर तुम्हाला हे सहज समजेल. जो मनुष्य दुसऱ्याचा विश्वास संपादन करू शकतो तो कधी काहीही गमावीत नाही.

हिंदु-मुसलमान कधी लढणारच नाहीत असे मला म्हणायचे नाही. दोघे भाऊ एकत्र राहतात तेव्हा तक्रार होते. एखाद्या वेळी डोकीही फुटतील. तसे होण्याची गरज नाही. पण सगळी माणसे सारख्या स्वभावाची नसतात. क्रोधवश होऊन माणसे पुष्कळ वेळा अविचार करतात. ते आपल्याला सहन करावे लागेल. पण तसली भांडणेसुद्धा आपण मोठे वकील गुंतवून इंग्रजांच्या कोर्टात घेऊन जाता कामा नयेत. दोघेजण भांडले. दोघांचे किंवा एकाचे डोके फुटले, तर त्यात तिसरा माणूस काय करणार आहे? लढेल तो जखमी व्हायचाच. अंगाला अंग घासले की त्याची खूण रहायचीच. त्यात न्याय कसला करायचा?

## ११. हिंदुस्तानची दशा-४-वकील

**वाचक:** दोघांचे भांडण झाले तर त्यांनी कोर्टात जाऊ नये असे तुम्ही म्हणता. हे तुमचे सांगणे अजबच आहे!

**संपादक:** अजब म्हणा की दुसरे काही विशेषण द्या, पण गोष्ट मात्र खरी आहे. आणि तुमच्या शंकेने आपण आता वकील, डॉक्टर यांची ओळख करून घेण्याकडे वळू. वकीलांनी हिंदुस्तानला गुलामगिरी आणली, त्यांनी हिंदु-मुसलमान तंटे वाढविले, त्यांनी इंग्रजांची सत्ता वाढविली असे माझे मत आहे.

**वाचक:** असे आरोप करणे सोपे आहे, पण सिद्ध करणे कठिण जाईल. वकीलांशिवाय कोणी आपल्याला स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला

असता? त्यांच्याशिवाय गरिबांचा बचाव कोणी केला असता? त्यांच्याशिवाय दाद कोणी लावून दिली असती? बघा बरे, कै. मनमोहन घोष यांनी कितीजणांना वाचविले! त्यांनी त्याकरिता एक छदामही घेतला नाही. ज्या काँग्रेसची तुम्ही स्तुति करता ती वकीलांमुळे टिकलेली आहे आणि त्यांच्या मेहनतीमुळे तिचे काम होते. या वर्गाची तुम्ही निंदा करणे म्हणजे न्यायावरच अन्याय करण्यासारखे आहे. तुमच्या हाती वृत्तपत्र आहे म्हणून वाटेल तसे बोलण्याची मुभा तुम्ही घेतल्यासारखी दिसते.

**संपादक** : तुम्ही समजता तसे मीसुद्धा एकेकाळी समजत असे. वकीलांनी कधी काही चांगले केलेच नाही असे मला म्हणायचे नाही. कै. मनमोहन घोष यांच्याबद्दल मला आदर आहे. त्यांनी गरीबांना मदत केली होती हे बरोबर आहे. काँग्रेसमध्ये वकीलांनी काही काम केले आहे हेही मान्य करण्याजोगे आहे. वकील हीसुद्धा माणसेच आहेत आणि मनुष्यजातीत काही ना काही चांगले आहे यात शंका नाही. पण वकीलांच्या भलेपणाची जी पुष्कळशी उदाहणे आढळतात ती ते आपला वकीलपणा विसरले तेव्हाची आहेत. मला तुम्हाला एवढेच दाखवायचे आहे की, त्यांचा धंदा त्यांना अनीति शिकविणारा आहे. ते भलत्या लोभात सांपडतात, त्यातून सुटणारे विरळाच.

हिंदू आणि मुसलमान भांडले. त्यांना तटस्थ माणूस काय म्हणेल? की आता झाले गेले विसरून जा, दोघांचेही चुकले समजा, दोघेही एकजुटीने रहा. पण ते जातात वकीलाकडे. आता वकीलाचे कर्तव्यच आहे की अशीलाचा पक्ष ताणून धरायचा. अशीलाला कल्पनाही नसेल असे युक्तिवाद अशीलाच्या बाजूने शोधून काढायचे हे त्याचे कामच आहे. तसे तो न करील तर आपल्या धंद्याला त्याने बट्टा लावला असे होईल. म्हणून वकील सामान्यत: भांडणे वाढविण्याचाच सल्ला देतात.

शिवाय, माणसे वकील होतात ती काही परदु:ख दूर करण्याकरिता नव्हे, तर पैसा मिळविण्यासाठी. तो एक कमाईचा रस्ता आहे. म्हणून वकीलाचा स्वार्थ भांडणे वाढविण्यात असतो. भांडण झाले की वकीलांना

आनंद होतो ही माझ्या माहितीतली गोष्ट आहे. लहान-लहान वकील तर भांडणे लावतातही. त्यांचे दलाल जळवांसारखे गरिबांना चिकटतात आणि त्यांचे रक्त शोषून घेतात. हा धंदाच अशा प्रकारचा आहे की, त्यात माणसांना भांडणे करण्याला उत्तेजन मिळावे. वकील हे रिकामटेकडे लोक असतात. आळशी माणसे ऐशआराम भोगण्यासाठी वकील बनतात, ही वस्तुस्थिति आहे. दुसरे अनेक युक्तिवाद पुढे केले जातील, पण हे खरे आहेत. वकीली हा मोठा प्रतिष्ठेचा धंदा आहे असा शोध लावणारेही वकीलच आहेत. कायदे ते बनवितात, त्यांची स्तुतिसुद्धा तेच करतात. लोकांकडून किती पैसे घ्यायचे तेसुद्धा तेच ठरवितात, आणि त्यांच्यावर छाप पाडण्याकरिता असे ढोंग करतात की जणू काही आकाशातून अवतरलेले हे देवपुरुषच असावेत!

मजुरांपेक्षा त्यांनी का म्हणून जास्त रोजी मागावी? त्यांच्या गरजा मजुरांपेक्षा का म्हणून जास्त असाव्यात? मजुरांपेक्षा त्यांनी देशाचे काय अधिक भले केले आहे? आणि भले करणाऱ्याला अधिक पैसा घेण्याचा हक्क आहे काय? जर पैशाकरिता त्यांनी भले केले असेल तर ते भले कसे म्हणता येईल? हा मी तुम्हाला त्या धंद्याचा जो गुण आहे तो सांगितला. पण ती गोष्ट बाजूला ठेवा.

वकीलांमुळे हिंदु-मुसलमानांमध्ये कित्येक दंगे झाले आहेत ही गोष्ट ज्यांनी अनुभव घेतला आहे त्यांना माहित असेल. त्यामुळे कित्येक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. त्यांच्यामुळे भावाभावात कडवटपणा आला. कित्येक राजेरजवाडे वकीलांच्या जाळ्यात अडकून कर्जदार होऊन बसले आहेत. अनेक जहागिरदार वकीलांच्या कारस्थानांनी लुटले गेले आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

पण त्यांच्या हातून जास्तीत जास्त झालेले नुकसान म्हणजे इंग्रजांचे जोखड आमच्या मानेवर पक्के बसले हे आहे. तुम्ही विचार करा. इंग्रजांची कोर्टे नसती तर इंग्रज राज्य चालवू शकले असते असे तुम्हाला वाटते? कोर्टे ही काही लोकांकरिता नाहीत. ज्यांना आपली सत्ता टिकवायची आहे

ते कोर्टाच्या मार्गाने लोकांना ताब्यात ठेवतात. लोकांनी आपली भांडणे आपसात मिटवली तर तिसऱ्या पक्षाला त्यांना आपल्या सत्तेच्या अधीन करता येणार नाही. लोक जेव्हा आपली भांडणे मारपीट करून किंवा नातलगांना पंच बनवून सोडवत तेव्हा ते खरे मर्द होते. कोर्टे येताच ते नामर्द बनले. एकमेकांशी लढून मरणे हे जंगली समजले जाऊ लागले. आता तिसरा माणूस भांडण मिटविणार, यात कमी जंगलीपणा आहे का? तिसरा मनुष्य निकाल देतो तो खराच असतो, असे कोणी सांगू शकेल? खरा कोण हे दोघे पक्षकारच जाणतात. आपण भोळसटपणाने मानतो की तिसरा मनुष्य पैसे घेऊन न्याय देईल.

ही गोष्ट बाजूला ठेवू. वस्तुस्थिती सांगायची ती एवढीच की, इंग्रजांनी कोर्टांच्या मार्फत आमच्यावर अंकुश ठेवला आहे, आणि ही कोर्टे आम्ही वकील झालो नाही तर चालूच शकणार नाहीत. इंग्रजच जर न्यायाधीश असते, इंग्रजच वकील असते, इंग्रजच शिपाई असते तर त्यांनी इंग्रजांवरच फक्त राज्य केले असते. हिंदुस्तानी न्यायाधीश आणि हिंदुस्तानी वकील यांच्याशिवाय इंग्रजांचे काम चालले नाही. वकील झाले कसे, त्यांनी कशा लटपटी केल्या, हे सगळे जर तुम्हाला समजले तर माझ्याइतकाच तुम्हाला या धंद्याविषयी तिटकारा येईल. इंग्रजी सत्तेची एक मुख्य किल्ली त्यांची कोर्टे ही आहे आणि कोर्टाची किल्ली वकील ही आहे. वकीलांनी जर वकीली सोडून दिली, आणि तो धंदा वेश्येच्या धंद्यासारखा नीच समजला गेला तर, इंग्रजांचे राज्य एका दिवसात मोडून पडेल. हिंदुस्तानी लोकांना भांडणे फार प्रिय आहेत आणि कोर्ट-दरबाररूपी पाण्यातले जणू ते मासे आहेत अशा तऱ्हेचा आरोप आमच्यावर वकीलांच्यामुळे आलेला आहे.

जे शब्द मी वकीलांच्या बाबतीत वापरतो तेच न्यायाधीशांच्याही बाबतीत लागू पडतात. ते दोघे सख्खे मावसभाऊ आहेत आणि एकमेकांना बळ देणारे आहेत.

# १२. हिंदुस्तानची दशा-५-डॉक्टर

**वाचक**: वकीलांच्याविषयी समजले. त्यांच्या हातून भले घडले ते अनायास घडले असा अनुभव येतो खरा. बाकी त्यांचा धंदा बघितला तर तो कनिष्ठच आहे. पण डॉक्टरांनाही तुम्ही त्यांच्याच पंक्तिला बसवलेत हे कसे?

**संपादक**: मी तुमच्यापुढे जे विचार मांडतो आहे ते आज तरी माझे स्वतःचे आहेत. पण मीच असा विचार करणारा आहे असे नाही. खुद्द पश्चिमेकडील सुधारकांनी माझ्यापेक्षा अधिक कडक शब्दांत तसे लिहिलेले आहे. त्यांनी वकील- डॉक्टरांची अतिशय निंदा केली आहे. त्यातल्या एका लेखकाने एक विषारी झाड कल्पून वकील-डॉक्टर वगैरे निरर्थक धंदेवाले म्हणजे त्याच्या डहाळ्या असे म्हटले आहे आणि त्याच झाडाच्या खोडावर नीतिधर्मरूपी कुऱ्हाड उगारलेली दाखविली आहे. अनीति ही या सर्व धंद्यांचे मूळ असे त्याने दाखविले आहे. यावरून तुमच्यापुढे मी माझ्याच डोक्यातून काढलेले काही नवे विचार ठेवीत नसून इतरांचा, तसाच माझाही अनुभव मांडीत आहे, हे तुमच्या लक्षात येईल.

डॉक्टरांच्याविषयी जसा तुम्हाला मोह आहे तसा मलाही होता. एक काळ असा होता की, त्या वेळीं माझी स्वतःची डॉक्टर होण्याची इच्छा होती, आणि डॉक्टर होऊन समाजाची सेवा करावी असे माझ्या मनात होते. आता तो मोह गेला आहे. आपल्याकडे वैद्याचा धंदा चांगल्या धंद्यात गणला गेलेलाच नाही, याची आता मला जाणीव झाली आहे, आणि त्या विचाराचे मोल मी बरोबर ओळखू शकतो.

इंग्रजांनी आम्हाला गुलाम ठेवण्याकरता डॉक्टरी विद्येचाही वापर केला आहे. डॉक्टरांच्या दांभिकपणाची उदाहरणेसुद्धा काही कमी नाहीत. मोगल बादशहाला फसविणारा एक इंग्रज डॉक्टरच होता. त्याने त्याच्या कुटुंबातल्या कोणाला तरी बरे केले म्हणून त्याला इनाम मिळाले. अमीरांकडे पोचणारेही डॉक्टरच.

डॉक्टरांनी आपल्याला खूप खिळखिळे करून टाकले आहे. डॉक्टरांच्यापेक्षा वैदू बरे असे म्हणावेसे माझ्या मनात येते. आपण त्याचा विचार करू या.

डॉक्टरांचे काम फक्त शरीर सांभाळणे हे आहे: खरे तर तेही त्यांचे काम नाही. त्यांचे काम शरीरात रोग झाले की ते दूर करण्याचे आहे. रोग कां होतो? आपल्याच निष्काळजीपणामुळे. मी फार जेवतो, मग मला अजीर्ण होते, मी डॉक्टरकडे जातो, तो मला गोळी देतो, मी बरा होतो. पुन्हा मी खूप खातो आणि मग गोळी घेतो. जर मी गोळी घेतली नसती तर अजीर्णाची शिक्षा मी भोगली असती आणि पुन्हा भरमसाट खाल्ले नसते. डॉक्टर मधे पडला आणि त्याने मला भरमसाट खायला मदत केली. त्यायोगाने माझ्या शरीराला आराम मिळाला खरा, पण माझे मन दुबळे झाले. असे होता होता शेवटी माझी स्थिति अशी होते की, माझा मनावर यत्किंचितही ताबा राहत नाही.

मी दुर्वर्तन केले, आजारी पडलो, मला डॉक्टरने औषध दिले, मी बरा झालो– मग मी पुन्हा दुर्वर्तन करणार नाही का? करणारच. डॉक्टर जर मधे पडला नसता तर निसर्गाने आपले काम केले असते, माझे मन दृढ झाले असते आणि शेवटी मी विषयमुक्त होऊन सुखी झालो असतो.

इस्पितळे ही पापाचा पाया आहेत. त्यांच्यामुळे माणसे शरीररक्षणाकडे दुर्लक्ष करून अनीति वाढवितात.

युरोपियन डॉक्टर लोकांनी तर कमालच केली आहे. केवळ शरीराच्या भ्रामक जपणुकीकरिता ते दरसाल लाखो जीवांचा संहार करतात, जिवंत प्राण्यांवर प्रयोग करतात. ही गोष्ट एकाही धर्माला मान्य नाही. हिंदू, इस्लाम, ख्रिस्ती, पारशी, सर्व धर्म सांगतात की, माणसाच्या शरीराकरिता इतके जीव मारण्याची गरज नाही.

डॉक्टर लोक आपल्याला धर्मभ्रष्ट करतात. त्यांच्या पुष्कळशा औषधांत चरबी किंवा दारू असते. या दोहोंपैकी एकही वस्तू हिंदु-मुसलमानांना चालण्याजोगी नाही. आपण सुधारलो असल्याचा आव आणून आणि

धार्मिक विधिनिषेधांना धर्मभोळेपणा समजून आपण स्वच्छंदीपणे वाटेल तसे वागतो ही गोष्ट वेगळी, पण डॉक्टर आपल्याला धर्मभ्रष्ट करतात ही अगदी स्पष्ट गोष्ट आहे.

याचा परिणाम म्हणजे आपण निर्वीर्य आणि नामर्द बनलो आहोत. अशा स्थितित लोकसेवा करायला आपण लायक राहत नाही आणि आपण शरीराने क्षीण आणि बुद्धिहीन होत चाललो आहोत. इंग्रजांची किंवा युरोपियनांची डॉक्टरी शिकणे म्हणजे गुलामगिरीची गाठ घट्ट करणे आहे.

आपण डॉक्टर कां होतो याचासुद्धा विचार करण्यासारखा आहे. प्रतिष्ठा आणि पैसे मिळवून देणारा धंदा करायचा हे त्याचे खरे कारण आहे; तो परोपकार नाही. त्या धंद्यात परोपकार नाही हे मी सांगितलेच. त्याच्यामुळे लोकांचे नुकसान आहे. डॉक्टर लोक केवळ दिखाऊपणा करून लोकांकडून मोठी फी घेतात, आणि पैशाच्या औषधाचा रुपया घेतात. विश्वास ठेवून आणि बरे होण्याच्या आशेने लोक फसतात. असेच जर आहे तर भलेपणाचे ढोंग करणाऱ्या डॉक्टरपेक्षा वैदू बरे म्हटले पाहिजेत.

## १३. खरी सभ्यता कोणती?

**वाचक:** तुम्ही रेल्वे, वकील, डॉक्टर, सर्वांची निंदा केली. यंत्र म्हणून जेवढे आहे तेवढे तुम्ही नुकसानकारक मानणार हे मला दिसतेच आहे. आता सभ्यता म्हणायची कशाला?

**संपादक:** या प्रश्नाचे उत्तर अवघड नाही. जी सभ्यता हिंदुस्तानने दाखविली आहे तिला जगात तोड नाही असे मी मानतो. जी बीजे आपल्या पूर्वजांनी पेरली त्यांची बरोबरी करण्याजोगे काही आढळून आलेले नाही. रोमची धूळधाण झाली, ग्रीसचे फक्त नावच राहिले, इजिप्तची बादशाही नष्ट झाली, जपान पाश्चिमात्यांच्या पंजात सांपडले, चीनचे काही सांगता येत नाही. पण पडत झडत असले तरी हिंदुस्तानचा पाया अजून मजबूत आहे.

रोम आणि ग्रीस ही जी राष्ट्रे पतन पावली त्यांच्या पुस्तकांतून युरोपचे लोक धडे घेतात. त्यांच्या चुका आम्ही करणार नाही असा अभिमान धरतात. अशी त्यांची केविलवाणी अवस्था आहे. मात्र हिंदुस्तान अविचल आहे, हेच त्याचे भूषण आहे. हिंदुस्तान देश इतका जंगली, इतका अडाणी आहे की, त्याच्यात काही बदल घडवावा म्हटले तर ते शक्यच होत नाही असा आमच्यावर आरोप आहे. हा आरोप आपला गुण आहे, दोष नव्हे. अनुभवाने जे आपल्यासाठी योग्य ठरले ते आपण कां म्हणून बदलावे? शिकविणारे पुष्कळ येतात आणि जातात, पण हिंदुस्तान अचल आहे. ही त्याची विशेषता आहे, त्याचे वैभव आहे. सभ्यता म्हणजे मनुष्याला कर्तव्याचा मार्ग दाखविणारी वागणुकीची पद्धति. कर्तव्य बजावणे म्हणजे नीतिचे पालन करणे. नीतिचे पालन म्हणजे आपल्या मन–इंद्रियांना ताब्यात ठेवणे. असे केल्याने आपण स्वतःला ओळखतो. हीच सभ्यता किंवा सुधारणा. याच्या विरुद्ध ती कुधारणा.

या व्याख्येनुसार हिंदुस्तानने काही शिकण्याजोगेच राहत नाही असे पुष्कळ इंग्रज लेखकांनी लिहून ठेवले आहे. ते बरोबर आहे. माणसाच्या वृत्ति चंचल असतात हे आपण पाहतो. त्याचे मन नेहमी चंचल असते, शरीराला जितके जास्त द्यावे तितके ते आणखी मागते. जास्त घेऊनही ते सुखी होत नाही. भोग भोगल्याने भोगाची इच्छा वाढत जाते. म्हणून आपल्या पूर्वजांनी मर्यादा बांधून दिली. पुष्कळ विचार केल्यानंतर त्यांना दिसून आले की सुखदुःख हे मनामुळे आहे. धनवान हे श्रीमंतीमुळे सुखी नाहीत, गरीब हे गरीबीमुळे दुःखी नाहीत. श्रीमंत दुःखी आढळतात, गरीबही सुखी दिसून येतात. कोट्यवधी लोक गरीबच असणार. हे पाहून त्यांनी भोगाची वासना सोडायला लावली. हजारो वर्षांपूर्वी जो नांगर होता त्याने आपण आपले काम चालवून घेतले. हजारो वर्षांपूर्वी जशा आपल्या झोपड्या होत्या त्या आपण तशाच ठेवल्या. हजारो वर्षांपूर्वी जसे आपले शिक्षण होते तसे ते चालू ठेवले. आपण घातक स्पर्धा समाजात ठेवली नाही. प्रत्येकजण आपापला धंदा करीत राहिला. त्यात त्यांनी नियमाप्रमाणे

दाम घेतले. आपल्याला यंत्रे वगैरे शोधता येत नव्हती, असे नाही; पण यंत्र वगैरेच्या जंजाळात जर माणसे सापडली तर ती गुलामच होतील आणि आपली नीति सोडून देतील असे आपल्या पूर्वजांनी पाहिले. त्यांनी विचारपूर्वक सांगितले की आपण हातापायांनी जे होईल तेच करावे. हातपाय वापरण्यातच खरे सुख आहे, त्यातच आरोग्य आहे.

मोठी शहरे स्थापन करणे ही व्यर्थ उठाठेव आहे असा त्यांनी विचार केला. त्यांत लोक सुखी होणार नाहीत. त्यांत सोनेरी टोळ्या आणि वेश्यांच्या वस्त्या उठतील, गरीब माणसांना धनिक लुबाडतील. म्हणून त्यांनी लहान लहान खेड्यांतच संतोष मानला.

त्यांनी पाहिले की राजे लोक आणि त्यांच्या तलवारी याहून नीतिबळ हे अधिक बलवान आहे. म्हणून त्यांनी राजांना नीतिमान पुरुषांपेक्षा – ऋषी व फकीर यांच्यापेक्षा – कनिष्ठ प्रतिचे मानले.

अशा प्रकारची ज्या लोकांची समाज-रचना आहे ते लोक दुसऱ्यांना शिकवायला लायक होत, त्यांच्याकडून शिकायला नव्हे.

या लोकांत कोर्टे होती, वकील होते, वैद्य होते; पण ते सर्व पद्धतशीर नियमात बसलेले होते. हे धंदे काही वजनदार धंदे नव्हेत हे सर्वांना माहित होते. शिवाय वकील, वैद्य हे लोकांची लूट करीत नसत; ते लोकांचे आश्रित होते. ते लोकांहून वरिष्ठ होऊन राहत नसत. न्याय यथायोग्य मिळत असे. कोर्ट-कचेरी करायची नाही असा लोकांचा नेम होता. त्यांना फसविणारे स्वार्थी लोक तेव्हा नव्हते. तेवढी कीडदेखील फक्त राजेरजवाड्यांच्याच आसपास असायची. सर्वसामान्य लोक स्वतंत्र असत आणि शेतीचे व्यवसाय करीत. खऱ्या स्व-राज्याचा ते उपभोग घेत होते.

आणि जेथे ही चांडाळीण सभ्यता पोचलेली नाही तेथे तसे हिंदुस्तान अजूनही अस्तित्वात आहे. त्यांना तुम्ही तुमच्या नव्या ढोंगांविषयी सांगू लागाल तर ते लोक तुम्हाला हसतील. त्यांच्यावर इंग्रजांचे राज्य चालत नाही, तुमचेही चालायचे नाही.

ज्या जनतेचे नाव घेऊन आपण बोलत असतो तिला आपण ओळखत नाही, ती आपल्याला ओळखत नाही. तुम्हाला, आणि ज्यांना देशाविषयी तळमळ वाटते त्यांना, माझा असा सल्ला आहे की, तुम्ही मंडळींनी जेथे आगगाडीची आग पोचली नाही त्या भागात सहा महिने फिरावे आणि मग देशाविषयी तळमळ राखावी; मगच स्वराज्यासंबंधी बोलावे.

खरी सभ्यता किंवा संस्कृती मी कशाला म्हणतो ते आता तुम्हाला कळले असेल. वर मी जे चित्र रेखाटले आहे अशा स्वरूपाचे हिंदुस्तान जेथे असेल तेथे बदल करायला जाणारा मनुष्य शत्रू समजावा. तो मनुष्य पापी आहे.

**वाचक**: तुम्ही सांगितले तसे हिंदुस्तान असेल तर ठीक, पण ज्या देशात हजारो बालविधवा आहेत, ज्या देशात दोन वर्षांच्या मुलींची लग्ने होतात, ज्या देशात बाराव्या वर्षी मुले-मुली संसार करायला लागतात, ज्या देशात स्त्री एकापेक्षा अधिक नवरे करते, ज्या देशात नियोगाची चाल आहे, ज्या देशात धर्माच्या नावाने रेड्या-बकऱ्यांची हत्या होते, असा देशही हिंदुस्तानच आहे. ही तुम्हाला खऱ्या सभ्यतेची लक्षणे वाटतात काय?

**संपादक**: तुम्ही चुकता आहा. तुम्ही जे दोष दाखविले ते दोषच आहेत. त्यांना कोणी सभ्यता म्हणत नाही. ते दोष संस्कृति असतानासुद्धा राहिलेले आहेत. ते दूर करण्याचे सदोदित प्रयत्न झाले आहेत आणि होतच राहतील. आपल्यामध्ये जी नवी भावना आली आहे तिचा उपयोग आपण हे दोष दूर करण्याकडे करू शकतो.

मी तुम्हाला ज्या आधुनिक सुधारणेच्या खुणा सांगितल्या त्या त्या सुधारणेचे पुरस्कर्ते स्वतःच दाखवून देतात. मी हिंदुस्तानच्या ज्या संस्कृतिचे वर्णन केले ते वर्णन आधुनिक सुधारणेचे पुरस्कर्तेच करतात.

कोणत्याही देशात कोणत्याही सभ्यतेने सगळी माणसे पूर्णतेला पोचतात असे होत नाही. हिंदू संस्कृतीचा रोख नीती दृढ करण्याकडे आहे; पश्चिमेकडील सभ्यतेचा रोख अनीति दृढ करण्याकडे आहे, म्हणून तिला कुधारणा म्हटले. पश्चिमेकडील सभ्यता निरीश्वरवादी आहे, हिंदुस्तानची

संस्कृति ईश्वरवादी आहे. हे लक्षात घेऊन, श्रद्धा ठेवून, हिंदुस्तानच्या हितचिंतकांनी, मूल जसे आईला बिलगून राहते त्याप्रमाणे, हिंदी संस्कृतिला चिकटून राहणेच योग्य आहे.

## १४. हिंदुस्तानची सुटका कशी होईल?

**वाचक:** सभ्यतेविषयीचे तुमचे विचार कळले. तुमच्या म्हणण्याचा विचार करावा लागेल. मात्र एकदम सगळे मला मान्य करता येणार नाहीत. तशी तुम्ही अपेक्षाही बाळगली नसेल. तुमच्या विचारानुसार हिंदुस्तानची सुटका होण्याचा कोणता उपाय तुमच्या मनात आहे?

**संपादक:** माझे विचार एकदम सर्वजण मान्य करतील असे मी समजतच नाही. तुमच्यासारखी माणसे, जी माझे विचार जाणू इच्छितात, त्यांना ते सांगणे हे माझे कर्तव्यच आहे. ते त्यांना पसंत पडले की नाही ते कालांतरानेच कळेल.

हिंदुस्तानच्या सुटकेचे उपाय खरे पाहता आपण आधी पाहिले आहेत; अर्थात् ते दुसऱ्या रूपात पाहिले, आता आपण स्व-रूपात ते तपासून पाहू या.

ज्या कारणाने आजारी माणूस आजारी पडला ते कारण दूर केले की आजारी बरा होतो, ही जगप्रसिद्ध गोष्ट आहे. तसेच हिंदुस्तान ज्या कारणांनी गुलामगिरीत पडले, ती कारणे दूर झाली की ते स्वतंत्र होईल.

**वाचक:** हिंदुस्तानची संस्कृति तुम्ही मानता तशी जर सर्वोत्तम आहे तर मग ते गुलाम कसे झाले?

**संपादक:** संस्कृति मी जी सांगितली तशीच आहे, पण सर्व संस्कृतिच्यावर संकटे ही येतच असतात असे आढळून येते. जी संस्कृति अचल असते ती शेवटी साऱ्या संकटांना दूर सारते. हिंदुस्तानच्या लोकांत उणीवा होत्या, म्हणून ती संस्कृति संकटांनी वेढली; पण त्यातून सुटण्याची

तिच्यात शक्ति आहे ही गोष्ट तिची महत्ता दाखविते.

दुसरे म्हणजे, सर्व हिंदुस्तानला त्या सभ्यतेचा स्पर्श झालेला नाही. ज्यांनी पाश्चात्य शिक्षण घेतले आणि जे तिच्या जाळ्यात अडकले तेच गुलाम बनले. आपण जगाला आपल्या फूटपट्टीने मोजतो. आपण गुलाम असू तर आपण जगाला तसे मानू लागतो. आपण दारिद्र्यात आहो म्हणून सगळे हिंदुस्तान तसे आहे असे आपण समजतो. खरे तसे काही नाही. तरी आपली गुलामगिरी ही या देशाचीच गुलामगिरी असे समजणे ठीक आहे. परंतु वर मी म्हटले ती गोष्ट आपण लक्षात घेतली तर, आपली गुलामगिरी गेली की हिंदुस्तानची गुलामगिरी गेली समजा. हे लक्षात आले की स्वराज्याची व्याख्याही हाती येते. आपल्यावर आपले राज्य चालविणे म्हणजे स्वराज्य होय, आणि ते आपल्या हातात आहे. ते स्वराज्य स्वप्नवत् आहे असे समजू नका. मनाने फक्त त्याची कल्पना करायची आणि बसून रहायचे, असले हे स्वराज्य नव्हे. ते असे आहे की तुम्ही स्वत: त्याची गोडी चाखलीत की, दुसऱ्यांना ती चाखायला मिळावी म्हणून तुम्ही आयुष्यभर यत्न करीत रहाल. पण मुख्य म्हणजे प्रत्येकाने हे स्वराज्य चाखावयाचे आहे. बुडणारा दुसऱ्याला वाचविणार नाही, तरणारा वाचवील. आपण स्वत: गुलाम असूं आणि दुसऱ्यांना सोडविण्याच्या गप्पा मारू तर ते घडण्यासारखे नाही.

पण एवढे पुरेसे नाही. अजून आपल्याला आणखी पुढे विचार करावा लागेल. आता, इंग्रजांना हाकून द्यायचे हा हेतू ठेवण्याची गरज नाही एवढे तर तुम्हाला समजले असेल. इंग्रज जर हिंदुस्तानी होऊन राहणार असतील तर आपण त्यांना सामावून घेऊ शकतो. इंग्रज लोक जर आपल्या सभ्यतेसहित येथे राहू इच्छित असतील तर मात्र त्यांना हिंदुस्तानात स्थान नाही. अशी स्थिति आणणे हे आपल्या हातात आहे.

**वाचक:** इंग्रजांनी हिंदुस्तानी बनावे असे तुम्ही म्हणता. ते घडणे शक्य नाही.

**संपादक:** असे म्हणणे म्हणजे इंग्रज लोक माणसे नव्हेत असे

म्हणण्यासारखे आहे. ते आपल्यासारखे होतील की नाही त्याची आपल्याला चिंताही नको. आपण आपले घर स्वच्छ करू या, मग त्यात रहायला लायक असणारेच राहतील, दुसरे आपोआप निघून जातील. असा अनुभव आपणांपैकी प्रत्येकाला येतच असतो.

**वाचक**: इतिहासात काही असे घडल्याचे वाचले नाही.

**संपादक**: इतिहासात आढळले नाही ते घडणारच नाही असे समजणे माणसाला लांच्छनास्पद आहे. जी गोष्ट आपल्या बुद्धिला पटते ती निदान करून पाहणे तर योग्य होईल? प्रत्येक देशाची परिस्थिति एक नसते. हिंदुस्तानची परिस्थिति विचित्र आहे. हिंदुस्तानचे बळ अमाप आहे. त्यामुळे दुसऱ्या देशाच्या इतिहासाशी आपल्याला काय करायचे आहे? इतर संस्कृति धुळीस मिळाल्या तरी हिंदी संस्कृतिला जरासुद्धा धक्का पोचलेला नाही.

**वाचक**: मला हे सगळे बोलणे बरोबर नाही वाटत. आपल्याला इंग्रजांना लढाई करूनच हाकून द्यावे लागणार यात शंकाच नाही. ते जोवर या देशात आहेत तोवर स्वस्थता लाभायची नाही. 'पराधीन सपनेहुं सुख नाहीं' असेच दिसून येते. ते आहेत म्हणून आपण दुर्बळ होत चाललो आहो. आपले तेज नष्ट होत आहे आणि आपले लोक भेदरल्यासारखे दिसतात. इंग्रज हे आपल्या देशासाठी काळदूत आहेत. त्यांना वाटेल ते करून हाकलून लावल्याशिवाय गत्यंतर नाही.

**संपादक**: माझे सगळे बोलणे तुम्ही आवेशाच्या भरात विसरून गेलात. इंग्रजांना आणले आपण आणि येथे ठेवलेही आपणच. आपण त्यांची सभ्यता ग्रहण केली म्हणूनच ते येथे राहू शकतात, हे तुम्ही कां विसरता? त्यांचा जो तिरस्कार तुम्ही करता तो त्यांच्या सभ्यतेचा करणे योग्य होईल. तरी पण समजा की आपण लढाई करून त्यांना हाकलायचे म्हटले तर ते कसे होऊ शकेल?

**वाचक**: इटालीने जसे केले तसे. मॅझिनीने आणि गॅरिबाल्डीने केले ते काय आपल्याला करता येणार नाही? ते मोठे वीरपुरुष होऊन गेले हे तुम्ही नाकबूल कराल काय?

# १५. इटाली आणि हिंदुस्तान

**संपादक:** तुम्ही इटालीचे उदाहरण दिलेत, बरे झाले. मॅझिनी महात्मा होता. गॅरिबाल्डी मोठा योद्धा होऊन गेला. ते दोघेही पूजनीय होते. त्यांच्याकडून आपल्याला पुष्कळ शिकता येईल. तरी इटालीची स्थिति आणि हिंदुस्तानची स्थिति वेगळी-वेगळी आहे.

अगोदर मॅझिनी आणि गॅरिबाल्डी यांच्यामधला फरक जाणून घेण्यासारखा आहे. मॅझिनीचे मनोरथ वेगळे होते. मॅझिनीच्या मनात जे होते ते इटालीत झाले नाही. मॅझिनीने मनुष्यजातीचे कर्तव्य काय याविषयी लिहिताना दाखवून दिले आहे की, प्रत्येक माणसाने स्वत:वर राज्य करू लागले पाहिजे. हे स्वप्नवतच राहिले. गॅरिबाल्डी आणि मॅझिनी यांच्यामध्ये मतभेद झाला होता हे तुम्ही लक्षात घ्या. शिवाय गॅरिबाल्डीने प्रत्येक इटालियनाला शस्त्रे दिली आणि त्यांनी ती घेतली.

इटाली आणि ऑस्ट्रिया या दोहोंत संस्कृति-भेद नव्हता. ते चुलतभाऊच म्हणता येतील. 'जशास तसे' हे इटालीचे धोरण होते. इटालीला परदेशाच्या (ऑस्ट्रियाच्या) जोखडाखालून सोडवायचे एवढीच गॅरिबाल्डीची इच्छा होती. त्याकरिता त्याने काव्हूरच्या करवी जी कपटकारस्थाने केली त्यांनी त्याच्या शौर्याला कमीपणा आणला. आणि शेवटी फळ काय मिळाले? इटालीत इटालियन लोक राज्य करतात म्हणून इटालीची प्रजा सुखी आहे असे जर तुम्ही समजत असाल तर तुम्ही अंधारात चांचपडत आहां असे मला सांगितले पाहिजे. इटाली मुळीच मुक्त झाले नाही हे मॅझिनीने बरोबर दाखवून दिले आहे. इटालीच्या मुक्ततेचा एक अर्थ व्हिक्टर इमॅन्युएलने केला, आणि मॅझिनीने दुसरा केला. इमॅन्युएल, काव्हूर आणि गॅरिबाल्डी यांच्या मताने इटाली म्हणजे इमॅनुएल किंवा इटालीचा राजा आणि त्याचे साथीदार. मॅझिनीच्या विचाराप्रमाणे इटालीचे लोक - तिचे शेतकरी म्हणजेच इटाली; इमॅन्युएल वगैरे हे त्यांचे नोकर. मॅझिनीची इटाली अजून गुलामच आहे. दोन राजांच्या मधे बुद्धिबळाचा डाव चालला

होता; इटालीच्या प्रजेची अवस्था प्याद्यासारखी होती आणि आहे. इटालीचे मजूर अजून दुःखी आहेत. इटालीच्या मजुरांची अजून कोणी दाद घेत नाही. त्यामुळे ते लोक खून करीत आहेत, विरोध दाखवीत आहेत, डोकी फोडीत आहेत. त्या देशात बंड होण्याची धास्ती अजूनही आहेच. अशा स्थितित ऑस्ट्रिया निघून जाण्याने इटालीला काय फायदा झाला? नाममात्र झाला. ज्या सुधारणांकरिता म्हणून युद्ध झाले त्या सुधारणा झाल्या नाहीत, लोकांची स्थिति सुधारली नाही.

हिंदुस्तानची तशी स्थिति करण्याचा तर तुमचा हेतू नसणारच. हिंदुस्तानच्या कोट्यवधी लोकांना सुखी करण्याचा तुमचा विचार आहे; तुम्ही किंवा मी राजसत्ता घ्यावी हा विचार नाही, असे मी समजतो. तसे असेल तर एकच विचार करणे उचित आहे, आणि तो हा की, सामान्य लोक स्वतंत्र कसे होतील.

कित्येक राजेरजवाड्यांच्या अंमलाखाली लोक चिरडले जात आहेत; ते अधमपणे लोकांना त्रास देत आहेत, इंग्रजांपेक्षासुद्धा त्यांचा जुलूम अधिक आहे हे तुम्ही मान्य करांल. असा जुलूम तुम्हाला हिंदुस्तानात पाहिजे असेल तर आपला मेळ जमण्या-सारखा नाही.

देशी राजांच्या अंमलाखाली प्रजा जशी रगडली जात असेल तशी रगडली जाऊ द्यावी, असे काही माझा देशाभिमान मला शिकवीत नाही. माझ्यात बळ असेल तर मी देशी राजांच्या, तसेच इंग्रज लोकांच्या जुलुमाशी टक्कर देईन. स्वदेशाभिमान म्हणजे देशाचे हित असे मी समजतो. देशाचे हित जर इंग्रजांच्या हातून होणार असेल तर मी आज इंग्रजांपुढे मान वाकवीन. जर कोणी इंग्रज हिंदुस्तानला मुक्त केले पाहिजे, जुलुमाला विरोध केला पाहिजे असे म्हणत असेल आणि लोकांची सेवा केली पाहिजे असे म्हणत असेल तर त्या इंग्रजाला मी हिंदुस्तानी समजून त्याचे स्वागत करीन.

दूसरी गोष्ट म्हणजे इटालीप्रमाणे हिंदुस्तानला शस्त्रे मिळाली तर हिंदुस्तान लढणार. यासाठी केवढे भगीरथ-प्रयत्न लागतील याचा तुम्ही विचार केलेला दिसत नाही. इंग्रज लोकांपाशी दारूगोळा भरपूर आहे. त्याची

मला भीति वाटते असे नाही, पण त्यांच्या शस्त्रांनी त्यांच्याशी लढावयाचे असेल तर हिंदुस्तानला शस्त्रसज्जच करावे लागेल हे समजण्यासारखे आहे. हे होणे शक्य असले तरी त्याला किती वर्षे लागतील? शिवाय प्रत्येक हिंदुस्तानी मनुष्याला हत्यारबंद करायचे म्हणजे हिंदुस्तानला युरोपसारखे बनवायचे. तसे झाले तर युरोपची जी दुर्दशा आहे ती हिंदुस्तानची होईल. सारांश, हिंदुस्तानला युरोपची सभ्यता स्वीकारावी लागेल. असेच करायचे असेल तर उत्तम गोष्ट ही की, त्या सभ्यतेत वाकबगार असणाऱ्यांनाच आपण येथे राहू द्यावे. त्यांच्याशी थोडेबहुत लढून झगडून काही थोडे हक्क घेऊ आणि काळ घालवू, परंतु हिंदुस्तानचे लोक कधी शस्त्रे धारण करणार नाहीत, हे लक्षात ठेवा. आणि हे योग्यच आहे.

**वाचक:** तुम्ही फार पुढे गेलात. सर्वांना हत्यारबंद होण्याची गरज काय? आपण पहिल्यांदा काही थोडे खून करून दहशत पसरवू, मग जी थोडी माणसे हत्यारबंद झाली असतील ती उघडपणे लढतील. त्यात प्रथम वीस-पंचवीस लाख हिंदुस्तानी लोक मरतील खरे, पण शेवटी आपण देश ताब्यात घेऊ. आपण गनिमी काव्याची लढाई चालवून इंग्रजांचा पराभव करू.

**संपादक:** तुमचा विचार हिंदुस्तानच्या पवित्र भूमीला राक्षसी बनविण्याचा दिसतो. खून करून देशाला सोडवू असा विचार करताना तुमच्या अंगावर शहारे कसे येत नाहीत? खून करायचा तर तो आपण आपलाच केला पाहिजे. कारण आपण भेकड बनलो आहोत. म्हणूनच खुनाचा विचार करीत आहोत. असली कामे करून तुम्ही सुटका कोणाची करणार? हिंदुस्तानच्या लोकांची केव्हाही अशी इच्छा नाही. ज्यांनी अधम अशा सभ्यतेची भांग घेतली आहे असे आपल्यासारखे लोकच कैफात असा विचार करतात. खून करून राज्य चालविणारे प्रजेला सुखी करू शकणार नाहीत. जे खून धिंगराने केले, जे खून हिंदुस्तानात झाले, त्यांनी फायदा झाला आहे असे तुम्ही समजत असाल तर ती मोठी चूक आहे. धिंगरा हा देशाभिमानी होता असे मी मानतो. पण त्याचे देश-प्रेम वेडे होते. त्याने आपला बळी

भलत्या मार्गाने दिला. अशाने शेवटी नुकसानच होते.

**वाचक**: पण तुम्हाला एवढे तर कबूल करावेच लागेल की, इंग्रज लोक अशा खुनांनी भाबरले आहेत, आणि लॉर्ड मोर्लेनी जे दिले आहे ते त्या धाकानेच दिले आहे.

**संपादक**: इंग्रज लोक भ्याड आहेत तसेच शूरही आहेत. दारूगोळ्यांचा परिणाम त्यांच्यावर लगेच होतो हे मला कबूल आहे. लॉर्ड मोर्ले यांनी जे दिले ते दहशतीमुळे दिले असण्याची शक्यता आहे. पण भयाने मिळालेली वस्तु भय आहे तोवरच टिकून राहू शकते.

## १६. शस्त्रबळ

**वाचक**: भयाने दिलेली वस्तू भय असेल तोपर्यंतच टिकते, ही आणखी एक विचित्र गोष्ट तुम्ही सांगितलीत. दिले ते दिले, त्यात आणखी पुन्हा काय बदल होणार?

**संपादक**: असे नाही. १८५७ सालचा जाहिरनामा काढण्यात आला तो बंडाच्या शेवटी, लोकांत शांतता टिकविण्याकरिता म्हणून. जेव्हा शांतता झाली आणि लोक भोळसट बनले तेव्हा त्या जाहिरनाम्याचा अर्थ बदलला. मी जर शिक्षेच्या भीतिने चोरी करीत नसलो तर शिक्षेची भीति जाताच मला चोरी करावीशी वाटू लागेल आणि मी पुन्हा चोरी करीन. हा अगदी रोजचा अनुभव आहे; त्यात नाकबूल करण्यासारखे काही नाही. भीति दाखवून लोकांकडून काम करून घेता येते असे आपण गृहीत धरले आहे, आणि म्हणून तसे आपण करीत आलो आहोत.

**वाचक**: तुम्ही जे हे सांगत आहां, ते तुमच्या विरुद्ध जाते हे तुमच्या लक्षात येत नाही काय? इंग्रजांनी स्वत: जे काही मिळविले ते शस्त्रबळाने मिळविले आहे हे तुम्हाला कबूल करावे लागेल. त्यांनी जे काय मिळविले ते कुचकामाचे आहे, असे तुम्ही म्हणाला ते माझ्या स्मरणात आहे. पण

त्याने काही माझ्या म्हणण्याला धक्का लागत नाही. त्यांनी कुचकामाचे मिळविण्याचेच योजिले आणि ते मिळविले. तात्पर्य की त्यांनी आपले योजलेले पार पाडले. साधन काय होते त्याची चिंता कशाला? आपला उद्देश जर चांगला असला तर तो आपण वाटेल त्या साधनांनी, हिंसेने देखील, पार पाडू नये काय? चोर जर माझ्या घरात शिरला तर मी काय साधनांचा विचार करीत बसेन? वाटेल ते करून त्याला पळवून लावणे हेच माझे कर्तव्य आहे.

अर्ज-विनंत्या करून आपल्याला आतापर्यंत काही मिळाले नाही आणि मिळणार नाही हे तुम्हाला कबूल आहे असे मला वाटते. तर मग मारून कां घेऊ नये? आवश्यक वाटेल तेवढी माराची भीति नेहमी कायम ठेवू. मूल जर आगीत पाय टाकू लागले तर त्याला वाचविण्याकरिता त्याला रोखण्यात तुम्हाला दोष दिसू नये. कशी का होईना, आपल्याला कार्यसिद्धी करून घ्यायची आहे.

**संपादक**: तुम्ही युक्तिवाद बरा मांडलात. असल्या युक्तिवादाने बरेच जण फसले आहेत. मीसुद्धा असाच युक्तिवाद करीत असे. पण आता माझे डोळे उघडले आहेत आणि मला माझी चूक दिसत आहे. तुम्हाला ती दाखवून देण्याचा मी प्रयत्न करतो.

पहिल्यांदा, इंग्रजांनी जे मिळविले ते हिंसेने मिळविले, म्हणून आपणसुद्धा तसेच करून मिळवू या, हा तुमचा विचार घेऊ. इंग्रजांनी पाशवी शक्तिचा वापर केला आणि आपल्यालाही तो करता येईल, हे तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण त्यायोगे त्यांना जे मिळाले तेच आपल्याला मिळेल. ते तर आपल्याला मुळीच नको हे तुम्ही मान्य कराल.

साधन आणि साध्य यांच्यामधे संबंध नाही ही तुमची समजूत फार चुकीची आहे. त्या चुकीमुळे धर्मपरायण म्हणून समजल्या जाणाऱ्या लोकांनीसुद्धा घोर कर्मे केली आहेत. हे तर धोतऱ्याचे रोप लावून मोगऱ्याच्या फुलांची इच्छा बाळगण्यासारखे आहे. समुद्र तरून जावयाचा तर साधन जहाज हेच होऊ शकेल. त्याऐवजी जर मी बैलगाडी पाण्यात

घातली तर गाडी आणि मी दोघेही तळ गाठू. जसा देव तशी पूजा, हे फार विचार करण्यासारखे वाक्य आहे. त्याचा चुकीचा अर्थ करून लोक घोटाळ्यात पडले आहेत. साधन हे बीज आहे आणि साध्य हे झाड आहे. अर्थात् बीजाचा आणि झाडाचा जसा संबंध तसाच आणि तितकाच संबंध साधन आणि साध्य यांच्यात आहे. सैतानाची भक्ति करून ईश्वरभजनाचे फळ मिळणे शक्य होणार नाही. म्हणजेच, आपण जर असे म्हटले की 'आम्हाला ईश्वराचीच भक्ति करायची आहे, मग साधन सैतान असले म्हणून काय झाले', तर हे म्हणणे अगदी अज्ञानाचे आहे. पेराल तेच उगवेल. इंग्रजांनी अत्याचार करून १८३३ मध्ये मतदानाचे विशेष हक्क मिळविले. अत्याचार केल्याने काय त्यांना आपले कर्तव्य समजले? त्यांची इच्छा हक्क मिळविण्याची होती, ते त्यांनी मारठोक करून मिळविले. खरे हक्क हे कर्तव्यपूर्तीचे फळ असते, तसे त्यांनी मिळविले नाहीत. परिणाम असा झाला की, सगळेजण हक्क मिळविण्यासाठी धडपडू लागले आहेत, कर्तव्यभावना झोपली आहे. जेथे सगळेच जण हक्काच्या गोष्टी बोलतात तेथे कोण कुणाला हक्क देणार? ते काहीच कर्तव्य पार पाडीत नाहीत असे म्हणण्याचा माझा येथे हेतू नाही, पण इच्छिलेले हक्क मिळविल्यानंतर ते अंमलात आणण्याचे कर्तव्य त्यांनी पार पाडलेले नाही. हक्काची लायकी त्यांनी मिळविली नाही, त्यामुळे त्यांचे हक्क त्यांच्या गळ्यांत लोढण्यासारखे होऊन बसले आहेत. म्हणजे जे त्यांना मिळाले ते त्यांच्या साधनाचेच फळ आहे. त्यांना जे पाहिजे होते तसली साधने त्यांनी वापरली.

मला तुमचे घड्याळ तुमच्याकडून हिसकून घ्यायचे असेल तर अर्थात् मला तुमच्याशी मारामारी करावी लागेल. पण जर ते विकत घ्यायचे असेल तर मला तुम्हाला त्याचे पैसे द्यावे लागतील. जर ते तुमच्याकडून बक्षिस म्हणून घ्यायचे असेल, तर मला तुमची मनधरणी करावी लागेल. घड्याळ मिळविताना जे साधन वापरले त्याप्रमाणे तो चोरीचा माल, माझ्या मालकीचा माल किंवा बक्षिस असे त्याचे रूप झाले. तीन साधनांचे तीन वेगवेगळे परिणाम झाले. तेव्हा साधनाची पर्वा कशाला, असे तुम्ही कसे म्हणता?

आता चोराला घालवून देण्याचे उदाहरण घेऊ या. त्याकरिता वाटेल ते साधन वापरावे या तुमच्या विचाराशी मी सहमत नाही. जर माझ्या घरात माझे वडील चोरी करायला आले तर मी एक साधन वापरीन. तेच साधन माझ्या ओळखीचा कोणी आला तर मी वापरणार नाही. आणि तिसराच कोणी अपरिचित असा माणूस आला तर तिसरे साधन वापरीन. जर तो मनुष्य गोरा असेल तर आपण एक साधन वापरू, हिंदुस्तानी असेल तर दुसरे वापरू, असेही तुम्हीच म्हणाल. एखादा अशक्त पोर चोरी करायला आला तर मी एक साधन वापरीन, माझ्या बरोबरीचा असेल तर वेगळे वापरीन, आणि जर तो माझ्यापेक्षा बलवान असून हत्यारबंद असेल तर मी मुकाट्याने पडूनच राहीन. यात वडिलांपासून थेट बलवानापर्यंत वेगवेगळी साधने वापरावी लागतील. वडील असले तर मी कदाचित् झोपूनच राहीन आणि कोणी हत्यारबंद असला तरी झोपून राहीन. वडिलांमध्येही एक बळ आहे; हत्यारबंद माणसातही बळ आहे. दोन्ही बळांपुढे नमून मी माझी वस्तू हातची जाऊ देईन. पित्याचे बळ कोणते? पिता चोरी करतो या विचाराने माझ्या मनात कींव उत्पन्न होईल आणि मला रडू येईल; हत्यारबंदाच्या बळाने माझ्यात रोष उत्पन्न होईल आणि आम्ही कट्टर वैरी बनू. अशी गमतीदार स्थिति आहे. या उदाहरणांवरून आपण साधनाच्या निश्चितीबाबत एकमत होऊ शकू असे नाही. वर घेतलेल्या सर्व प्रकारच्या चोरांच्या बाबतीत काय केले पाहिजे याचा इलाज मला सुचतो. पण तो ऐकून तुम्ही कदाचित् भडकून जाल म्हणून मी तो तुमच्यापुढे ठेवीत नाही. तूर्त तुम्ही त्याची कल्पनाच करा, आणि जर तुम्हाला ती कल्पना येत नसेल तर प्रत्येक उदाहरणाच्या बाबतीत वेगळी वेगळी साधने वापरावी लागतील हे तर तुम्हाला दिसून येतच आहे. चोराला घालवून देण्यासाठी कोणतेही साधन उपयोगात आणले तरी चालण्यासारखे आहे असे नाही, जसे साधन तसा त्याचा परिणाम निपजेल हेही तुमच्या लक्षात आलेच असेल. म्हणून तुमचा धर्म वाटेल ते करून चोराला हाकून देणे हा नाही हे ओघानेच येते.

जरा आणखी थोडे पुढे जाऊ. तो हत्यारबंद मनुष्य तुमची वस्तू घेऊन गेला समजा. तुम्ही ते लक्षात ठेवलेत. तुम्हाला राग आलेला आहे. तुम्ही त्या लुच्च्याला स्वत:साठी नव्हे, पण लोककल्याणाकरिता शिक्षा करू इच्छित आहां. तुम्ही माणसे जमविली आणि त्याच्या घरावर हल्ला केलात. त्याला कळले. तो पळून गेला. त्याने दुसरे दरोडेखोर जमविले. तोही चिडला आहे. तुमचे घर दिवसाढवळ्या मी लुटणार आहे असा निरोप आता त्याने तुम्हाला धाडला आहे. तुम्ही बलवान आहा, भीत नाही. तुम्ही तयारीत आहां. दरम्यान दरोडेखोर तुमच्या आजूबाजूच्या लोकांना सतावतो. ते तुमच्याकडे येऊन तक्रार करतात. तुम्ही म्हणता: 'मी तर तुमच्याकरिता हे सर्व करीत आहे. माझा माल गेला त्याचे काही नाही मला वाटत.' लोक म्हणतात, 'पूर्वी तो आम्हाला मुळीच लुबाडीत नव्हता. तुम्ही त्याच्याशी झगडा सुरू केलात तेव्हापासून त्याने हे सुरू केले आहे.' तुम्हाला इकडे आड तिकडे विहीर असे होते. गरीबाविषयी तुमच्या मनात दया आहे. त्यांचे म्हणणे खरेच आहे. आता काय करावे? दरोडेखोराला सोडून द्यावे? त्यात तुमची अब्रू जाते. अब्रू सर्वांना प्यारी. तुम्ही गरीबांना सांगता: 'चिंता नाही. माझी संपत्ति ही तुमची संपत्ति समजा. मी तुम्हाला हत्यारे देतो आणि ती कशी वापरावयाची तेही शिकवितो. तुम्ही त्या बदमाषाला मारा, सोडू नका.' अशा रीतिने संग्राम वाढला. दरोडेखोर वाढले. आपल्याच हातांनी लोकांनी आपल्यावर अरिष्ट ओढून घेतले. चोराचा सूड घेण्याचा परिणाम असा झाला की झोप विकून जागरण पदरात घेतले. शांति होती तेथे आता अशांती झाली. या अगोदर मरण आले म्हणजे ते मरत. आता रोजचेच मरण दत्त म्हणून उभे. धैर्यवान होते तेथे लोक आता भ्याड बनले. हे काही अतिरेकी चित्र मी रेखाटले नाही, हे तुम्हाला सावकाशीने दिसून येईल. हे चोराला हाकून देण्याचे एक साधन.

आता दुसरे साधन तपासूं या. चोराला तुम्ही अज्ञानी मानलेत. संधी येईल तेव्हा त्याची समजूत घालावी असे तुम्ही योजलेत. तोही माणूसच

आहे, त्याने कोणत्या कारणाने चोरी केली हे आपल्याला काय कळणार, असा तुम्ही विचार केलात. वेळ आली म्हणजे त्याच्यातून चोरीचे बीजच काढून टाकावे हा आपला तुम्ही मार्ग मानलात. असा तुम्ही विचार करीत आहां, एवढ्यात तो गृहस्थ पुनः चोरी करायला आला. तुम्ही त्याच्यावर रागावला नाहीत. तुमच्या मनात त्याच्याविषयी दया उपजली. हा मनुष्य रोगी आहे असे तुम्हाला वाटले. तुम्ही खिडक्या-दरवाजे उघडून ठेवलेत. झोपण्याची जागा तुम्ही बदललीत. तुमच्या वस्तु चट्दिशी हाती येतील अशा ठेवल्यात. चोर आला, त्याने हे पाहिले. तो बावरला. हे त्याला काही नवीनच दिसले. माल तो घेऊन गेला, पण त्याच्या मनात खळबळ सुरू झाली. त्याने गावात चौकशी केली. तुमच्या दयाभावनेची त्याला माहिती झाली. त्याला पस्तावा झाला आणि त्याने तुमची माफी मागितली. तुमचे जिन्नस त्याने परत आणून दिले. त्याने चोरीचा धंदा सोडला. तुमचा तो सेवक बनला. तुम्ही त्याला एखाद्या कामाला लावलेत. हे दुसरे साधन.

साधन वेगळे वापरले की परिणाम वेगळा होतो हे तुम्हाला दिसले. सगळे चोर असेच वागतील किंवा सर्वांमध्ये तुमच्यासारखाच दयाभाव असेल असे यातून मला सिद्ध करायचे नाही. मला एवढेच दाखवायचे आहे की चांगले परिणाम जर निष्पन्न करायचे असतील तर साधने चांगलीच पाहिजेत. आणि नेहमी नसले तरी बहुतेक वेळा शस्त्रबळापेक्षा दयाबळ हे अधिक सामर्थ्यवान असते. शस्त्रात हानी आहे, दयेत हानी मुळीच नाही.

आता अर्ज-विनंतीचा मुद्दा. ज्याच्यामागे बळ नाही ती अर्ज-विनंती व्यर्थ आहे, यात काडीमात्र शंका नाही. तरी कै. न्यायमूर्ती रानडे म्हणत की अर्ज हे लोकांना शिक्षण देऊन तयार करण्याचे साधन आहे. त्यायोगे लोकांना स्वतःच्या परिस्थितिची जाणीव देता येते आणि राज्यकर्त्यांना सावधानतेची सूचना देता येते. असा विचार केला तर अर्ज करणे ही निरर्थक गोष्ट नाही. बरोबरीच्या माणसाने अर्ज केला तर ते त्याच्यात असलेल्या विनयाचे निदर्शक समजले जाईल. गुलामाने अर्ज केला तर ती त्याच्या गुलामगिरीची खूण आहे. ज्या अर्जाच्या मागे सामर्थ्य आहे असा

अर्ज म्हणजे बरोबरीच्या माणसाचा, आणि असा माणूस आपली मागणी अर्जाच्या रूपाने जाहीर करतो त्यात त्याच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो.

अर्जाच्या मागे दोन प्रकारची सामर्थ्ये असतात. एक म्हणजे 'न द्याल तर तुम्हाला मारून टाकू.' हे शस्त्रबळ आहे. त्याचा वाईट परिणाम काय होतो ते आपण पाहिले. दुसरे बळ म्हणजे – 'तुम्ही न द्याल तर आम्ही तुमचे अर्जदार राहणार नाही. आम्ही अर्जदार म्हणून राहिलो तरच तुम्ही बादशहा म्हणून रहाल. आम्हाला तुमच्याशी कोणताच व्यवहार करावयाचा नाही.' या बळाला तुम्ही दयाबळ म्हणा, आत्मबळ म्हणा किंवा सत्याग्रह म्हणा. ते बळ कधी नष्ट होणारे नाही आणि ते बळ वापरणाऱ्याला आपली स्थिति बरोबर समजलेली असते. त्या बळाचा समावेश आपल्या वृद्धांनी 'एक नन्ना धरा की पळती रोग माघारा' या (गुजराथी) म्हणीत केला आहे. ते बळ ज्याच्यात आहे त्याच्यापुढे शस्त्रबळाचे काही चालत नाही.

मूल आगीत पाऊल टाकताना त्याला माघारी ओढण्याचे उदाहरण तपासून पाहिले तर त्यात तुम्ही हराल. तुम्ही मुलाला काय करता? समजा की मूल तुमच्यावर एवढा जोर करू शकले की, तुमच्याशी मारामारी करून ते आगीत शिरले, थांबलेच नाही. त्यावर उपाय तुमच्यापाशी एक असा की तुम्ही त्याला थांबविण्याकरिता त्याचा प्राण घ्यावा, किंवा दुसरा म्हणजे ते आगीत असलेले तुम्हाला पाहवत नाही म्हणून त्याच्यासाठी तुम्ही आपला प्राण द्यावा. तुम्ही मुलाचा प्राण काही घेणार नाही. तुमच्यात दयाभाव पुरता नसेल तर तुम्ही त्याच्यासाठी आपला प्राण न देण्याचा संभव आहे. तर मग नाइलाजाने मुलाला तुम्ही आगीत पडू द्याल. म्हणजे तुम्ही निदान मुलावर शरीरबळाचा वापर करीत नाही. मुलाला आगीत घुसण्याला प्रतिबंध करणे तुम्हाला जर शरीरबळाखेरीज इतर रीतिने शक्य झाले तर तसा प्रतिबंध करणे हे ती कमी-अधिक प्रमाणात शक्तीच असली तर शरीरबळच आहे असे तुम्ही मानणार नाही, असे मी समजतो. ते बळ वेगळयाच प्रकारचे आहे. तेच काय ते आपल्याला समजावून घ्यावयाचे आहे.

दुसरी गोष्ट, मुलाला थांबविण्यात तुम्ही फक्त मुलाचे हित पाहत

आहां. तुमचे नियंत्रण त्याच्यावर केवळ त्याच्याच हिताकरिता असते. हे उदाहरण इंग्रजांना मुळीच लागू पडत नाही. तुम्ही इंग्रजांच्या बाबतीत शस्त्रबळ वापरू इच्छिता त्यात तुमचाच, म्हणजे लोकांचा, स्वार्थ तुम्ही पाहता. त्यात दयेचा लवलेशही नाही. तुमचे जर असे म्हणणे असेल की इंग्रज लोक जे अधमपणाचे काम करीत आहेत ती आग आहे, तिच्यात ते अज्ञानाने पडत आहेत, आणि म्हणून त्यातून त्या अज्ञानी माणसांना – म्हणजे वरील उदाहरणातील मुलाला – वाचविण्याची तुमची इच्छा आहे, तर हा प्रयोग अजमावून पाहण्याकरिता जेथे जेथे जी जी माणसे अधम काम करीत असतील तेथे तेथे तुम्हाला जावे लागेल, आणि तेथे तेथे त्यांचा – म्हणजे मुलाचा – प्राण घेण्याऐवजी आपला प्राण होमावा लागेल. इतका पुरुषार्थ करण्याचे तुमच्या मनात असेल तर तुम्ही तसे करण्यास स्वतंत्र आहांत. पण मला ही गोष्ट अशक्य वाटते.

## १७. सत्याग्रह-आत्मबळ

**वाचक:** तुम्ही ज्या सत्याग्रहासंबंधी किंवा आत्मबळासंबंधी बोललात त्याला काही ऐतिहासिक पुरावा आहे काय? आजपर्यंत एकही राष्ट्र तशा बळाने वर चढले आहे असे दिसून येत नाही. हाणामारीशिवाय दुष्ट माणसे सरळच होत नाहीत, असा अनुभव अजूनही येतो.

**संपादक:** कवि तुलसीदासजीनी म्हटले आहे:

*'दया धरम को मूल है, पापमूल अभिमान,*
*तुलसी दया न छांडिये, जबलग घट में प्रान'*

हे वाक्य मला अगदी शास्त्रवचनाप्रमाणे वाटते. दोन अन् दोन जसे चार, तितका विश्वास या वाक्याविषयी मला वाटतो. दयाबळ म्हणजेच आत्मबळ, म्हणजेच सत्याग्रह. या बळाचा पुरावा पदोपदी दृष्टीला पडतो. ते बळ नसते तर पृथ्वी केव्हाच रसातळाला गेली असती. पण तुम्हाला

ऐतिहासिक पुरावा पाहिजे आहे. तेव्हा इतिहास आपण कशाला म्हणतो ते समजून घ्यावे लागेल.

'इतिहास' या शब्दाचा अर्थ 'असे होऊन गेले' (इति, ह, आस) असा आहे. हा अर्थ तुम्ही घेतलात तर तुम्हाला सत्याग्रहाचे पुरावे पुष्कळ देता येतील. ज्या इंग्रजी शब्दाला प्रतिशब्द 'इतिहास' हा आहे, आणि ज्या शब्दाचा अर्थ बादशहांची हकिकत असा आहे, तो अर्थ जर घेतला तर सत्याग्रहाला पुरावा मिळू शकणार नाही. कथलाच्या खाणीत चांदी शोधायला गेलो तर ती कशी मिळणार? 'हिस्टरी' मध्ये जगातल्या दंगलींचीच कहाणी मिळेल. म्हणून गोऱ्या लोकांत म्हण आहे की, ज्या राष्ट्राला 'हिस्टरी' (म्हणून युद्धाची परंपरा) नाही ते राष्ट्र सुखी होय. राजे लोक खेळत कसे, खून कसे करीत, वैर कशी संपादन करीत, हे सर्व 'हिस्टरी' मध्ये सापडते. जर हाच इतिहास असता, जर एवढेच घडले असते, तर जग केव्हाच खलास झाले असते. जगाची कथा जर लढाईने सुरू होत असती तर आज एकही मनुष्य जिवंत दिसला नसता. जे लोक लढायांना बळी पडले आहेत त्यांची अशीच स्थिति झाली आहे. ऑस्ट्रेलियातील हबशी लोकांचे नावनिशाण उरलेले नाही. त्यांच्यापैकी क्वचितच कोणाला ऑस्ट्रेलियाच्या गोऱ्यांनी जिवंत राहू दिले आहे. जे लोक असे मुळापासून उखडले गेले ते सत्याग्रही नव्हते. त्यांच्यापैकी जे जिवंत आहेत त्यांना ऑस्ट्रेलियातील गौऱ्यांची तशीच स्थिति होणार आहे असे दिसून येईल. 'तलवार चालविणाऱ्यांचे मरण तलवारीनेच होते.' पोहणाऱ्याचे मरण पाण्यात असते' अशी आपल्याकडे एक म्हण आहे.

जगात इतक्या मोठया संख्येने माणसे अजून नांदत आहेत यावरून हे समजून येते की जगाची रचना शस्त्रबळावर आधारलेली नसून सत्य, दया किंवा आत्मबळ यावर ती अधिष्ठित आहे. मोठ्यात मोठा ऐतिहासिक पुरावा मुळी हाच आहे की जग हे लढायांचा धिंगाणा चालू असताही टिकले आहे. याचा अर्थ, लढाईच्या बळापेक्षा दुसरे बळ हा जगाचा आधार आहे.

हजारो नव्हे, लाखो माणसे प्रेमभावनेला वश राहून आपले जीवन

घालवितात, कोट्यवधी कुटुंबांच्या दुःखाचा प्रेमभावनेने निरास होतो. शेकडो देशांतले लोक गुण्यागोविंदाने नांदत असतात, याची नोंद इतिहास ठेवीत नाही, तो ठेवूही शकणार नाही. जेव्हा हा दयेचा, प्रेमाचा किंवा सत्याचा प्रवाह अडतो, त्यात खंड पडतो, तेव्हाच त्याची नोंद इतिहासात होत असते. एका कुटुंबातले दोघे भाऊ झगडले. त्यात एकाने दुसऱ्याच्या बाबतीत सत्याग्रह अंमलात आणला. दोघेजण फिरून एक होऊन राहू लागले. याची नोंद कोण घेतो? जर या दोघा भावांत वकीलांच्या मदतीने किंवा अशाच इतर कारणांनी वैरभाव वाढला असता, हत्याराने किंवा कोर्टबाजीने (कोर्ट हेसुद्धा एक प्रकारचे हत्यार किंवा पाशवी बळच आहे) जर ते झगडले असते तर त्यांची नावे वृत्तपत्रात आली असती, शेजाऱ्यापाजाऱ्यांना माहित झाली असती आणि कदाचित इतिहासात त्याची नोंद झाली असती. जी गोष्ट कुटुंबांच्या, जमातींच्या बाबतीत खरी, तीच राष्ट्रांच्या बाबतीत समजावी. कुटुंबाला एक कायदा आणि लोकांना दुसरा असे समजण्याचे काहीच कारण नाही. इतिहास हा अस्वाभाविक घटनांची नोंद घेत असतो. सत्याग्रह हा स्वाभाविक आहे म्हणून त्याची नोंद घेण्याची गरजच नसते.

**वाचक:** सत्याग्रहाची उदाहरणे इतिहासात लिहिलेली दिसणार नाहीत हे जे तुम्ही म्हणता ते लक्षात येते. हा सत्याग्रह म्हणजे काय ते अधिक समजून घेण्याची जरूर आहे. तुम्हाला काय म्हणायचे आहे ते जरा अधिक खुलासा करून समजावून द्याल तर बरे.

**संपादक:** सत्याग्रहाला किंवा आत्मबळाला इंग्रजीत 'पॅसिव रेझिस्टन्स' असे म्हटलें जाते.* ज्या माणसांनी आपले हक्क मिळविण्यासाठी स्वतः दुःख सहन केले होते त्यांच्या त्या पद्धतिला हा शब्द लागू करण्यात आलेला आहे. युद्धबळाच्या विरुद्ध ती पद्धति आहे. एखादे काम मला पसंत पडले नाही तर ते काम मी करणार नाही, यात मी सत्याग्रह किंवा आत्मबळ वापरतो. उदाहरणार्थ, मला लागू पडणारा अमुक एक कायदा

---

* **'सत्याग्रहा'चा अर्थ हा शब्द पुरतेपणी प्रकट करीत** नाही असे नंतर गांधीजीनी म्हटले आहे.

सरकारने पास केला. तो मला पसंत नाही. जर मी सरकारवर हल्ला करून त्याला तो कायदा रद्द करायला लावला तर मी शरीरबळ वापरले असे होईल. पण तो कायदा मी जर मान्यच केला नाही आणि त्यासाठी होणारी शिक्षा भोगली तर मी आत्मबळ किंवा सत्याग्रह अंमलात आणला असे म्हणता येईल. सत्याग्रहात मी स्वत:चेच बलिदान करीत असतो.

दुसऱ्याचा बळी घेण्यापेक्षा आपला बळी देणे हे अधिक चांगले असे कोणीही म्हणेल. दुसरे म्हणजे, सत्याग्रहाने लढत असता जर तो लढा चुकीचा ठरला तर लढा करणाराच फक्त दु:ख भोगतो. म्हणजे आपल्या चुकीची शिक्षा तो स्वत: भोगतो. माणसे चुकीने विरोधाला उभी राहिली अशा पुष्कळ घटना घडल्या आहेत. अमुक कार्य वाईटच्च आहे असे छातीठोकपणे कोणीही सांगू शकत नाही. अर्थात् त्याला जर ते वाईट भासले तर त्याच्यापुरते ते वाईटच्च म्हणायचे. तसे असेल तर त्याने ते करू नये आणि त्याकरिता दु:ख सहन करावे. ही सत्याग्रहाची किल्ली आहे.

**वाचक**: याचा अर्थ तुम्ही कायद्याला विरोध करता! ही तर सरकारशी बेइमानी झाली. आपण नेहमी कायद्याला मान देणारे लोक म्हटले जातो. तुम्ही जहालांच्याही पुढे जात असलेले दिसता. जहालांचे म्हणणे असे आहे की कायदा एकदा झाला की त्याला मान दिलाच पाहिजे, पण कायदा वाईट आहे म्हणून कायदा करणाऱ्यालाच मारून हाकून लावले पाहिजे.

**संपादक**: मी पुढे जातो की मागे राहतो याची तुम्हालाही चिंता नसावी आणि मलाही नाही. जे काही चांगले असेल त्याचा शोध घेऊन त्याप्रमाणे आपण वागू इच्छितो.

आपण कायद्याला मान देणारे लोक आहोत. त्याचा खरा अर्थ, आपण सत्याग्रही आहोत. कायदा आपल्याला योग्य वाटला नाही तर आपण कायदा करणाऱ्यांचे डोके फोडीत नाही. तो रद्द करवून घेण्याकरिता, एक उपाय म्हणून, उदाहरणार्थ, आपण उपवास करतो.

कायदा बरा-वाईट कसाही असला तरी तो मान्य करायचा हा अर्थ अलीकडे आढळतो. पूर्वी तसे नव्हते. आपल्याला पसंत नसलेला कायदा

लोक मोडीत आणि त्याबद्दलची शिक्षा आनंदाने भोगीत. कायदा मान्य नसतानासुद्धा त्याप्रमाणे चालावे असे शिक्षण हे नामर्दपणाचे शिक्षण आहे, धर्माच्या विरुद्ध आहे आणि गुलामी मनोवृत्तीची ती पराकाष्ठा आहे. 'तुम्ही नागवे होऊन आमच्यापुढे नाचा' असे सरकार म्हणू लागले तर काय आपण नाचू? मी जर सत्याग्रही असेन तर सरकारला मी सांगेन: 'तुमचा कायदा राहिला तुमच्यापाशी. मी तुमच्यापुढे नागवाही होणार नाही आणि नाचणारही नाही.' आज आपण इतके असत्याग्रही झालो आहोत की, सरकारपुढे होयबा बनून नागवे नाचण्यापेक्षा सुद्धा नीच कामे आपण करीत असतो.

ज्या माणसात माणुसकी जागृत आहे, ज्याला फक्त ईश्वराचीच भीति वाटते, तो इतर कोणालाही भिणार नाही. मनुष्यकृत कायदे त्याला बंधनकारक आहेत असे मुळीच नाही. सरकारसुद्धा बिचारे 'तुम्ही अमुक केलेच पाहिजे' असे म्हणत नाही. तेसुद्धा म्हणते की 'असे न कराल तर तुम्हाला शिक्षा होईल.' पण आपण इतके अधोगतिला पोचलो आहोत की कायदा जे घालून देतो ते करणे आपले कर्तव्य आहे, आपला धर्म आहे, असे आपण मानून घेतो. अन्यायी वाटणाऱ्या कायद्याला मान देणे हा नामर्दपणा आहे हे एकदा का लोकांच्या लक्षांत आले की मग कोणाच्याही जुलुमाने ते गुलाम राहणार नाहीत. हीच स्व-राज्याची किल्ली आहे.

बहुसंख्य माणसांनी केलेला कायदा अल्पसंख्यांना बंधनकारक असतो असे मानणे हा नास्तिकपणा आणि अंधश्रद्धा आहे. बहुसंख्यांनी केलेले कायदे चुकीचे आढळून आल्याची आणि अल्पसंख्यांचे मत बरोबर असल्याची उदाहरणे पुष्कळ सापडतील. सगळया सुधारणा या अल्पसंख्यांनी बहुसंख्यांच्या विरुद्ध जाऊनच झालेल्या आहेत. ठग लोकांच्या राज्यात ठगविद्येचे ज्ञान जर सक्तीचे मानलेले असले तर काय त्या राज्यातल्या सज्जन माणसाने ती सक्ती मान्य करायची? केव्हाही नाही. अन्यायी कायद्याला मान दिलाच पाहिजे हा भ्रम जोवर दूर होणार नाही तोवर आपली गुलामी मुळीच जाणार नाही. आणि हा भ्रम फक्त सत्याग्रहीच दूर करू शकतो.

शरीरबळाचा किंवा शस्त्रबळाचा वापर करायचा ही गोष्ट वर सांगितलेल्या धर्माला बाधक ठरते. शरीरबळ वापरायचे म्हणजे आपल्याला जे पसंत आहे ते दुसऱ्याकडून आपण सक्तीने करवून घ्यायचे. हे जर योग्य मानले तर दुसऱ्यालाही आमच्याकडून त्याला वाटते ते अंमलात आणविण्याकरिता आमच्यावर शस्त्र चालविण्याचा अधिकार आपोआप मिळतोच. असे होत गेले तर त्याचा कधी अंतच यायचा नाही. घाण्याच्या बैलाच्या डोळ्यावर पट्टी बांधल्यामुळे जसे त्याला वाटते की आपण पुढे-पुढेच जात आहोत, तसे मानायचे असल्यास खुशाल मानावे. पण खरे म्हणजे त्या बैलाप्रमाणे आपण त्या घाण्याभोवतीच फिरत असतो. आपल्याला पसंत नसलेला कायदा मानायला कोणी बांधलेला नाही असे मानणारांनी सत्याग्रह हेच साधन योग्य मानले पाहिजे, नाही तर महाभयंकर परिणाम होईल.

**वाचक**: तुम्ही सांगता आहांत त्यावरून सत्याग्रह हा दुबळ्या माणसांच्या चांगल्या उपयोगाचा आहे असे मला दिसते. ते जर बलवान झाले तर त्यांनी शस्त्रेच हाती घ्यावीत.

**संपादक**: हे तुमचे म्हणणे अत्यंत अज्ञानाचे द्योतक आहे. सत्याग्रह हा सर्वश्रेष्ठ आहे, तो बंदुकीच्या बळापेक्षा जास्त परिणामकारक आहे, असे असताना त्याला दुर्बळाचे हत्यार कसे म्हणता येईल? सत्याग्रहाकरिता जी हिंमत आणि शौर्य लागते ते शस्त्रबळ असणाऱ्याजवळ असूच शकत नाही. निर्वीर्य मनुष्य स्वतःला नापसंत असलेल्या कायद्याचा भंग करू शकेल असे तुम्ही समजता काय? जहाल लोक हे शस्त्रबळाचे पुरस्कर्ते आहेत. मग ते कायद्याला मान देण्याच्या गोष्टी कां बोलतात? त्यांचा मला दोष काढायचा नाही, पण त्यांच्या तोंडून दुसरी गोष्ट निघायचीच नाही. इंग्रजांना मारून ते राज्य करू लागतील तेव्हा तुम्ही-आम्ही त्यांच्या कायद्याला मान तुकविली. पाहिजे अशी त्यांची इच्छा राहील. ती त्यांच्या धोरणाला साजेशीच आहे. पण सत्याग्रही काय म्हणेल? 'जो कायदा मला पसंत नाही तो मी कबूल करणार नाही, मग तोफेच्या तोंडी जरी तुम्ही मला दिलेत तरी चालेल!'

तुम्ही काय मानता? तोफ डागून शेकडो लोकांना मारण्याला धैर्य लागते, की तोफेच्या तोंडी हंसतमुखाने बांधून घ्यायला धैर्य लागते? स्वतः मरण हातावर घेऊन जो फिरतो तो रणवीर की दुसऱ्याचे मरण आपल्या हाती ठेवतो तो रणवीर? नामर्द माणसाला क्षणभरसुद्धा सत्याग्रही होता येणार नाही हे निःसंशय समजा. मात्र शरीराने कृश असणारा मनुष्यसुद्धा सत्याग्रही होऊ शकतो. एक मनुष्यही सत्याग्रही होऊ शकतो आणि लाखो माणसेही होऊ शकतात. पुरुष होऊ शकतात आणि स्त्रियाही होऊ शकतात. त्याला फौजफाटा जमवायची जरूर पडत नाही. त्याला कुस्ती वगैरे शिकण्याची गरज नसते. स्वतःच्या मनावर त्याने ताबा मिळविलेला असला की वनराज सिंहाप्रमाणे तो गर्जना करू शकतो आणि त्याच्या गर्जनेने त्याचे शत्रू बनलेल्यांच्या हृदयांचा थरकांप होतो.

सत्याग्रह ही दुधारी तलवार आहे. ती कशीही वापरता येते. ती वापरणारा स्वतः आणि ज्याच्यावर ती वापरली जाते तो अशा दोघांचेही त्यामुळे कल्याण होते. ती रक्त सांडत नाही, तरी परिणाम मात्र फार मोठा घडवून आणू शकते. तिला गंज चढू शकत नाही. ती कोणी चोरून नेऊ शकत नाही. सत्याग्रह्यांना स्पर्धेत थकवाच येत नाही. सत्याग्रह्याच्या तलवारीला म्यानाची जरूर नाही. ती कोणीही हिसकावून घेऊ शकत नाही. असे असताही तुम्ही सत्याग्रहाला दुर्बळांचे हत्यार म्हणता हे नवलच आहे.

**वाचक**: तुम्ही म्हणालात की सत्याग्रह हे हिंदुस्तानचे खास हत्यार आहे, तर हिंदुस्तानात शस्त्रबळ कधी उपयोगात आलेच नाही की काय?

**संपादक**: तुमच्या मनात हिंदुस्तान म्हणजे मूठभर राजे लोक आहेत. माझ्या मताने हिंदुस्तान म्हणजे ते करोडो शेतकरी, ज्यांच्या आधाराने राजे लोक आणि आपण सगळे जगत आहोत.

राजे लोक शस्त्रे वापरतीलच. त्यांची ती रीतच आहे. त्यांना सत्ता चालवायची आहे. पण जे हुकूम पाळणारे असतात, त्यांना शस्त्रबळाची जरूरी नाही. जगात अशांचीच संख्या मोठी असते. त्यांना एक तर शस्त्रबळ शिकविले पाहिजे किंवा सत्याग्रहबळ शिकविले पाहिजे. ते

शस्त्रबळ शिकले तर राजा आणि प्रजा दोघे पिसाळल्यासारखे होतील. पण ते सत्याग्रह शिकले तर राजाचा जुलूम त्याच्या दोन हात लांबीच्या तलवारीच्या टोकापलीकडे जाऊ शकत नाही. त्याच्या अन्यायी हुकुमाची पत्रास ठेवली जात नाही. शेतकरी लोक कोणाच्या तलवारबळाला कधी वश झाले नाहीत, व्हायचे नाहीत. त्यांना तलवार कशी वापरायची हे माहित नाही, आणि दुसऱ्याच्या तलवारीला ते घाबरतही नाहीत. सदोदित मरणाची उशी करून झोपणारा हा महान् समाज आहे. त्यांनी मरणाचे भय सोडून दिले आहे, म्हणजेच सर्वांचे भय सोडले आहे. हे मी थोडेसे अतिरंजित चित्र उभे केले हे खरे, पण आपण जे तलवारबळाने दिपून गेलो आहोत त्यांना हे चित्र अतिरंजित नाही.

वस्तुस्थिति अशी आहे की शेतकऱ्यांनी, लोकसंघटनांनी आतापर्यंत आपल्या स्वतःच्या कारभारात, तसेच राज्यकारभारात सत्याग्रह वापरलेला आहे. राजा जुलूम करतो तेव्हा प्रजा त्याच्याशी सहकार्य करणे बंद करते. हा सत्याग्रह आहे.

एका संस्थानात रयतेला एक हुकूम आवडला नाही म्हणून रयत गाव सोडून जायला लागली. राजा घाबरला. त्याने रयतेची माफी मागितली आणि हुकूम मागे घेतला, असे मला आठवते. अशी उदाहरणे कितीतरी आहेत. पण हे मुख्यत्वेकरून भारत-भूमीचेच पीक आहे. अशी रयत जेथे असेल तेथे स्वराज्य आहे. तशी नसेल तर ते स्वराज्य कुराज्य आहे.

**वाचक**: तर मग आपल्याला शरीर कमावण्याची जरूरच नाही असे तुम्ही म्हणाल.

**संपादक**: हे तुम्ही कोठून काढले? शरीर कमावल्याशिवाय सत्याग्रही होणे कठीण आहे. जे शरीर लाडावून दुर्बल करून टाकलेले असते त्या शरीरात मन बहुधा दुबळेच असते; आणि मनोबळ नाही तेथे आत्मबळ कुठले? बालविवाह वगैरेंच्या तसेच शरीर लाडावणाऱ्या राहणीच्या वाईट चाली काढून टाकून शरीर कमवावेच लागेल. मरतुकड्या माणसाला तोफेच्या तोंडी उभे रहायला मी सांगितले तर त्यात माझे हसेच होईल.

**वाचक:** तुम्ही सांगता ते लक्षात घेतले तर सत्याग्रही होणे ही काही अशी-तशी गोष्ट नाही असे वाटते; आणि जर तसे असेल तर सत्याग्रही कसे व्हायचे हे तुम्ही समजावून देण्याची आवश्यकता आहे.

**संपादक:** सत्याग्रही होणे सोपे आहे; पण जितके सोपे तितकेच कठिण आहे. चौदा वर्षांचा मुलगा सत्याग्रही बनलेला मी बघितला आहे. रोगी माणसेही सत्याग्रही बनलेली मी पाहिली आहेत. ज्यांचे शरीर भरदार आहे आणि इतर दृष्टींनी जे सुखी आहेत ते मात्र सत्याग्रही होऊ शकले नाहीत हेही माझ्या अनुभवाला आले आहे.

जो मनुष्य देशहिताकरिता सत्याग्रही होऊ इच्छितो त्याने ब्रह्मचर्य पाळले पाहिजे, गरीबी पत्करली पाहिजे, त्याने सत्याची कास तर धरलीच पाहिजे. तशीच त्याच्या ठिकाणी निर्भयता असली पाहिजे, असे मी अनुभवाने पाहिले आहे. ब्रह्मचर्य हे महाव्रत आहे आणि त्यावाचून मन पक्के ताब्यात येणार नाही. ब्रह्मचर्याचे पालन न करण्याने मनुष्य निर्वीर्य, नामर्द व अशक्त बनतो. ज्याचे मन विषयवासनेत घोटाळत आहे त्याला असली झेप पेलणार नाही. हे अगणित उदाहरणांनी दाखविता येईल. तर मग प्रापंचिक माणसांनी काय करावे हा प्रश्न येतो. पण तसा प्रश्न येण्याची जरूर नाही. गृहस्थ माणसाने संग केला तर तो विषयभोग नाही असे कोणी म्हणू शकत नाही. असा उपभोग संततिच्या हेतूशिवाय निषिद्ध मानलेला आहे, आणि सत्याग्रह्याला तर संततिची वासनाच होऊ नये. म्हणून संसारी असूनही त्याने ब्रह्मचर्य पाळावे ही गोष्ट अधिक स्पष्ट करून लिहिण्यासारखी नाही. पत्नीचा विचार काय आहे? हे सर्व कसे होणार? असे विचार उत्पन्न होतात. तरी ज्याला महान् कार्यात भाग घ्यावयाचा आहे त्याला या प्रश्नांचे निराकरण केल्याशिवाय गत्यंतरच नाही.

जशी ब्रह्मचर्याची, तशीच गरीबी पत्करण्याची जरूर आहे. पैशाचा लोभ आणि सत्याग्रहाचा स्वीकार हे शक्य नाही. ज्याच्यापाशी पैसा आहे त्याने तो फेकून द्यावा असे मला म्हणायचे नाही. मात्र पैशाविषयी उदासीन राहणे आवश्यक आहे. सत्याग्रहाचा अवलंब करताना पैसा गमावला तरी

त्याविषयी बेफिकीर राहणे हे उचित आहे.

सत्याचा जो अवलंब करणार नाही त्याला सत्याचे बळ कसे दाखविता येणार? म्हणून सत्याची तर अनिवार्य आवश्यकता असणारच. वाटेल तेवढे नुकसान झाले तरी सत्य सोडता कामा नये. सत्याजवळ छपविण्याजोगे काही असतच नाही. म्हणून सत्याग्रह्यांची गुप्त फौज असू शकणार नाही. या संदर्भात जीव बचावण्यासाठी खोटे बोलावे की नाही असले प्रश्न मनात आणू नयेत. ज्याला खोट्याचा बचाव करावयाचा आहे तोच असले प्रश्न उगीच काढीत बसतो. ज्याला सत्याचाच रस्ता धरायचा आहे त्याला असली धर्मसंकटे येत नाहीत. तशा बिकट अवस्थेत सत्यवादी मनुष्य सापडला तरी तो त्यातून सुटतो.

निर्भयतेशिवाय सत्याग्रहाची गाडी एक पाऊलसुद्धा पुढे जाऊ शकणार नाही. निर्भयता सर्व ठिकाणी आणि सर्व बाबतीत आवश्यक आहे. मालमत्तेविषयी भय नसेल तरच; खोट्या मानाविषयी, सग्यासोयऱ्यांविषयी, सरकारविषयी, आघाताविषयी, किंवा मरणाविषयी भय नसेल तरच, सत्याग्रही बनता येईल.

हे सर्व घडणे कठिण असे समजून सोडून देण्याचे कारण नाही. शिरावर येऊन पडेल ते सहन करण्याची शक्ति निसर्गानेच मनुष्यमात्रात ठेवलेली आहे. हे गुण देशसेवा करायची नसली तरी अंगी आणणे योग्य आहे.

किंबहुना, ज्याला शस्त्रबळ कमवायचे आहे त्यालाही इतक्या गोष्टींची जरूर लागणार हे सहज कळण्यासारखे आहे. रणवीर होणे ही गोष्ट काही कोणालाही इच्छा होताच लगेच लाभण्याजोगी नाही. लढवय्याला ब्रह्मचर्य पाळावे लागेल, भिकारी व्हावे लागेल. रणात निर्भयता नसेल तो कसला लढणार! त्याला सत्याचे व्रत पाळण्याची तितकीशी गरज नाही असे कदाचित् कोणाला वाटेल. पण जेथे निर्भयता आहे तेथे सत्य सहजच वास करते. मनुष्य सत्य सोडतो ते कोणत्या तरी भयामुळेच सोडतो.

म्हणून या चार गुणांनी बुजून जाण्याचे कारण नाही. याशिवाय आणखी जो काही व्यर्थ खटाटोप तलवारबहाद्दराला करावा लागतो त्याची सत्याग्रह्याला

गरज नसते. तलवारबहाद्दराला इतका जो इतर खटाटोप करावा लागतो त्याचे कारण भय हे आहे. त्याच्यात जर पूर्ण निर्भयता आली तर त्याच क्षणी तलवार त्याच्या हातातून गळून पडेल. त्या आधाराची त्याला जरूर राहणार नाही. ज्याचे कोणाशी शत्रुत्व नाही त्याला तलवारीची गरजच नाही. सिंहाला समोर पाहताच आपोआप एका मनुष्यात्मा हातातील लाठी उचलली गेली. आपण निर्भयतेचा धडा फक्त तोंडानेच शिकलो हे त्या मनुष्याला दिसून आले. लगेच त्याने लाठी सोडून दिली आणि तो निर्भय झाला.

## १८. शिक्षण

**वाचक :** तुम्ही इतके सगळे सांगितलेत. त्यात शिक्षणाच्या आवश्यकतेचा कोठेही निर्देश केला नाहीत. आपल्यात शिक्षणाचा अभाव असल्याची आपण नेहमी तक्रार करतो. सक्तिचे शिक्षण देण्याची चळवळ हिंदुस्तानभर सुरू असल्याचे आपण पाहतो. श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांनी आपल्या राज्यात सक्तिचे शिक्षण सुरू केले आहे. सर्वांचे-लक्ष त्याकडे लागले आहे. महाराजांना आपण त्याबद्दल धन्यवाद देतो. हे सगळे प्रयत्न काय व्यर्थच समजायचे?

**संपादक :** आपली संस्कृति जर आपण सर्वोतम मानीत असू तर हा सगळा खटाटोप बहुतांशी व्यर्थ आहे असे मला दिलगिरीपूर्वक म्हणावे लागेल. गायकवाड महाराज आणि इतर आपले धुरंधर पुढारी हे सर्वांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यात त्यांचा हेतू निर्मळ आहे, म्हणून त्यांना धन्यवाद देणे योग्यच आहे. पण त्यांच्या प्रयत्नांचे जे परिणाम घडून येण्याचा संभव आहे ते लपवून ठेवता येणार नाहीत.

शिक्षण म्हणजे काय? जर त्याचा अर्थ अक्षरज्ञान एवढाच असेल तर ते एक साधनच झाले. त्याचा सदुपयोगही होईल आणि दुरुपयोगही होईल. ज्या हत्याराने शस्त्रक्रिया करून आजाऱ्याला बरे करता येते, तेच हत्यार

जीव घेण्यासाठीही वापरता येते. तसे अक्षरज्ञानाचे आहे. त्याचा दुरुपयोग पुष्कळ माणसे करतात हे तर आपण पाहतोच. त्याचा सदुपयोग त्या मानाने थोडीच माणसे करतात. हे माझे म्हणणे बरोबर असेल तर अक्षरज्ञानाने जगाला फायदा होण्याऐवजी त्याचे नुकसानच झाले आहे असे सिद्ध होते.

शिक्षणाचा सर्वसामान्य अर्थ अक्षरज्ञान असाच मानतात. लोकांना लिहायला, वाचायला आणि हिशेब करायला शिकविणे याला प्राथमिक शिक्षण म्हणतात. एक शेतकरी इमानेइतबारे शेती करून आपले पोट भरतो. त्याला जगाचे सर्वसामान्य ज्ञान आहे. वडिलांशी, बायकोशी व मुलांशी कसे वागावे, गावांतल्या लोकांत आपली रीतभात कशी ठेवावी, या सर्व गोष्टींचे त्याला पुरेसे ज्ञान आहे; तो नीतिचे नियम जाणतो आणि पाळतो. पण त्याला आपली सहीसुद्धा करता येत नाही. या माणसाला अक्षरज्ञान देऊन तुम्ही काय करू इच्छिता? त्याच्या सुखात आणखी भर त्यामुळे काय पडणार आहे? त्याच्या झोपडीबद्दल किंवा आजूबाजूच्या परिस्थितिबद्दल तुम्हाला त्याच्या मनात असंतोष निर्माण करायचा आहे काय? त्याकरिता देखील त्याला अक्षरज्ञान देण्याची गरज आहे असे नाही. पाश्चात्य विचारसरणीच्या प्रवाहात ओढले जाऊन आपण असे ठरविले आहे की लोकांना अशा प्रकारचे शिक्षण आपण दिले पाहिजे. त्यात मागचा पुढचा विचार आपण केलेला नाही.

आता उच्च शिक्षणासंबंधी विचार करूं. मी भूगोलविद्या, खगोलविद्या, बीजगणित, भूमिति, भूगर्भशास्त्र हे सर्व शिकलो – अगदी कोळून प्यालो. तरी त्याने काय होणार? त्यायोगे मी स्वत:चे आणि आजूबाजूंच्या लोकांचे अधिक भले काय केले? कोणता हेतू धरून ते सर्व ज्ञान मी घेतले? त्यात मला काय लाभ झाला? हक्सले नावाच्या एका इंग्रज विद्वानानेच शिक्षणासंबंधी पुढीलप्रमाणे उद्गार काढले आहेत. तो म्हणतो: 'ज्या मनुष्याला तरुणपणीच असे शिक्षण मिळाले आहे की शरीराने त्याच्या ताब्यात असावे आणि अवयवांची जी काही शक्ति असेल ती वापरून सर्व कामे सहजगत्या व आनंदपूर्वक करावी, ज्या मनुष्याची बुद्धी सुस्पष्ट

रीतिने, अनासक्तिपूर्वक, सयुक्तिक रीतिने विचार करते, ज्याचे मन निसर्गनियमांसंबंधीच्या ज्ञानाचे भांडार बनले आहे, ज्याची इच्छाशक्ति सत्त्वशील विवेकाची दासी होऊन विकारांना आपल्या ताब्यांत ठेवते, आणि ज्याला सर्व प्रकारच्या दुष्टपणाचा तिटकारा करून इतर माणसांना आपल्याप्रमाणेच मानाने वागविण्याचे वळण मिळाले आहे, असा मनुष्य खरा शिकलेला असे मी मानतो. कारण त्याचे निसर्गाशी अनुसंधान असते. त्यामुळे तो निसर्गाचा आणि निसर्ग त्याचा चांगला उपयोग करून घेतो.'

खरे शिक्षण म्हणजे जर वर सांगितलेले असेल तर मी ज्या शास्त्रांचा आणि विषयांचा उल्लेख केला त्यांचा उपयोग माझ्या शरीराला किंवा इंद्रियांना वश करून घेण्याच्या कामी मला काहीच झालेला नाही हे मी शपथेवर सांगू इच्छितो. तेव्हा प्राथमिक शिक्षण घ्या की उच्च शिक्षण घ्या, त्याचा उपयोग मुख्य जे साधायचे त्या कामी होत नाही. त्याच्या योगाने आपण मनुष्य बनत नाही, त्यायोगे आपण आपले कर्तव्य करायला समर्थ होत नाही.

**वाचक:** असेच जर आहे तर एक प्रश्न तुम्हाला विचारावा लागेल. तुम्ही हे जे सर्व बोलत आहांत हे कशाच्या जोरावर? तुम्ही अक्षरज्ञान आणि उच्च शिक्षण घेतले नसते तर तुम्हाला हे समजावून देणे शक्य झाले असते का?

**संपादक:** बरा तडाखा दिलात. पण माझे उत्तर अगदी सरळ आहे. मी उच्च किंवा प्राथमिक, कोणतेही शिक्षण घेतले नसते तरी मी निरुपयोगी झालो असतो असे काही मी मानीत नाही. आज या गोष्टी सांगून लोकांना उपयोगी पडण्याची मी इच्छा बाळगतो. त्या इच्छेने जे मी शिकलो ते मी कामाला लावतो. पण त्याचा उपयोग – अर्थात् तो उपयोग असेल तर – माझ्या करोडो बांधवांना मी करून देऊ शकत नाही, फक्त तुमच्यासारख्या शिकलेल्यांनाच करून देतो. यातसुद्धा माझ्या म्हणण्यालाच पुष्टि मिळते. आपण दोघेही खोट्या शिक्षणाच्या पंजात अडकलो. मी त्यातून मुक्त झालो असल्याचे मी मानतो. आता माझा हा अनुभव मी

तुम्हाला देत आहे आणि तो देताना मी पूर्वी घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करून तुम्हाला त्यातला बिघाड दाखवीत आहे.

दुसरी गोष्ट, तुम्ही मला तडाखा मारलात ही तुमची चूक आहे, कारण मी काही अक्षरज्ञान हे कोणत्याही स्थितित वाईटच आहे असे म्हटले नाही. फक्त इतकेच सांगितले की त्या ज्ञानाची आपण मूर्तिपूजा करणे बरोबर नाही. ती काही आपली कामधेनू नव्हे. त्याचे जे योग्य स्थान, त्या स्थानी ते शोभून दिसेल. जेव्हा मी आणि तुम्ही आपल्या इंद्रियांना वश करू आणि नीतिचा पाया पक्का घालू, तेव्हा जर आपल्याला अक्षरज्ञान घेण्याची इच्छा झाली तर ते घेऊन त्याचा आपण सदुपयोग करू शकू. अलंकार म्हणून ते कदाचित् साजेल. पण अक्षरज्ञानाचा हाच उपयोग असेल तर ते शिक्षण सक्तिने देण्याची जरूर राहत नाही. आपली जुनी पद्धति पुरेशी आहे. त्यात नीतिच्या शिक्षणाला पहिले स्थान ठेवलेले आहे. तेच खरे प्राथमिक शिक्षण आहे. त्याच्यावर जी रचना करू ती टिकू शकेल.

**वाचक**: तर मग स्वराज्याकरिता इंग्रजी शिक्षणाचा उपयोग तुम्ही मानीत नाही, असेच ना?

**संपादक**: 'होय' आणि 'नाही'ही, असे माझे यावर उत्तर आहे. करोडो माणसांना इंग्रजी शिक्षण द्यायचे म्हणजे त्यांना गुलामगिरीत टाकण्यासारखे आहे. मेकॉलेने ज्या शिक्षणाचा पाया घातला तो, खरे म्हणजे, गुलामगिरीचा पाया होता. त्याने त्या हेतूने आपली योजना घडविली असे मला म्हणायचे नाही, पण त्याच्या कार्याचा परिणाम मात्र तोच झाला आहे. आपण स्वराज्याविषयीसुद्धा परभाषेत बोलतो ही किती दुःखाची आणि बोलकी गोष्ट आहे!

ज्या शिक्षणपद्धति इंग्रजांनी टाकाऊ ठरविल्या त्या आपण डोक्यावर घेतल्या आहेत हे लक्षांत ठेवा. त्या पद्धतित अमुक चांगले नाही, तमुक चांगले नाही असे त्यांचेच विद्वान बोलत असतात. तेथील शिक्षणपद्धति सारख्या बदलतच असतात. इंग्रज लोक जे विसरले असतील त्याला सुद्धा आपण अज्ञानाने चिकटून राहत आहोत. त्यांच्यात आपल्या भाषांची

उन्नति करण्यासाठी केवढा प्रयत्न होत आहे! वेल्स हा इंग्लंडचा प्रदेश. तिथे वेल्श भाषेचा जीर्णोद्धार होऊ लागला आहे. वेल्सच्या मुलांना वेल्श भाषेतच बोलायला लावायचे असा प्रयत्न सुरू आहे. इंग्लंडचे अर्थमंत्री लॉइड जॉर्ज त्यात प्रमुख भाग घेत आहेत. उलट आपली स्थिति पहा. आपण एकमेकाला पत्रे लिहितो ती चुकांनी भरलेल्या इंग्रजीत. अशा चुकीच्या इंग्रजीतून आमचे सर्वसामान्य एम.ए. सुद्धा मुक्त नाहीत. आमचे उत्तमोत्तम विचार सांगण्याचे वाहन काय तर इंग्रजी. आपल्या काँग्रेसचे काम चालते इंग्रजीत. आपली चांगल्यापैकी वृत्तपत्रे इंग्रजीत. हे जर दीर्घकाळपर्यंत तसेच राहिले तर आपली पुढची प्रजा आपला तिरस्कार करील आणि त्यांचा शाप आपल्या आत्म्याला भोवेल असे माझे मत आहे.

इंग्रजी शिक्षण घेऊन आपण देशाला गुलाम बनविले आहे हे तुम्हाला समजण्यासारखे आहे. इंग्रजी शिक्षणाने दंभ, द्वेष, जुलूम इत्यादि वाढले. इंग्रजी शिकलेल्यांनी लोकांना फसविण्यात, त्रास देण्यात. काही कसर ठेवलेली नाही. आज आपण त्यांच्याकरिता जे काही थोडे करीत आहो ती म्हणजे आपण घेतलेल्या कर्जाची यत्किंचित् फेड समजा.

गंमत बघा, माझ्या देशात मला न्याय मिळवायचा आहे तर मला इंग्रजी भाषा वापरावी लागते. हा काय थोडा जुलूम आहे? मी बॅरिस्टर झालो की मी माझ्या भाषेत बोलता कामा नये! माझ्यापुढे दुसऱ्या माणसाने भाषांतर केले पाहिजे! हा काय थोडा दंभ आहे? ही गुलामगिरीची पराकाष्ठा नव्हे तर काय? त्यात इंग्रजांना मी दोष द्यावा की स्वतःला? हिंदुस्तानला गुलाम बनविणारे तर आपण इंग्रजी जाणणारे लोक आहोत. लोकांची हाय हाय इंग्रजांवर येणार नाही, आपल्यावर येईल.

पण मी तुम्हाला म्हटले की, माझे उत्तर 'होय' आणि 'नाही' असे आहे. 'होय' कां ते सांगितले. आता 'नाही' कसे ते सांगतो. सभ्यतेच्या रोगाने आपण इतके ग्रासले गेलो आहोत की इंग्रजी शिक्षण घेतल्यावाचून आपले चालेल असा काळ राहिलेला नाही. ज्यांनी हे शिक्षण घेतले आहे, त्यांनी त्याचा अवश्य सदुपयोग करावा. इंग्रजांशी करावयाच्या व्यवहारांत,

ज्या हिंदुस्तानी माणसांची भाषा आपल्याला आज येत नाही त्यांच्याशी व्यवहार करताना आणि इंग्रज स्वतःच्याच सभ्यतेला कसे विटून गेले आहेत ते समजून घेण्याकरिता इंग्रजीचा उपयोग आपल्याला करता येईल. जे इंग्रजी शिकले आहेत त्यांच्या मुलांना अगोदर नीति शिकवावी, त्यांना स्वभाषा शिकवा; त्यांना हिंदुस्तानातील आणखी एखादी भाषा शिकवावी. मुले मोठी झाली म्हणजे त्यांनी खुशाल इंग्रजी शिक्षण घ्यावे. तेसुद्धा तिचे उच्चाटन करण्याच्या हेतूने; त्यातून पैसे मिळविण्याच्या हेतूने नव्हे. तितकी इंग्रजी शिकतानासुद्धा त्यातून आपल्याला काय शिकायचे आहे आणि काय शिकायचे नाही याचा आपल्याला विवेक करावा लागेल. कोणत्या शास्त्रांचा अभ्यास करायचा त्याचाही विचार करावा लागेल. थोडा विचार केला तर समजून येईल की, इंग्लिश डिग्री घेण्याची आपण पर्वा केली नाही तर इंग्रज सत्ताधारी सावध होतील आणि आपल्याकडे लक्ष देतील.

**वाचक**: तर मग शिक्षण कोणते द्यावे म्हणता?

**संपादक**: त्याचे उत्तर वर थोडेसे येऊन गेले आहे. तरी त्याचा अधिक विचार करू या. मला तर असे वाटते की आपण आपल्या सर्व भाषांना उजळविणे जरूर आहे. आपल्या भाषेतून आपण शिक्षण घ्यायचे म्हणजे काय, याचा विस्तार करण्याचे हे स्थळ नव्हे. जी इंग्रजी पुस्तके आपल्या उपयोगाची आहेत त्यांचे भाषांतर करावे लागेल. पुष्कळ शास्त्रे शिकण्याचा मिथ्या भाव आणि समज सोडून द्यावा. सर्वप्रथम तर धर्मशिक्षण किंवा नीतिशिक्षण हेच द्यायला हवे. प्रत्येक शिकलेल्या हिंदी माणसाला स्वभाषा आणि हिंदूला संस्कृत, मुसलमानाला अरबी, पारशाला फारसी आणि सर्वांना हिंदी ह्या भाषांचे ज्ञान असले पाहिजे. काही हिंदूंनी अरबी आणि काही मुसलमान- पारशांनी संस्कृत शिकून घेतले पाहिजे. उत्तरेकडच्या आणि पश्चिमेकडच्या हिंदी माणसांनी तमिळ शिकले पाहिजे. सगळया हिंदुस्तानसाठी सर्वसामान्य भाषा तर हिंदीच असली पाहिजे. ती उर्दू किंवा नागरी लिपीत लिहिण्याची मुभा असणे इष्ट आहे. हिंदु- मुसलमानांचे संबंध योग्य रहावेत म्हणून त्या दोन्ही लिप्या पुष्कळ लोकांनी शिकून

घेण्याची जरूर आहे. असे झाले म्हणजे आपण एकमेकांशी करावयाच्या व्यवहारात इंग्रजीला फाटा देऊ शकू.

– आणि हे सारे कोणाकरिता? आपण जे गुलाम झालो आहोत त्यांच्याकरिता. आपल्या गुलामीमुळे सर्वसामान्य लोक गुलाम झाले आहेत. आपण मुक्त झालो की लोक मुक्त झालेच समजा.

**वाचक**: तुम्ही धर्मशिक्षणाविषयी सांगितलेत ते कठीण आहे.

**संपादक**: तरी त्याशिवाय सुटका नाही. हिंदुस्तान कधीही नास्तिक होणार नाही. नास्तिकतेचे पीक हिंदभूमीला आवडत नाही. काम अवघड निश्चितच आहे. धर्माच्या शिक्षणाचा विचार करताना डोके फिरायला लागते. धर्माचार्य दांभिक आणि स्वार्थी दिसून येतात. त्यांचे मन आपल्याला वळवावे लागेल. मुल्ला, दस्तूर आणि ब्राह्मण यांच्या हाती त्याची किल्ली आहे. पण जर त्यांना सद्बुद्धि झाली नाही, तर इंग्रजी शिक्षणाने जो उत्साह आपल्यात उत्पन्न झाला आहे तो वापरून आपल्याला लोकांना नीतिचे शिक्षण देता येण्याजोगे आहे. ही फार कठिण गोष्ट नाही. हिंदुस्तानी लोक– समुद्राच्या काठाशीच कुठे थोडा मळ जमा झाला आहे. त्या मळाने जे मळले आहेत, त्यांनी स्वच्छ व्हावयाचे आहे. आपल्या प्रयत्नांनी सुद्धा बहुतांशी आपण स्वच्छ होऊ शकतो. माझी टीका ही सर्वसामान्य करोडो लोकांना लागू नाही. हिंदुस्तानला योग्य मार्गावर आणण्याकरिता आपण स्वत: योग्य मार्गावर आले पाहिजे. बाकी करोडो लोक योग्य मार्गावरच आहेत. त्यांच्यात सुधारणा, उन्नति, अवनति ही कालानुक्रमाने होत राहीलच. पाश्चात्य सभ्यतेला घालवून देणे हाच प्रयत्न अगोदर करायचा आहे. बाकी सगळे मग ठीक होईल.

## १९. यंत्रे

**वाचक**: पश्चिमेची सभ्यता घालवून देण्यासंबंधी तुम्ही बोलता तेव्हा तुम्ही असेही म्हणाल की, कोणतेही यंत्र आपल्याला मुळीच नको.

**संपादक**: हा प्रश्न विचारून तुम्ही माझ्या जखमेवरची खपली उडवलीत. श्री. रमेशचंद्र दत्त यांचे 'हिंदुस्तानचा आर्थिक इतिहास' हे पुस्तक मी वाचले तेव्हा मला रडू कोसळले होते. त्याचा पुन्हा जेव्हा विचार माझ्या मनात येतो, तेव्हा अंत:करण भरून येते. यंत्राचा तडाखा बसला म्हणून तर हिंदुस्तान जमीनदोस्त झाला. मँचेस्टरने जे आपले नुकसान केले आहे त्याला काही सीमा नाही. हिंदुस्तानातून कारागिरी जवळजवळ नाहीशी झाली हे मँचेस्टरचेच काम.

पण माझी चूक झाली. मँचेस्टरला कां म्हणून दोष द्यावा? आपण त्याचे कपडे वापरू लागलो, म्हणूनच मँचेस्टरने ते विणले ना? बंगालच्या बहादुरीचे वर्णन जेव्हा मी वाचले तेव्हा मला फार हर्ष झाला. बंगालमध्ये कापडाच्या गिरण्या नाहीत, त्यामुळे लोकांनी मुळचा धंदा परत पत्करला आहे. बंगाल हे मुंबईच्या गिरण्यांना उत्तेजन देते ते ठीकच आहे, पण जर बंगालने यंत्रावर निघालेल्या सर्व मालाचा बहिष्कार केला असता तर आणखी बरे झाले असते.

यंत्रांनी युरोप उजाड होत चालले आहे आणि त्यांचे वारे आता हिंदुस्तानात वाहू लागले आहेत. यंत्रे ही आधुनिक सुधारणेची मुख्य निशाणी आहे. ते महापाप आहे असे मला तरी स्पष्ट दिसत आहे.

मुंबईच्या गिरण्यांत जे मजूर काम करतात ते गुलाम बनले आहेत. ज्या बाया त्यात कामे करतात त्यांची दशा बघून कोणाच्याही अंत:करणाचा थरकाप होईल. गिरण्यांचा पाऊस पडला नव्हता तेव्हा काही या बाया उपाशी मरत नव्हत्या. हे यंत्राचे वारे सोसाट्याने वाहू लागले तर हिंदुस्तानची अवस्था फार शोचनीय होईल. माझे बोलणे अतिरेकी वाटेल, परंतु हे सांगितलेच पाहिजे की आपण हिंदुस्तानात गिरण्या काढण्यापेक्षा आजसुद्धा

मँचेस्टरला पैसे पाठवून तिथले रद्दी कापड वापरणे बरे. कारण तिथले कापड वापरण्याने आपला पैसाच तेवढा जाईल; हिंदुस्तानात मँचेस्टर करण्याने आपला पैसा हिंदुस्थानात राहील खरा, पण तो पैसा आपले रक्त शोषेल, कारण तो आपली नीति नाहीशी करील. जे गिरण्यांत काम करतात त्यांची नीति कशी आहे हे त्यांनाच विचारा. त्यांच्यापैकी ज्यांनी पैसा सांठविला आहे त्यांची नीति इतर धनिकांपेक्षा चांगली असण्याचा संभव नाही. अमेरिकेच्या रॉकफेलरहून हिंदुस्तानचे रॉकफेलर कमी पडतील असे मानणे हे अज्ञानच म्हणावयाचे. गरीब हिंदुस्तान मुक्त होऊ शकेल, पण अनीतिने श्रीमंत झालेल्या हिंदुस्तानला गुलामीतून सुटण्याची आशा नाही.

इंग्रजी राज्य येथे टिकवून धरणारे श्रीमंत लोकच आहेत हे आपल्याला कबूल करावे लागेल. ते राज्य राहण्यातच त्यांचा स्वार्थ आहे. पैसा माणसाला दीन बनवितो. तशी दुसरी गोष्ट म्हणजे विषयवासना. या दोन्ही विषमय आहेत. त्यांचा दंश सर्पाच्या दंशाहूनही भयंकर आहे. साप चावतो तेव्हा फक्त शरीरच नष्ट होते, पण पैसा किंवा वासना चावते तेव्हा देह, जीव, मन — सगळ्याचाच नाश होतो. म्हणून आपल्या देशात गिरण्या झाल्याबद्दल विशेष आनंद मानण्यासारखे काही नाही.

**वाचक :** मग काय गिरण्या बंद करून टाकाव्यात?

**संपादक :** ही गोष्ट कठिण आहे. स्थायी झालेली वस्तू काढून टाकणे कठिण असते. म्हणून कार्याचा अनारंभ हे पहिले शहाणपण म्हटले आहे. गिरणीच्या मालकांकडे आपण तिरस्काराच्या नजरेने पाहणे योग्य नाही. त्यांची आपण कींव केली पाहिजे. ते एकदम गिरण्या सोडून देतील हे शक्य नाही, पण आपण त्यांना त्या जास्त न वाढवण्याची विनंती करू शकतो. त्यांना भलेपणा दाखविण्याची इच्छा असली तर आपापले काम हळूहळू त्यांनी आटोपते घ्यावे. त्यांना घरोघर जुने, प्रौढ, पवित्र चरखे ठेवता येतील, लोकांनी विणलेले कापड घेऊन विकता येईल. तसे त्यांनी नाही केले तरी आपण यंत्राची वस्तू वापरायची नाही, असे लोकांना ठरविता येईल.

**वाचक :** हे झाले कापडासंबंधी, पण यंत्रांनी बनलेल्या असंख्य वस्तू आहेत. त्या एक तर परदेशातून आणाव्या लागतील, किंवा तशी यंत्रे आपल्याला आणावी लागतील.

**संपादक :** खरोखर आपले देवसुद्धा (मूर्ति) जर्मनीच्या यंत्रांत तयार होऊन येतात; मग आगपेटी किंवा टाचणीपासून काचेच्या झुंबरापर्यंतच्या गोष्टींबद्दल काय बोलावे! माझे उत्तर एकच आहे. ज्या वेळी या सगळ्या वस्तू यंत्रांनी बनत नव्हत्या त्या वेळी हिंदुस्तान काय करीत होते? तसे आजही करता येऊ शकते. जोपर्यंत हातांनी टाचणी आपण बनवू शकणार नाही तोपर्यंत टाचणीशिवाय काम चालवू, हंड्या-झुंबरांशिवाय चालवू, पणतीत तेल घालून, आपल्या शेतात पिकलेल्या कापसाची वात बनवून दिवे लावू. तसे केल्याने डोळ्यांचे रक्षण होईल, पैसा वाचेल आणि आपण स्वदेशी राहू, स्वदेशी होऊ व स्वराज्याचे अग्निहोत्र जागते ठेवू.

हे सर्व सगळी माणसे एकाच वेळी करतील किंवा एकाच वेळी काही माणसे यंत्राच्या सर्व वस्तू सोडून देतील हे शक्य होणार नाही. पण जर तो विचार खरा असेल तर आपण सतत शोध करीत राहू, सतत थोड्या थोड्या वस्तू सोडीत जाऊ; आपण असे करू लागलो की, दुसरेही करतील. अगोदर हा विचार स्थिर होण्याची गरज आहे; मग त्याप्रमाणे काम होईल. अगोदर एकच माणूस करील; मग दहा, शंभर अशी ही संख्या वाढतच जाईल. जे मोठे करतात ते लहान करतात आणि करतील. पटले तर हे काम फार थोडक्यात होणारे आणि सोपे आहे. दुसरा करीपर्यंत मी वाट पाहत रहायची नाही. आपल्याला पटले की, लगेच सुरूच करायचे. जो करणार नाही त्याचे नुकसान होईल. पटूनही जो अंमलात आणणार नाही तो दांभिक समजला जाईल.

**वाचक :** ट्रामगाडी आणि वीजबत्तीसंबंधी काय?

**संपादक :** हा प्रश्न तुम्ही फार उशिरा विचारलात. या प्रश्नात आता काही दम राहिला नाही. रेल्वेने जर आपला नाश केला आहे तर काय ट्राम करत नाही? यंत्र हे एक सापाचे वारूळ आहे. त्यात एक नव्हे, शेकडो

साप असतात. एकामागून दुसरा अशी रांगच लागलेली असते. जेथे यंत्रे तेथे मोठी शहरे. जेथे मोठी शहरे तेथे ट्रामगाड्या आणि रेल्वे. तेथेच विजेच्या दिव्यांची जरूर. इंग्लंडातसुद्धा खेड्यात विजेचे दिवे किंवा ट्राम नाही हे तुम्हाला माहीत असेल. प्रामाणिक वैद्य किंवा डॉक्टर तुम्हाला सांगतील की जेथे रेल्वे, ट्रामगाड्या वगैरे वाढलेल्या आहेत तेथे लोकांचे आरोग्य बिघडलेले असते. मला आठवते की युरोपमधील एका शहरात जेव्हा पैशाचा तुटवडा पडला तेव्हा ट्रामचे, वकीलांचे आणि डॉक्टरांचे उत्पन्न घटले, पण लोकांचे आरोग्य सुधारले.

यंत्राचा एकही गुण माझ्या लक्षात येत नाही; अवगुणांचा मात्र वाटेल तेवढा पाढा वाचता येईल.

**वाचक**: हे सर्व लिहिलेले यंत्राच्या मदतीने छापले जाईल, त्याच्या मदतीने पसरविले जाईल, हा यंत्राचा गुण की अवगुण?

**संपादक**: विषाने विष मारण्याचे हे एक उदाहरण आहे. हा काही यंत्राचा गुण नाही. यंत्र मरता मरता सांगून जात आहे की, 'ऐका आणि सावध व्हा. माझा तुम्हाला कसलाही फायदा होणार नाही.' हा जो योग्य प्रयत्न यंत्राने केला म्हणू, तोही यंत्राच्या जाळ्यात जे अडकले आहेत त्यांनाच फक्त उपयोगी पडतो.

पण मूळ गोष्ट विसरू नका. यंत्र वाईट आहे हे मनात पक्के धरा. मग त्याचे हळूहळू आपण उच्चाटन करू. वस्तूची आपल्याला इच्छा होताच ती लगेच प्राप्त व्हावी असा निसर्गनियम नाही. आपण यंत्राकडे 'वर' म्हणून न पाहता 'शाप' म्हणून पाहू, तर ते शेवटी खात्रीने जाईल.

## २०. सुटका

**वाचक**: तुमच्या विचारावरून तुम्ही तिसराच एक पक्ष काढू इच्छिता असे दिसते. तुम्ही एक्स्ट्रीमिस्ट(जहाल)ही नाही, मॉडरेट(मवाळ) ही नाही.

**संपादक**: ही तुमची गैरसमजूत आहे. माझ्या मनात तिसऱ्या पक्षाचा विचार मुळीसुद्धा नाही. सर्वांचे विचार सारखे नसतात. मॉडरेट मंडळीत सगळे एकाच विचाराचे असतात असे समजू नका. ज्यांना फक्त सेवाचाकरीच करायची आहे त्यांना पक्ष कुठला? मी तर मॉडरेटांची सेवा करेन आणि तशीच एक्स्ट्रीमिस्टांचीही करेन. जेथे त्यांच्या मताहून माझे मत वेगळे पडेल तेथे मी त्यांना नम्रतेने सांगेन आणि माझे काम करीत राहीन.

**वाचक**: या दोन पक्षांना तुम्ही काय सांगाल?

**संपादक**: जहालांना मी सांगेन की तुमचा उद्देश हिंदुस्तानसाठी स्वराज्य मिळवावे असा आहे, परंतु तुमच्या प्रयत्नांनी स्वराज्य मिळणार नाही. स्वराज्य प्रत्येकाने स्वतःसाठी मिळविले पाहिजे – निर्माण केले पाहिजे. दुसऱ्याने दिलेले ते स्वराज्य नव्हे, परराज्य आहे. म्हणून इंग्रजांना घालवले तर स्वराज्य मिळाले असे तुम्ही समजाल तर ते योग्य नाही. खरे स्वराज्य काय ते मी यापूर्वी सांगितलेच आहे. ते दारूगोळ्यांनी तुम्ही कधी मिळवू शकणार नाही. हिंदुस्तानला मानवण्याजोगी दारूगोळा ही वस्तू नाही. म्हणून सत्याग्रहावरच भरवसा ठेवा. स्वराज्य मिळविण्या- करिता दारूगोळ्याची गरज आहे अशी शंकासुद्धा मनात आणू नका.

मवाळांना मी सांगेन की आपण फक्त अर्जविनंत्या करीत राहू तर त्यात आपला कमीपणा आहे. असे करण्यात आपण आपला कमीपणा मान्य करतो. इंग्रजांचा संबंध असण्याची जरूर आहे असे म्हणणे हे ईश्वराला नाकारण्यासारखे आहे. आपल्याला ईश्वराशिवाय आणखी कोणाची जरूर आहे असे म्हणणे योग्य नाही. शिवाय व्यवहारबुद्धिने विचार केला तरीसुद्धा दिसेल की 'इंग्रजांशिवाय सध्या तरी आमचे चालणार नाही' असे म्हणणे इंग्रजांना अहंकारी करण्यासारखे आहे.

इंग्रज बाडबिस्तरा बांधून निघून गेले, तर हिंदुस्तान अनाथ होईल असे समजण्याचे कारण नाही. ते गेल्याने, जे त्यांच्या दडपणाने आज गप्प बसले आहेत ते लढतील अशी शक्यता आहे. गळू दाबल्याने काही फायदा होणार नाही. ते फुटणेच जरूर आहे. म्हणजे जर आपापसात लढणेच आपल्या नशिबात असले तर आपण लढत मरू. त्यात दुसऱ्यांनी दुबळ्यांना वाचविण्याच्या मिषाने पडण्याची जरूर नाही. त्यानेच तर आपले वाटोळे झाले आहे. दुबळ्यांचे अशा रीतिने रक्षण करणे म्हणजे दुबळ्याला जास्त दुबळे बनविण्यासारखे आहे. हा विचार मवाळांनी नीट लक्षात घेतला पाहिजे. त्याशिवाय स्वराज्य येणे शक्य नाही. एका इंग्रज पाद्र्याने म्हटलेल्या पुढील शब्दांची मी त्यांना आठवण देईन की, 'स्वराज्यातली अंदाधुंदीसुद्धा आपण सहन करू, पण परराज्याची सुव्यवस्था नको.' अर्थात् त्या पाद्र्याच्या स्वराज्याचा अर्थ आणि हिंद- स्वराज्याचा अर्थ वेगवेगळा आहे. आपल्याला गोऱ्यांचा किंवा हिंदी माणसांचा, कोणाचाच जुलूम किंवा दडपण नको आहे. दोहोंच्याही पलीकडे जायला आपल्याला शिकायचे-शिकवायचे आहे.

असे जर घडले तर एक्स्ट्रीमिस्ट (जहाल) आणि मॉडरेट (मवाळ) दोघेही एकत्र येतील, येऊ शकतील, आले पाहिजेत; त्यांना परस्परांविषयी भीति किंवा अविश्वास बाळगण्याची जरूर नाही.

**वाचक**: हे तुम्ही दोन पक्षांना सांगाल. इंग्रजांना काय म्हणाल?

**संपादक**: त्यांना मी नम्रपणे म्हणेन की तुम्ही माझे राजे आहात खरे. ते तुमच्या तलवारीमुळे आहात की माझ्या इच्छेमुळे आहात या प्रश्नाची चर्चा करण्याची मला जरूर नाही. तुम्ही माझ्या देशात राहता, त्याचाही मला द्वेष वाटत नाही. पण तुम्ही राजे असलात तरी तुम्हाला आमचे नोकर म्हणून रहावे लागेल. तुमचे सांगणे आम्ही नव्हे, आमचे सांगणे तुम्ही अंमलात आणले पाहिजे. आजवर या देशातून जे धन तुम्ही घेऊन गेलात ते तुम्हाला पचले, पण आता तुम्ही तसे कराल तर ते चालणार नाही. हिंदुस्तानची चाकरी करून रहावे म्हणाल तर तुम्हाला राहता येण्याजोगे

आहे. आमच्याशी व्यापार करण्याचा लोभ तुम्ही सोडला पाहिजे. तुम्ही ज्या सुधारणेचे गोडवे गाता तिला आम्ही कुधारणा समजतो. आमची संस्कृति तुमच्यापेक्षा अत्यंत उच्च दर्जाची आम्ही मानतो. हे जर तुम्हाला पटले तर तुमचा लाभ आहे. ते तुम्हाला न पटले तरीसुद्धा तुमच्याच म्हणीप्रमाणे तुम्हाला या देशात या देशाचे होऊन रहावे लागेल. तुमच्याकडून आमच्या धर्माला बाधा येईल असे काही घडता कामा नये. तुम्ही राज्यकर्ते असल्यामुळे हिंदूंचा मान राखण्याकरिता गायीचे मांस खाण्याचे आणि मुसलमानांचा मान राखण्याकरिता डुकराचे मांस खाण्याचे सोडून देणे हा तुमचा धर्म आहे. आम्ही दबलेलो असल्यामुळे आतापर्यंत आम्ही बोलू शकलो नाही, पण म्हणून काही आमची भावना दुखावली नाही असे तुम्ही समजू नका. आतापर्यंत स्वार्थामुळे किंवा दुसऱ्या भीतिमुळे तुम्हाला आम्ही हे सांगू शकलो नाही. पण आता सांगणे हे आमचे कर्तव्य आहे. तुम्ही स्थापन केलेल्या शाळा आणि कोर्ट काही उपयोगाची नाहीत असे आम्ही मानतो. त्यांच्याऐवजी आमची पूर्वी जी शाळा आणि कोर्टे होती तीच आम्हाला हवीत.

हिंदुस्तानची भाषा इंग्रजी नसून हिंदी आहे. ती तुम्ही शिकून घेणे बरे, आम्ही तुमच्याशी करायचा व्यवहार आमच्याच भाषेत करू.

तुम्ही रेल्वेकरिता आणि फौजेकरिता जो अफाट पैसा खर्च करीत आहांत तो आमच्याने पाहवत नाही, त्याची जरूर आहे असे आम्हाला वाटत नाही. रशियाची भीति तुम्हाला असेल, आम्हाला नाही. ते आले तर आम्ही पाहून घेऊ. तुम्ही तोपर्यंत असलात तर आपण दोघे मिळून पाहून घेऊ. आम्हाला विलायती किंवा युरोपचे कापड नको. या देशात तयार झालेल्या वस्तूंनीच आम्ही भागवून घेऊ. तुमचा एक डोळा मँचेस्टरकडे आणि एक आमच्याकडे, हे परवडणार नाही. तुमचा आणि आमचा स्वार्थ एकच आहे असे समजून तुम्ही वागलात तर तुमची सोबत चालू शकेल.

तुमच्याशी हे आम्ही बोललो ते टाकून बोललेलो नाही. तुमच्याजवळ शस्त्रबळ आहे, मोठे आरमार आहे. त्याच्याशी आम्ही तशाच बळाने लढू शकणार नाही. पण जर तुम्हाला वर सांगितलेल्या गोष्टी कबूल नसतील

तर आमचे-तुमचे जमणार नाही. तुम्हाला वाटले तर, आणि शक्य झाले तर तुम्ही आम्हाला तलवारीने छाटून टाका; वाटले तर तोफेने उडवून द्या. आम्हाला जे पसंत नाही ते तुम्ही कराल तर त्यात आमची तुम्हाला मदत मिळणार नाही; आणि आमच्या मदतीशिवाय तुम्हाला एक पाऊलहि टाकता येणार नाही.

आमच्या या म्हणण्याचा तुम्ही आपल्या सत्तेच्या मस्तीत उपहास कराल असा संभव आहे. तुमचा हा उपहास मिथ्या आहे असे कदाचित् तूर्त आम्ही तुम्हाला दाखवू शकणार नाही, पण आमच्यात जर दम असेल तर तुम्हाला दिसून येईल की, तुमचा सत्तामद व्यर्थ होता आणि तुमचा उपहास हे तुमच्या विपरीत बुद्धिचे लक्षण होते.

तुम्ही हाडाने धार्मिक प्रवृत्तिची माणसे आहां असे आम्ही मानतो. आम्ही तर धर्मस्थानातच राहत आहो. तुमचा आणि आमचा संबंध कसा आला याचा विचार व्यर्थ आहे. पण आपल्या या संबंधाचा आपणा दोघांनाही सदुपयोग करून घेता येईल.

तुम्ही हिंदुस्तानात येणारे इंग्रज हे इंग्रज लोकांचे खरे प्रतिनिधी नाही, तसेच अर्धवट इंग्रज बनलेले आम्ही हिंदुस्तानी सुद्धा स्वत:ला खऱ्या हिंदुस्तानी लोकांचे प्रतिनिधी म्हणवून घेऊ शकत नाही. इंग्रज लोकांना जर तुमच्या कृत्यांची खरी माहिती झाली तर ते तुमच्या कारभाराला विरोध करतील. हिंदुस्तानी लोकांनी तर तुमच्याशी संबंध जेमतेमच ठेवलेला आहे. तुमची सुधारणा, जी कुधारणा आहे, ती सोडून देऊन तुम्ही जर तुमच्या धर्माचा अभ्यास कराल तर आमची मागणी बरोबर आहे असे तुम्हाला दिसून येईल. याच पद्धतिने तुम्ही हिंदुस्तानात राहू शकाल. तसे तुम्ही राहिलात तर तुमच्याकडून आम्हाला जे काही शिकण्यासारखे आहे ते आम्ही शिकून घेऊ, आणि आमच्याकडून तुम्हाला पुष्कळ शिकण्याजोगे आहे ते तुम्ही शिकाल. असे झाल्याने आपणा दोघांचा आणि जगाचाही लाभ होईल. पण हे सर्व आपल्या परस्पर—संबंधाचा पाया धर्म-बुद्धिने घातला गेला तरच शक्य आहे.

**वाचक**: राष्ट्राला काय सांगाल?

**संपादक**: राष्ट्र म्हणजे कोण?

**वाचक**: आतापर्यंत तुम्ही ज्या संदर्भात तो शब्द वापरीत आहात तेच; म्हणजे जे युरोपच्या संस्कृतिने बिघडलेले आहेत, जे स्वराज्यासाठी आवाज उठवीत आहेत तेच.

**संपादक**: या लोकांना मी सांगेन की, ज्याला स्वराज्याची अशी नशा चढली असेल असा हिंदुस्तानी मनुष्यच वरीलप्रमाणे इंग्रजांना सांगू शकेल. तो त्यांच्या रुबाबाने दबून जाणार नाही. खरी नशा त्यालाच चढली म्हणायची की ज्याचे ज्ञानपूर्वक असे मन तयार झाले आहे की, हिंदी संस्कृति ही श्रेष्ठ आहे आणि युरोपची संस्कृति म्हणजे नऊ दिवसांची नवलाई आहे. अशा संस्कृति पुष्कळ झाल्या आणि मातीला मिळाल्या; आणखी होतील व मातीला मिळतील. खरी नशा त्यालाच आहे की जो आत्मबळाचा अनुभव घेतल्यामुळे शरीरबळाने दबून न जाता निर्भय राहील आणि शस्त्रबळाचा वापर करण्याचे स्वप्नातही आणणार नाही. खरी मस्ती त्यालाच चढली म्हणायची, जो आजच्या दयाजनक अवस्थेने अतिशय व्याकुळ झाला आहे आणि ज्याने विषाचा पेला पहिल्यापासूनच ओठांना लावलेला आहे.

असा हिंदुस्तानी माणूस एकटा असला तरीसुद्धा तो वरीलप्रमाणे इंग्रजांना सांगेल आणि ते त्यांना ऐकून घ्यावे लागेल.

वरील मागणी ही मागणी नसून हिंदी माणसाच्या मानसिक अवस्थेचे दर्शन आहे. मागून मिळणार नाही; ते घ्यावे लागेल. घेण्याचे बळ पाहिजे. ते बळ त्याच्यातच असेल,

(१) जो इंग्रजी भाषेचा उपयोग नाइलाज होईल तेव्हाच करील.

(२) जो वकील असेल तर वकीली सोडून, स्वत: घरात माग घेऊन कपडा विणील.

(३) जो वकील असेल तर आपले ज्ञान फक्त लोकांना शिकविण्याकडे आणि इंग्रजांचे डोळे उघडविण्यासाठी वापरील.

(४) जो वकील असेल तर वादी-प्रतिवादींच्या तंट्यात पडणार नाही,

कोर्टाचा त्याग करील आणि आपल्या अनुभवाने लोकांना कोर्टात कां जाऊ नये हे समजावून सांगेल.

(५) जो वकीलीप्रमाणे न्यायाधीशपदही सोडून देईल.

(६) जो डॉक्टर असेल तर आपला धंदा सोडून देईल आणि लोकांच्या चामड्याची चीरफाड करण्यापेक्षा त्यांच्या आत्म्याला स्पर्श करून त्यांना निरोगी बनविणे अवश्य आहे हे लक्षात घेईल.

(७) जो डॉक्टर असेल तर असे मानील की, आपण कोणत्याही धर्माचे जरी असलो तरी जो हिंस्रपणा प्राण्यांवर इंग्रजांच्या औषधशाळांमध्ये करण्यात येतो त्याने शरीर निरोगी होत असले तरी ती हिंसा होऊ देता कामा नये – मग शरीर रोगग्रस्त राहिले तरी हरकत नाही.

(८) जो डॉक्टर असूनसुद्धा माग चालवील; जे लोक आजारी असतील त्यांना त्यांच्या आजाराचे कारण सांगून ते कारण नाहीसे करा असे सांगेल; निरुपयोगी औषधे देऊन त्यांचे लाड करणार नाही. निरुपयोगो औषधे न घेतल्याने जर आजाऱ्याचे शरीर पडले तरी जग अनाथ होणार नाही, हीच त्या माणसाविषयी खरी दया आहे असे तो समजेल.

(९) जो धनाढ्य असूनसुद्धा आपल्या पैशाची चिंता न करता जे मनात असेल तेच बोलेल आणि सत्ताधीशांची पर्वा ठेवणार नाही.

(१०) जो धनाढ्य असून आपला पैसा माग चालू करण्याकडे वापरील आणि स्वत: स्वदेशी माल वापरून दुसऱ्यांना प्रोत्साहन देईल.

(११) हा काळ पश्चात्तापाचा, प्रायश्चित्ताचा, शोकाचा आहे असे अन्य हिंदुस्तानी लोकांप्रमाणे समजेल.

(१२) सर्वांप्रमाणे जो समजून घेईल की इंग्रजांचा दोष काढणे व्यर्थ आहे. आमच्या दोषांमुळे ते आले, त्याचमुळे ते राहिले आहेत आणि ते दोष दूर झाले तर ते निघून जातील किंवा त्यांचे मन पालटेल.

(१३) सर्वांप्रमाणे तो लक्षात घेईल की शोकावस्थेत असताना मौजमजा करणे योग्य नाही. जोवर आपल्या मनाला स्वास्थ्य नाही तोवर आपण तुरुंगात जावे किंवा हद्दपार व्हावे हेच योग्य.

(१४) लोकांची समजावणी करायची आहे म्हणून आपण तुरुंगात जाऊ नये अशी खबरदारी घेणे हा निव्वळ मोह आहे, हे तो अन्य देशबांधवांप्रमाणे समजेल.

(१५) बोलण्यापेक्षा करण्याचा परिणाम अद्‌भुत होतो; निर्भय होऊन मनात असेल ते बोलावे आणि ते बोलल्याने जो परिणाम होईल तो सहन करावा; तरच आपण आपल्या बोलण्याची छाप पाडू शकू हे जो लक्षात घेईल.

(१६) दुःखे सहन करण्यानेच बंधन तोडणे शक्य आहे हे लक्षांत ठेवील.

(१७) आपण इंग्रजांना त्यांच्या सुधारणा अंमलात आणताना उत्तेजन देऊन जे पाप केले आहे त्याचे प्रायश्चित्त करण्याकरिता देहांतापर्यंत जरी अंदमानात रहावे लागले तरी ते गैरवाजवी नाही, याची जो जाण ठेवील.

(१८) कोणतेही राष्ट्र दुःख भोगल्याशिवाय वर चढलेले नाही. हिंसक लढाईतही दुःख हीच कसोटी असते, दुसऱ्याला मारणे ही नव्हे. तीच गोष्ट सत्याग्रहासंबंधी समजावी, हे जो जाणेल.

(१९) 'दुसरे करतील तेव्हा आपण करू' हा निव्वळ न करण्याचा बहाणा आहे. आपल्याला जे बरे वाटते ते आपण करावे, दुसऱ्यांना वाटले म्हणजे ते करतील; हाच कृति करण्याचा मार्ग आहे. स्वादिष्ट भोजन दिसले की ते खाताना मी दुसऱ्याची वाट पाहत नाही. वरीलप्रमाणे प्रयत्न करणे, दुःख भोगणे हे स्वादिष्ट भोजन आहे. त्रास वाटून हे करणे किंवा दुःख सोसणे ही केवळ वेठबिगार आहे, हे जो समजून घेईल.

**वाचक**: या गोष्टी सगळे करणार केव्हा आणि आपला बेडा पार होणार केव्हा?

**संपादक**: पुनः तुम्ही चूक केलीत. सर्वांशी मला आणि तुम्हाला काय कर्तव्य आहे? 'आपण आपले पहा, मी आपले पाहतो' हे जरी स्वार्थवचन म्हटले जाते तरी ते परमार्थवचन आहे. जर मी स्वतःचे बरे केले तरच दुसऱ्याचे करीन ना? माझे कर्तव्य मी करावे यातच सारी

कार्यसिद्धी सामावली आहे.

तुमची रजा घेण्यापूर्वी पुनः एकदा हे सांगण्याची परवानगी घेतो की—

(१) स्वराज्य म्हणजे स्वत:वरचे राज्य.

(२) त्याची किल्ली सत्याग्रह, आत्मबळ किंवा दयाबळ हे आहे.

(३) ते बळ वापरण्याकरिता समग्र अर्थाने स्वदेशी व्रताचे पालन करण्याची जरूर आहे.

(४) जे आपण करू इच्छितो ते इंग्रजांच्या द्वेषाने नव्हे, त्यांना शिक्षा करण्याकरिता नव्हे, तर ते करणे आपले कर्तव्य आहे म्हणून. ह्याचा अर्थ, इंग्रजांनी मिठावरचा कर काढून टाकला, घेतलेले धन परत केले, सर्व हिंदुस्तानी लोकांना मोठमोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या, फौज मागे घेतली, तरी आपण त्यांच्या यंत्रावरचे कापड वापरू आणि इंग्रजी भाषा बोलायला लागू किंवा त्यांच्या यंत्रकलेचा उपयोग करू असे नाही. या सर्व गोष्टी अयोग्य आहेत, म्हणूनच करावयाच्या नाहीत हे समजून घेणे जरूर आहे.

इंग्रजांशी माझे वैर नाही, त्यांच्या सभ्यतेशी आहे.

आपण स्वराज्याचे नाव घेतो, पण त्याचे स्वरूप आपल्याला समजलेले नाही असे मला वाटते. मला ते जसे समजले तसे समजावून देण्याचा मी प्रयत्न केला आहे. तसे स्वराज्य मिळविण्याकरिता माझे जीवन समर्पित आहे अशी माझ्या अंतरात्म्याची साक्ष आहे.

# परिशिष्ट

## काही आधारभूत ग्रंथ

वरील विचाराच्या अधिक अध्ययनासाठी खालील पुस्तके वाचावीत अशी सूचना आहे.

| | | |
|---|---|---|
| टॉलस्टॉय | – | The Kingdom of God is within you |
| | – | What is Art? |
| | – | The slavery of our times |
| | – | The first step |
| | – | How shall we escape? |
| | – | Letter to a Hindoo |
| शेरार्ड | – | The White slaves of England |
| कार्पेन्टर | – | Civilization : Its cause and cure |
| टेलर | – | The fallacy of speed |
| ब्लाउंट | – | A new crusade |
| थोरो | – | On the duty of civil disobedience |
| | – | Life without principle |
| रस्किन | – | Unto this last |
| | – | A joy forever |
| मॅझिनी | – | Duties of man |
| प्लेटो | – | Defence and death of Socrates |
| मॅक्स नॉरडौ | – | Paradoxes of Civilization |
| दादाभाई नौरोजी | – | Poverty and un-British rule in India |
| दत्त, रमेशचंद्र | – | Economic History of India |
| मेन | – | Village Communities |

* * *

आज से करीब ११० साल पहले, सन १९०९ में, दक्षिण अफ्रिका के ट्रान्सवाल प्रान्त में बसनेवाले हिन्दुस्तानी लोगों की समस्याओं के बारे में अंग्रेज सरकार के साथ मशवरा करने के लिए दो सदस्यों का प्रतिनिधिमंडल लन्दन गया था। उन दो सदस्यों में से एक गांधीजी थे। लन्दन में चार महिनों तक रुकने के बाद *किलडोनन कॅसल* नामक जल–जहाज़ में वे वापस लौटते थे। दस दिन के उस सफर के दरमियान गांधीजी की कलम से जो झरा वह उनके जीवन की प्रस्तावना बराबर था। शायद ही ३७ साल की उम्र के गांधीजी अभी हिन्दुस्तान के किनारे छः साल बाद उतरने वाले थे। इसके पहले उन्होंने अपने आगे के जीवन का और स्वतंत्र हिन्दुस्तान के राष्ट्रजीवन का मानो पथ–नकशा उस छोटी सी पुस्तक में रेखांकित किया। दक्षिण अफ्रिका पहुँचने के बाद रस्किन की पुस्तक *अन्टु धिस लास्ट* गांधीजी के जीवन में मार्ग–परिवर्तक बनी थी; तो, मानो उसी पुस्तक के विकसित स्वरूप में *हिन्द स्वराज* पुस्तक आई।

यह ग्रंथ अनेक कारणों से विशिष्ट है। गांधीजी की कलम से, गांधीजी के हस्ताक्षरों में, मातृभाषा गुजराती में, लिखा गया हो और उनके हस्ताक्षरों में ही छपा हो, ऐसा यह एक मात्र ग्रंथ है। इसके अलावा सबसे महत्त्वपूर्ण बात यह है कि गांधी विचारधारा को समझने के लिए यह ग्रंथ चाबी–रूप है और आज सौ वर्ष बाद भी यह विद्यमान है।

ISBN 978-81-7229-125-9
9 788172 291259
₹ 50

NAVAJIVAN